शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

अधिकारप्रदत्त स्वायत

NAAC Accredited - 'A+' Grade with 3.49 CGPA (IV Cycle)

शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर

॥ आरोह तमसो ज्योति: ॥

स्थापना : १९७०















शब्दगंध

2025-26

Email : principal@shahucollegelatur.org.in
Website : https://www.shahucollegelatur.org.in

मान्यवरांच्या भेटी



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे
प्र. कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांचे समवेत,
शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कै. मा. डॉ. गोपाळराव
पाटील व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे.



पद्मश्री मा. श्री. शरद काळे यांचा सत्कार करताना
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे,
उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे



ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, पद्मश्री डॉ. अभय बंग,
शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष
कै. डॉ. गोपाळराव पाटील, वर्तमान अध्यक्ष डॉ. अजय जाधव,
प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे



महाविद्यालयाच्या विकासाचा आढावा घेताना
शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष कै. डॉ. गोपाळराव
पाटील, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य कै. डॉ. जे. एम.
वाघमारे व माजी गृहमंत्री कै. डॉ. शिवराज पाटील
चाकूरकर.

आमचे मार्गदर्शक



डॉ. अजय अनिरुद्ध जाधव
अध्यक्ष,
शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर



मा. श्री. भैरवनाथ भगवानराव ठोंबरे
सचिव,
शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर



मा. डॉ. शिवाजीराव हरिश्चंद्र सूर्यवंशी
सह-सचिव,
शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर



मा. श्री उद्धव नारायणराव पाटील
सह-सचिव,
शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर

भावपूर्ण श्रद्धांजली



स्व. डॉ. गोपाळराव पाटील
अध्यक्ष, शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर.



स्व. ॲड. शिवराज पाटील चाकूरकर
माजी सभापती, लोकसभा, भारत सरकार.



स्व. डॉ. जनार्दन वाघमारे
माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
माजी प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर



स्व. अजितदादा पवार
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



ध्वजारोहण समारंभ : २०२५ - २०२६



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण प्रसंगी
शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे संचालक मा.श्री.बब्रुवान गोमसाळे



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण प्रसंगी
शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे संचालक मा.श्री.गोपाळ शिंदे



१७ सप्टेंबर मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त ध्वजारोहण
प्रसंगी संगीत विभागप्रमुख श्री. हरिसर्वोत्तम जोशी



१ मे महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण प्रसंगी उपप्राचार्य
प्रा.सदाशिव शिंदे व परीक्षा नियंत्रक डॉ.ओमप्रकाश शहापूरकर

क्रिडा स्पर्धांचे आयोजन



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, शिक्षक आमदार मा.विक्रम काळे, संस्थेचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव पाटील व प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे



स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कबड्डी स्पर्धेतील क्षणचित्र



राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी बोलतानाब ऑलिपियन जलतरणपट्टू श्री.विरधवल खाडे, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.पी.आर.देशमुख,प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे व इतर मान्यवर



राज्यस्तरीय शालेय जलतरण स्पर्धेतील क्षणचित्र

भारताचे संविधान

उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा
व उपासना यांचे स्वातंत्र्य;
दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

Teacher's Achievement : 2025-2026



Dhanashri Jagtap
MH-SET (Life Science)



Rupali Katkar
MH-SET (Physics)



Bapusaheb Jawalgekar
Ph.D. (Marathi)



Anant Panchal
Book on " English Grammar for Competitive Exam."



Suryakant Chavan
Jaishankar Prasad Antarrashtriya Sanman Puraskar - 2025

Student's Achievement : 2025-2026



Vyankat Panchal
MH-SET (Sociology)



Anil Kendre
MH-SET (Pol. Sci.)



Saniya Shaikh
MH-SET (Pol. Sci.)



Vaishnavi Jagtap
MH-SET (Pol. Sci.)



Kamble Shubhangi
NET (Commerce)



Kiran Shirure
MH-SET (Pol. Sci.)



Chaitanya Jadhav
Veterinary Doctor



Pratiksha Mandole
PET Exam.



Amruta Patil
B.Sc. (BT) INSA Fellowship



Prathmesh Deshpande
B.Sc. (CA) INSA Fellowship



Nishat Patel
M.Sc. (Botany) INSA Fellowship

२०२५-२६ मध्ये विविध पदावर निवड झालेले गुणवंत विद्यार्थी



रोहीत फुलगामे
अग्निवीर
(भारतीय सैन्य दल)



गोपाळ शिंदे
अग्निवीर
(भारतीय सैन्य दल)



राहुल वाघमोडे
कालवा निरीक्षक
(जलसंपदा विभाग)



वेदिका वंटेकर
पोस्ट मास्टर
(भारतीय डाक घर)



विजय हंडरगुळे
सशस्त्र पोलीस शिपाई
(महाराष्ट्र राज्य)



गायत्री दंडनाईक
नगरसेविका
(धाराशिव नगरपालीका)

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे गुणवंत विद्यार्थी

Bachelor of Arts



ALTE ANJALI MAHADEV
Merit First
CGPA : 8.65



SHINDE DATTATRAY DILIP
Merit Second
CGPA : 8.41



OVHAL SANIYA BALASAHEB
Merit Third
CGPA : 8.33

Bachelor of Commerce



MORE GAYATRI AJAY
Merit First
CGPA :9.01



SHAIKH SANIYA ABDUL MAJJEED
Merit Second
CGPA : 8.83



TELANGE SANDHYA BALAJI
Merit Third
CGPA : 8.80

Bachelor of Science



DARADE VAISHNAVI MANOHAR
Merit First
CGPA : 8.99



JADHAV OMKAR PRAKASH
Merit Second
CGPA : 8.69



CHOUDHARY SAFURA MUSTAK
Merit Third
CGPA : 8.68

Bachelor of Computer Application



KAMBLE PALLAVI JANARDHAN
Merit First
CGPA : 8.91



SURYAWANSHI SHUBHANGI D.
Merit Second
CGPA : 8.65



PATIL VISHAKHA S.
Merit Third
CGPA : 8.52

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे गुणवंत विद्यार्थी

Bachelor of Science (Computer Science)



BIRADAR ASHWINI GOVIND
Merit First
CGPA : 9.20



LOKARE NIKITA BALASAHEB
Merit Second
CGPA : 8.99



MUSALE ANJALI BHIMA
Merit Third
CGPA : 8.83

Bachelor of Science (Biotechnology)



BOLEGAVE RUCHITA GOVINDRAO
Merit First
CGPA : 9.08



MASHALKAR GANESH D.
Merit Second
CGPA : 8.57



SURYAWANSHI GAYATRI MARUTI
Merit Third
CGPA : 8.57

Bachelor of Vocation (Computer Technology)



SHINDE SHWETA SURESH
Merit First
CGPA : 8.85



KAMBLE PRIYANKA DATTA
Merit Second
CGPA : 8.38



BIRGE ALOK MANMATH
Merit Third
CGPA : 7.64

Master of Commerce



BEG ASIYA YUSUF
Merit First
CGPA : 9.38



SUDE SHREYA DINKAR
Merit Second
CGPA : 9.25



MANE SHRADDHA DATTATRAY
Merit Third
CGPA : 8.95

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे गुणवंत विद्यार्थी

Master of Science (Computer Science)



KATAMBE MAHESH SANJAY
Merit First
CGPA : 8.55



BAJULGE ABHISHEK BALAJI
Merit Second
CGPA : 8.51



BORADE RUSHIKESH B.
Merit Third
CGPA : 7.80

Master of Science (Botony)



MANIYAR SANA NOOR ALI
Merit First
CGPA : 8.20



BHOOMKAR SHWETA SUDHIR
Merit Second
CGPA : 7.69



SURWASE DHIRAJ NARSING
Merit Third
CGPA : 7.45

Master of Science (Biotechnology)



THAKURDESHMUK DIVYA S.
Merit First
CGPA : 8.99



KUBER ADITYA DHANANJAY
Merit Second
CGPA : 8.47



KATKAR MOHAMADHAHANIF G.
Merit Third
CGPA : 8.42

Master of Science (Physics)



RAJE SHWETA CHANDRAKANT
Merit First
CGPA : 8.67



GHUMRE KALYANI B.
Merit Second
CGPA : 8.25



FISKE KANCHAN SANJIV
Merit Third
CGPA : 8.23

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे गुणवंत विद्यार्थी

Master of Science (Chemistry)



DEVAKATE SHRUTI SUNIL
Merit First
CGPA : 8.90



SAYYAD HINA NABISAB
Merit Second
CGPA : 8.38



DESHPANDE GANESH ANAND
Merit Third
CGPA : 8.04

Master of Science (Zoology)



MULLA AYESHA NAIMODDIN
Merit First
CGPA : 8.37



SHAIKH AFSHA JABEEN LAYAK
Merit Second
CGPA : 7.98



SHAIKH ASMA AMIR
Merit Third
CGPA : 7.79

Master of Science (Mathematics)



KALAL TAIMINA BEGUM ISMAILSAB
Merit First
CGPA :7.89



KAMALKAR PRAGATI P.
Merit Second
CGPA : 7.73



PATIL REVATI GORAKH
Merit Third
CGPA : 7.50

Master of Science (Microbiology)



CHANGLERKAR SHRAVANI P.
Merit First
CGPA : 7.76



DAHIWADE SAYALI BABURAO
Merit Second
CGPA : 6.93



SWAMI SIDDHESHVAR V.
Merit Third
CGPA : 6.88

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे गुणवंत विद्यार्थी

Master of Arts (Economics)



KAMBLE VAISHALI NAMDEV
Merit First
CGPA : 7.68



MANE CHAITALI RAJENDRA
Merit Second
CGPA : 7.35



PATEL SUMAIYA IQBAL
Merit Third
CGPA : 7.03

Master of Arts (Geography)



LOMTE SRUSHTI RAMESH
Merit First
CGPA : 8.38



BANSODE ANUSHKA ANIRUDHA
Merit Second
CGPA : 8.31



GURHALE MOHINI PIRAJI
Merit Third
CGPA : 8.22

Master of Arts (English)



KAZI AZMINA SABER HUSSAIN
Merit First
CGPA : 6.78



GARAD HARSHADA SUDHIR
Merit Second
CGPA : 6.74



DIXIT DNYANESHWAR RAM
Merit Third
CGPA : 6.36

Master of Arts (Political Science)



GANDLE ROHIT RAMESH
Merit First
CGPA : 7.09



SHAIKH SEEMA AKBAR
Merit Second
CGPA : 7.07



YERNALE PRAVIN VISHNU
Merit Third
CGPA : 6.92

शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे गुणवंत विद्यार्थी

Master of Arts (Pali)



DESHMANE KANCHAN ANANT
Merit First
CGPA : 8.23



KALE USHA BHASKAR
Merit Second
CGPA : 8.12



TILEKAR JYOTI ROHIDAS
Merit Third
CGPA : 8.11

IIT JAM Examination - 2026



ARVIND MURKUTE
AIR - 570 (MS)



MOHINI MALI
AIR - 581 (Math)



SAKSHI SAWANT
AIR - 895 (BT)



RUPALI DHAIGUDE
AIR - 1850 (Maths)



VAISHNAVI SHINDE
AIR - 1971 (Chem.)



NANDINI SONAR
AIR - 2121 (Chem.)



ATHARV SURVASE
AIR - 3798 (Phy.)

राहूश्री २०२५-२६



Fardeen Asif Shaikh
M.Sc. BT - II



SUO Hitesh Santram Surwase
B.Sc. CS - III



Aditya Dattatraya Sonkamble
M.A. Geography - I

क्रीडा विभाग गुणवंत खेळाडू २०२५-२६

१) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खेळाडू व राष्ट्रीय खेळाडू प्राविण्य प्राप्त



चि. सुशांत हजारे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो क्रीडा स्पर्धा २०२५-२६ **तृतीय पदक**



चि. शुभम थोरात
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खो-खो क्रीडा स्पर्धा २०२५-२६ **तृतीय पदक**



चि. विशाल टेकाळे
वेस्ट झोन सॉफ्टबॉल राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा, उज्जैन (मध्यप्रदेश) **तृतीय पारितोषिक**



कु. प्रांजली शंकर शिंदे
शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धा, नागपूर **(प्रथम)**



चि. सक्षम गायकवाड
ज्युनिअर नॅशनल सॉफ्टबॉल स्पर्धा चंदीगड **तृतीय**



चि. सोहेल रहिमोद्दीन फारूकी
शालेय राष्ट्रीय बास्केट बॉल स्पर्धा, राजस्थान सहभाग

२. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ खेळाडू



चि. विशाल घुगे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



चि. यश देडे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



चि. तुषार जाधव
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



चि. अवेज पठाण
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. प्रगती कांबळे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. साक्षी समसापुरे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. राऊत मुक्ताई
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. नम्रता पवार
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बेसबॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. कल्याणी साखरे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ
वेसवॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले
पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. सानिया शेख
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ
वेसवॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले
पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. मेघा वाघमारे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ
वेसवॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले
पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. राजनंदनी माने
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ
वेसवॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले
पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. साधना पवार
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ
वेसवॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले
पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



कु. प्रिती धनगर
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ
वेसवॉल क्रीडा स्पर्धा, सावित्रीबाई फुले
पुणे युनिव्हर्सिटी, पुणे (बारामती)



चि. आदित्य सोनकांबळे
अखिल भारतीय आंतर विद्यापीठ
बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा,
कुरूक्षेत्र विद्यापीठ, कुरूक्षेत्र

४. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ खेळाडू



कु. सताक्षी जाधव
पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ हॅन्डबॉल क्रीडा स्पर्धा,
सौराष्ट्र युनिर्व्हसिटी, राजकोट, गुजरात.



चि. भुवनेश सगरे
पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ बास्केटबॉल क्रीडा स्पर्धा,
भोपाळ नोवेल युनि. उदयपूर, राजस्थान



कु. प्रणिता क्षीरसागर
बुध्दीवळ पश्चिम विभागीय अंतर विद्यापीठ
बुध्दीवळ स्पर्धा, जयपूर

४. महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ खेळाडू



चि. प्रतीक कोपरकर
व्हॉलीबॉल-महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ
क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६



कु. श्रावणी लगडे
बॉस्केटबॉल महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ
क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६



कु. साक्षी हाके
बॉस्केटबॉल-महाराष्ट्र राज्य
आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६



कु. अन्वी खंडेलवाल
बॉस्केटबॉल-महाराष्ट्र राज्य
आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६



चि. विश्वजीत उडते
बॉस्केटबॉल - महाराष्ट्र राज्य
आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६



चि. सुरज भुजंगा
बॉस्केटबॉल - महाराष्ट्र राज्य
आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६



कु. प्रणिता कांबळे
खो-खो, महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ
क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६



कु. सुहासिनी काळे
खो-खो, महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ
क्रीडा महोत्सव, नांदेड २०२५-२६

कला व सांस्कृतिक विभाग : गुणवंत विद्यार्थी

राष्ट्रीय, मध्यवर्ती विभागीय व इंद्रधनूष्य राज्यस्तरीय आंतरविद्यापीठ युवक महोत्सव


शिवम सुतार


पृथ्वीराज चव्हाण


ईश्वरी जोशी


मयुरी वाघमारे


महेक अन्सारी


अनुजा कुलकर्णी


किशोर मगर


वैष्णवी महाजन


अंजु कांबळे


योगिता जाधव


निकिता कोकाटे


प्रतिक वाघमारे


श्रेया काटवटे


ज्ञानेश्वरी जाधव


ऋतुजा डोने


आकांक्षा सारंगे


सागर शिंदे


केतकी कुलकर्णी


अर्पिता पांचाळ


गौरव साठे


चारूशिला काळम


अनिकेत गायकवाड


आदिती जहागीरदार


पवनराज चव्हाण


आदित्य स्वामी


श्रीराम शिंगण


गणेश झिपरे



NCC (Boys' and Girls') Achievements : 2025-26



Hitesh Surwase
Republic Day Camp - 2026
Kartavya Path of RDC - 2026



Rushikesh Chate
RDC-IGC - 2025
Army Attachment Camp - 2025



Vignesh Yeotikar
RDC-IGC - 2025
Army Attachment Camp - 2025



Shreyash Gurav
Army Attachment Camp - 2025



Pradeep Takpire
Army Attachment Camp - 2025



Warad Omkar
EBSB - II Camp



Omkar Mane
EBSB - I Camp



Ashwin Adsare
EBSB - I Camp



Shubham Marsune
Army Attachment Camp - 2025



Rohit Fulgame
Indian Army as Agniveer GD



Abhishek Shendre
Indian Army as Agniveer GD



Narsing Bhosale
Indian Airforce as a Airman



Yogesh Nagargoje
Indian Army as Agniveer
Tech and CLK



Pritam Jadhav
Indian Army as Agniveer
GD



Parmeshwar Birajdar
SRPGF GR - 2 and
Maharashtra Police



Samarth Kale
Maharashtra Police

NCC (Boys' and Girls') Achievements : 2025-26



Prashant Panchal
Maharashtra Police



Sumit Gore
Maharashtra Police







Officer Commissioning – NCC Special Entry 2025 marked a proud and memorable occasion with the Passing Out Parade held on 7 March 2026 at Officers Training Academy Chennai. It is a moment of great pride for the NCC Boys Unit of Rajarshi Shahu Mahavidyalaya Latur as two of its cadets achieved this significant milestone. OC Vikas Birajdar (RHS) has been commissioned into The Punjab Regiment (26 Punjab), while OC Suyash Tekale (LHS) has been allotted 21 PARA (Special Forces), reflecting dedication, discipline, and commitment to serving the nation.



Sandhya Nandgave
RDC - IGC - 2025



Anju Kamble
All India Trekking Expedition, Kerala 2025



Anushka Gathade
All India Trekking Expedition, Kerala 2025



Shital Raut
Army Attachment Camp 2025



Shraddha Nikam
Army Attachment Camp 2025



SUO Kalyani Sakhare
Maharashtra Police at Mumbai

NSS Unit Achievements : 2025-26



Prajakta Borule
Pre NRD / SRD / National International Camp 2026



Mujawar Shadul Rehemat
Pre NRD / SRD / State Level Adventure Camp 2026



Nisha Chavan
State Republic Day 2026



Namrata Taur
State Level Road Safety Camp 2026 / Road Safety Camp 2026



Hamdule Rasul Imran
State Level Utkarsh Camp 2026



Pruthviraj Chavan
State Level Avhaan Camp 2025



Deshmukh Juber Riyaz
State Level Avhaan Camp 2025



Sayyad Ayan Isteeyak
State Level Avhaan Camp 2025



Aarti Kate
State Level Avhaan Camp 2025



Vaishnavi Patil
State Level Avhaan Camp 2025



Namdev Panchal
State Level Road Safety Camp 2026



Omkar Devkatte
State Level Utkarsh Camp 2026



Omkar Suryawanshi
My Bharat BUDGET QUEST Youth Dialogue 2026

जी. एच. रायसोनी करंडक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकीका स्पर्धा, नागपूर



तृतीय क्रमांकाचे रू ५१,०००/- व सन्मान चिन्ह पारितोषिक स्विकारताना महाविद्यालयाचा संघ



सर्वोत्कृष्ट दिग्दर्शन - द्वितीय व पुरूष अभिनय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक स्विकारताना संदीप घुगरे व सर्वोत्कृष्ट संगीत - प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्विकारताना सागर शिंदे

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड 'ज्ञानतीर्थ' युवक महोत्सव



'कव्वाली' गीत प्रकाराचे सादरीकरण करतेवेळी महाविद्यालयाचा संघ.



'वारकरी दिंडी' लोकनृत्य सादर करतेवेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी कलावंत.



'भारतीय समुहगीत' सादर करतेवेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी कलावंत.



'ड्रायव्हर' एकांकीका सादरीकरण करत असताना विद्यार्थी कलावंत.

वार्षिक स्नेहसंमेलन २०२५-२६ कांही क्षणचित्रे



वार्षिक स्नेहसंमेलन उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत असताना प्रमुख पाहुणे सुप्रसिध्द अभिनेत्री मा. रूपलक्ष्मी शिंदे.



गोंधळी लोकनृत्य सादर करतेवेळी विद्यार्थी कलावंत.



'पोतराज' लोकनृत्य सादर करतेवेळी विद्यार्थी कलावंत.



'लावणी' नृत्य करताना कु. योगीता जाधव व 'गीतगायन' करतेवेळी ऋषी कांबळे



'धनगरी लोकनृत्य' सादर करतेवेळी विद्यार्थी कलावंत.



कु. सृष्टी वाघमारे 'महाकाल नृत्य' सादर करताना.



'समुहनृत्य' सादर करतेवेळी महाविद्यालयातील विद्यार्थीनींचा संघ.



अझर खादीम 'वैयक्तिक नृत्य' सादर करताना.

वार्षिक स्नेहसंमेलन २०२५-२६ कांही क्षणचित्रे



चंद्रकांत मुगळे व विश्वनाथ खलसे गीतगायन करताना.



कु. साक्षी बोडके व कु. श्रृती माचवे गीतगायन करताना.



कु. साक्षी पवार लावणी नृत्य सादर करतेवेळी.



रियाज शेख व कु. वैष्णवी महाजन गीतगायन करताना.



कु. चारूशिला काळम व कु. केतकी कुलकर्णी गीतगायन करताना.



कु. अंजु कांबळे लावणी नृत्य व कु. निकीता कोकाटे एकपात्री अभिनय करते वेळी.



प्रयाग पौळ व नामदेव पांचाळ गीतगायन करताना.



महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे व परिक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांना वार्षिक स्नेहसंम्मेलना निमित्त निरोप देतेवेळी सर्व पदाधिकारी.

PM-USHA : Activities Under Soft Component

Workshop on NET/SET Preparation



Chief Guest Dr. Gajanan Rashinkar addressing to the participants



Chief Guest Dr. Gajanan Rashinkar interacting with participants

Workshop on Innovative Pedagogy



Principal, Dr. Mahadev Gavhane delivering Welcome address



Resource Person, Dr. Suyog A. Amrutrao addressing the participants

Workshop on LMS



Principal, Dr. Mahadev Gavhane delivering Welcome address



Dr. Omprakesh Mandge delivering expert talk on LMS

PM-USHA : Activities Under Soft Component

National Conference on STEM



Dr. Prakash Wadgaonkar delivering Keynote Address



Dr. Prakash Wadgaonkar interacting with participants

National Seminar on Smart Solutions for Modern Food Processing Challenges



Proceeding Publication with the auspicious hands of Hon. Principal, Hon. Dr. P. R. Deshmukh and respected dignitaries



Presidential address by Hon. Dr. P. R. Deshmukh, Vice-President of SCSS, Latur

National Seminar on use of ICT tools in Teaching Learning and Evaluation



Organising Secretory Dr. Mahesh Wavare delivering preface of Seminar



Resource person Dr Shaikash Wadkar delivering expert talk.

PM-USHA : Activities Under Soft Component

Workshop on Preparation / Implementation of IDP



Dr Renuka Londhe introducing the Chief Guest of the inaugural function of the workshop



Dr Smita Acharya delivering talk on Concepts and Importance of Institutional Development Plan (IDP)

Industry Academia Interaction



Organising Secretory Mr. Vishwanath Panchal introducing resource persons



Resource person Mr. Vivek Naragude interacting with student participants

National Conference on Re-Imagining Libraries : The Future of Traditional and Modern Synergy



Principal, Dr. Mahadev Gavhane delivering the welcome address



Resource person Dr. Savitri Krishna delivering expert lecture on AI and the Human Touch

PM-USHA : Activities Under Soft Component

State Level Conference on IKS



Participant giving feedback



Dr. Gaurav is guiding the session on Indian Knowledge System on Indian Knowledge System

National Seminar / Conference on effective implementation of NEP-2020 Guidelines



NEP coordinator Dr. Anuja Jadhav delivering preface of seminar



Resource Person Mr. Mithilesh Bhakre delivering expert talk

Workshop on ABC



Organising Secretory Dr Omprakash Shahapurkar delivering preface of workshop.



Presidential address by Chief organizer Principal Dr. Mahadev Gavhane

PM-USHA : Activities Under Soft Component

National Conference on Effective Implementation of Innovative and best practices in Higher Education.



Resource person Dr Rajendra Shinde delivering expert talk



Resource person Dr. Nilesh Berad delivering session

FDP on e-content Development and MOOCs



Dr. Sachin Surve delivering Inaugural Address



Dr. Kavita Unbarhande explaining Digital Tools for Teaching Learning & Assessment

International Conference on Sustainable Developments in Life Sci. & Technology.



Dr. Birendranath Mallick delivering Keynote Address



Padmashri Awardee and Special Invited attendee Hon. Dr. Sharad Kale addressing participants on sustainable waste management technologies

PM-USHA : Activities Under Soft Component

International Conference on Developments in Physical Sci., Mathematical Sci. & Computational Sci.



Hon. B. B. Thombre, Secretory, SCSS, delivering precedential address during conference opening ceremony



Group Photo of Conference Participants.

Two Days Workshop on Digital Teaching Methodologies, Content Creation & Technical Skills.



Resource Person Dr. Manawa Divekar-Joshi delivering expert talk



Resource Person Mr Amit Patwardhan delivering expert talk.

Career Guidance Program (Civil Services, Competitive Exams)



Chief Guest Shri. Dnyaneshwar Rathod addressing to Students



Shri. Sumitkumar Rao delivering his lecture on mains exam answer writing & importance of current affairs.

शब्दगंध पदाधिकारी



प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे
संपादक



उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे
सहसंपादक



प्रा. विश्वनाथ पांचाळ
सहसंपादक



डॉ. व्यंकट धुमाळ
कार्यकारी संपादक



प्रा. सूर्यकांत मस्के
कार्यकारी सहसंपादक

सहाय्यक संपादक मंडळ



डॉ. संभाजी पाटील
मराठी विभाग



प्रा. सूर्यकांत चव्हाण
हिंदी विभाग



डॉ. चंद्रशेखर दवणे
इंग्रजी विभाग



प्रा. मारोती सुद्देवाड
विज्ञान विभाग



प्रा. सोमदेव शिंदे
संस्कृत विभाग



प्रा. राजीव सावरे
रशियन विभाग



डॉ. उदयभानू सरदेशमुख
बी. टी. विभाग



प्रा. महादेव भाताडे
आय. टी. विभाग



प्रा. ज्ञानोबा आवाड
विज्ञान विभाग



डॉ. शिवराज काचे
मराठी विभाग

अक्षर जुळवणी : पार्वती ग्राफिक्स, खंडोबा गल्ली, लातूर

२०२५-२६

या वार्षिक अंकातील साहित्य स्वलिखित आहे असे गृहीत धरले आहे. साहित्यात व्यक्त झालेली मते संबंधित लेखक व कवींची आहेत. त्याच्याशी संस्थाचालक, प्राचार्य, संपादक मंडळ व मुद्रक हे सहमत असतीलच असे नाही.

Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's

Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur

Empowered Autonomous Institution

Student Council : 2025-26



फरदिन शेख
(एम.एससी. बी.टी. II)
सचिव



श्रावणी लगडे
(बी.एससी. सी.एस. III)
सहसचिव



शैलेश जामगे
(बी.एससी. सी.एस. III)
सहसचिव



आदित्य सोनकांबळे
(एम.ए. भूगोल I)
सहसचिव



गणेश गव्हाणे
(एम.ए. राज्यशास्त्र I)
समन्वयक

S.N.	Class	Name	Designation
1	M.Sc.BT II	Shaikh Fardeen Asif	Secretary
2	B.Sc.CS III	Lagde Shravani Sharadrao	Joint Secretary
3	B.Sc.(CS) III (Div: 'B')	Jamge Shailesh Balaji	Joint Secretary
4	M.A.(Geo.) I	Sonkamble Aditya Dattatraya	Joint Secretary
5	M.A. (Pol.Sci.) I	Gavhane Ganesh Pramod	Student Co-ordinator
6	B.A.- I- (Div: 'A')	Shaikh Javeriya Faruk	Member
7	B.A.- I- (Div: 'B')	Shelke Mathura Dnyaneshwar	Member
8	B.A.- I- (Div: 'C')	Kamble Kamini Bhimrao	Member
9	B.A.- II- (Div: 'A')	Uddeval Arti Ramesh	Member
10	B.A.- II- (Div: 'B')	Gidde Alfiya Abdul Rajjak	Member
11	B.A.- III- (Div: 'A')	Doifode Amruta Jalindhar	Member
12	B.A.- III- (Div: 'B')	Patade Pratik Govind	Member
13	B.Com.- I- (Div: 'A')	Prasad Pragati Chandan	Member
14	B.Com.- I- (Div: 'B')	Chincholakar Ankita Sudhakar	Member
15	B.Com.- I- (Div: 'C')	Dukare Puja Rameshwar	Member
16	B.Com.- II- (Div: 'A')	Shaikh Amir Sallauddin	Member
17	B.Com.- II- (Div: 'B')	Jagtap Tanuja Datta	Member
18	B.Com.- II- (Div: 'C')	Patange Bhumika Amarnath	Member
19	B.Com.- III- (Div: 'A')	Sude Shambhavi Dinkar	Member
20	B.Com.- III- (Div: 'B')	Bhosle Rutuja Indrajeet	Member
21	B.Com.- III- (Div: 'C')	Pathan Sadiya Nabi	Member
22	B.Sc.I	Jadhav Shreyash Shivajirao	Member
23	B.Sc.II	Momin Ayesha Rajak	Member
24	B.Sc.III	Shinde Vaishnavi Bhagwan	Member
25	B.Sc.CA I (Div: 'A')	Kotwal Zohabegam Maqsoodsab	Member
26	B.Sc.CA I (Div: 'B')	Dhalagade Rugwedraj Sanjay	Member
27	B.Sc. CA II (Div: 'A')	Bulani Nehal Ramkumar	Member
28	B.Sc. CA II (Div: 'B')	Gajile Akanksha Bharat	Member
29	B.Sc. CA II (Div: 'C')	Dhumal Risha Pradip	Member
30	B.C.A.III (Div: 'A')	Bhure Shweta Ishwar	Member
31	B.C.A.III (Div: 'B')	Pandage Dnyanoba Naganath	Member
32	B.C.A.III (Div: 'C')	Sayyad Shahin Shamad	Member
33	B.Sc.(CS) I (Div: 'A')	Dalvi Amruta Govind	Member
34	B.Sc.(CS) I (Div: 'B')	Patil Vaishnavi Deepak	Member
35	B.Sc.(CS) I (Div: 'C')	Fulware Sayali Babruwan	Member

Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's

Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur

Empowered Autonomous Institution

Student Council : 2025-26

S.N.	Class	Name	Designation
36	B.Sc.(CS) II (Div: 'A')	Jadhav Rutuja Babruvan	Member
37	B.Sc.(CS) II (Div: 'B')	Bhandare Dnyaneshwari Hanumant	Member
38	B.Sc.(CS) II (Div: 'C')	Barbhade Suryankit Sudhakar	Member
39	B.Sc.(CS) III (Div: 'A')	Gaikwad Nikhil Raghunath	Member
40	B.Sc.(CS) III (Div: 'C')	Yedle Ankita Vinod	Member
41	B.Sc.(BT) I	Kutwade Sakshi Pradip	Member
42	B.Sc.(BT) II	Deshmukh Shravani Venkatesh	Member
43	B.Sc.(BT) III	Shaikh Shaista Ahemad	Member
44	B.Voc. (CT) II	Pawar Mahadevi Govind	Member
45	B.Voc. (CT) III	Shaikh Aqsa Khalil	Member
46	B.Sc.DS I	Bondar Shweta Angad	Member
47	M.A.(Eco.) I	Rathode Divya Dhanraj	Member
48	M.A.(Eco.) II	Kamble Sakshi Tanaji	Member
49	M.A.(Geo.) II	Suryawanshi Rushikesh Bapurao	Member
50	M.A.(Pol.Sci.) I	Shinde Dattatray Dilip	Member
51	M.A.(Pol.Sci.) II	Chavan Mohini Prakash	Member
52	M.A.(Eng.) I	Dhumale Amit Santosh	Member
53	M.A.(Eng.) II	Aute Om Dinkar	Member
54	M.Com. I	More Gayatri Ajay	Member
55	M.Com. II	Mhetre Ankita Arvind	Member
56	M.Sc.(CS) I	Sonkamble Anjali Rahul	Member
57	M.Sc.(CS) II	Shaikh Aiman Fatema Ismail	Member
58	M.Sc.(Phy) I	Suryawanshi Dnyaneshwari Sudhakar	Member
59	M.Sc.(Phy) II	Khape Vaishnavi Suryakant	Member
60	M.Sc.(Chem) I	Choudhary Safura Mustak	Member
61	M.Sc.(Chem) II	Shaikh Mariya Mujeeb	Member
62	M.Sc.(Math) I	Jagtap Omkar Balaji	Member
63	M.Sc.(Math) II	Lad Sushma Suryakant	Member
64	M.Sc.(Bot.) I	Shinde Tanuja Ashok	Member
65	M.Sc.(Bot.) II	Birajdar Mayawati Dhanaji	Member
66	M.Sc.(BT) I	Shukla Abha Fatehbahadur	Member
67	M.Sc.(BT) II	Kousik Nisha Ankush	Member
68	M.Sc.(Micr.) I	Sonwane Kajal Nilkanth	Member
69	M.Sc.(Micr.) II	Shaikh Javeriya Begum Lateef	Member
70	M.Sc.(Zool.) I	Dharmadhikari Padmavati Pravinkumar	Member
71	M.Sc.(Zool.) II	Shaikh Arshafatema Pashamiya	Member
72	B.Voc.CT III	Hamdule Rasul Imran	Member
73	B.Sc.CS III	Surwase Hitesh Santram	Member
74	B.A. III	Kamble Anju Santosh	Member
75	B.C.A. III	Udate Vishvajeet Vitthal	Member
76	B.Com. III	Sarange Akanksha Mangesh	Member

संपादकीय

प्रिय विद्यार्थी, प्राध्यापक, पालक आणि वाचकहो..!

महाविद्यालयाचा वार्षिक अंक हा केवळ लेख, कविता, कथा किंवा छायाचित्रांचा संग्रह नसून तो संपूर्ण शैक्षणिक वर्षातील सर्जनशीलता, बौद्धिकता, कर्तृत्व आणि सांस्कृतिक जीवनाचा दस्तऐवज असतो. प्रत्येक लेखामागे विद्यार्थ्यांची कल्पकता, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि महाविद्यालयाच्या प्रगतीची वाटचाल दडलेली असते. शिक्षणाचा खरा उद्देश केवळ पदवी प्राप्त करणे नसून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडविणे हा आहे. वर्गातील अध्ययनाबरोबरच साहित्य, कला, क्रीडा, संशोधन, सामाजिक बांधिलकी आणि नवोपक्रम यांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, हीच आमच्या महाविद्यालयाची भूमिका होती आणि आहे. या वार्षिक अंकातून विद्यार्थ्यांच्या विचारांना, भावनांना आणि सर्जनशील अभिव्यक्तीला मुक्त विचारपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. लेख, कविता लिहिण्याकरिता पुढील विषय सुचविण्यात आले होते- कृत्रिम बुध्दीमत्ता, व्यापार युद्धाचे परिणाम, आर्थिक साम्राज्य व भू-राजकीयवाद, सामाजिक माध्यमांचा युवकांवर होणारा परिणाम, Cyber security काळाची गरज, NEP-2020 आणि रोजगार, हवामानातील बदल व मानवी जीवन, स्पर्धा परीक्षेतील बदलते प्रवाह आणि परिणाम, लोकशाहीतील स्वायत्त संस्था व आव्हाने, वाचन संस्कृतीचे बदलते स्वरुप, मानसिक आरोग्य समस्या व उपाय, भारतीय स्वातंत्र्याचा साक्षीदार वंदे मातरम, नवीन रोजगार कायदा, रोजगार प्राप्ती: एक दिव्यस्वप्न, Gen-z : नव्या क्रांतीचा उदय यासारखे विद्यार्थ्यांच्या आणि एकूणच मानवी जीवनाच्या दृष्टीने वर्तमान काळातील महत्त्वाचे विषय विद्यार्थ्यांना सुचविण्यात आले होते. विविध साहित्यप्रकारातून, संशोधनपर लेखातून वरील विषयाची उत्तम मांडणी विद्यार्थ्यांनी केली आहे. हा लेखनाचा अनुभव प्रेरणादायी, सामाजिक प्रश्नांवरील चिंतन व्यक्त करणारा तर आहेच; पण वर्षभरातील विविध सांस्कृतिक उपक्रम, कला, क्रीडा व शैक्षणिक यशाची नोंद, तसेच वर्षभरातील महत्त्वाच्या घटनांचे प्रतिबिंब वाचकांना या अंकातून अनुभवता येईल. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला चालना मिळावी, चिकित्सक विचार विकसित व्हावा आणि समाजाभिमुख दृष्टिकोन अधिक व्यापक व्हावा, अशी अपेक्षा आहे.

महाविद्यालयाच्या दृष्टीने या वर्षातील सर्वात आनंदाची बाब म्हणजे आपल्या राजर्षी शाहू महाविद्यालयास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शैक्षणिक अंकेक्षणात UG & PG मध्ये १०० टक्के गुण मिळाले असून प्रस्तुत विद्यापीठाच्या इतिहासातील हे सर्वाधिक गुण आहेत. दुसरी बाब म्हणजे महाविद्यालयास २०१३ मध्ये Autonomous दर्जा प्राप्त झाल्यानंतर मागील बारा वर्षात केलेल्या शैक्षणिक प्रगतीमुळे पुढचा टप्पा म्हणून 'Emowered Autonomous Institution' दर्जा बहाल करण्यात आला आहे. तिसरी बाब 'पीएम-उषा योजना' (PM-USHA: Pradhan Mantri Uchchatar Shiksha Abhiyan) ही भारत सरकारची एक उच्चशिक्षण क्षेत्रातील सुधारणा व विकासासाठी राबवण्यात येणारी योजना आहे. उच्च शिक्षणातील गुणवत्ता सुधारणे, देशातील विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये दर्जेदार शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे, ही 'पीएम उषा योजने'ची उद्दिष्टे आहेत. याच 'पीएम-उषा योजने'तून महाविद्यालयास यावर्षी सुमारे ५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर झाले, त्यामुळे अंतर्बाह्य रूप पालटण्यास मदत झाली. महाविद्यालयाचे 'डिजिटलायझेशन' होण्यास मदत होणार आहे. ही आपल्या सर्वांसाठी आनंदाची बाब आहे. याच अनुदानातून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय चर्चासत्रांचे, कार्यशाळेचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात आले होते.

विद्यार्थी मित्रांनो, यावर्षी महाविद्यालयाच्या उत्कृष्ट निकालाबरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक, एनएसएस, एनसीसी, आविष्कार आणि आयआयटी प्रवेश परीक्षा या क्षेत्रातही दैदिप्यमान यश संपादित करत केवळ राज्यस्तरावरच नव्हे, तर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या महाविद्यालयाचा लौकिक वाढविला आहे. प्राचार्य म्हणून मला या सर्व विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे. 'इन्सा समर रिसर्च फेलोशिप', वकृत्व, वादविवाद स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. महाविद्यालयाच्या खेळाडूंनी आपला ठसा उमटविला आहे.

'जलतरण' आणि 'कबड्डी' राष्ट्रीय स्पर्धांचे यशस्वी आयोजन महाविद्यालयाने केले आहे.

मागील तीन वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणास सुरुवात झाली असून या धोरणाने दूरगामी परिणाम साधला जाणार आहे. प्रभावी अंमलबजावणीतून NEP ची पहिली बॅच यावर्षी बाहेर पडत आहे.. मागील दोन वर्षापासून पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर या धोरणानुसार प्रारंभ करणारे मराठवाड्यातील पहिले आणि एकमेव आपले महाविद्यालय ठरले आहे. या नव्या पद्धतीमध्ये विद्यार्थ्यांनी फार लवकर हे धोरण स्वीकारल्याचे दिसून येते. विद्यार्थी मेजर- मायनर विषयांची निवड अतिशय हुशारीने करत आहेत. ही फार सकारात्मक बाब आहे. या धोरणानुसार आता बहुविद्याशाखीय शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे. व्यावसायिक कौशल्य शिकविण्यावर भर दिला जात आहे. हे धोरण भारतीय शिक्षण व्यवस्थेत अमूलाग्र बदल करणारे ठरू शकते.

या सरत्या वर्षामध्ये शिक्षण, आरोग्य, समाजकारण, राजकारण, वैचारिक आणि साहित्यविषयक क्षेत्रातील तीन मौल्यवान हिरे आपण गमावलेले आहेत. शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर, ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे हे तिघेही लातूरचे सुपुत्र होते. शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तथा माजी खा. डॉ. गोपाळराव पाटील यांनी आरोग्य, शिक्षण आणि समाजसेवा या तिन्ही क्षेत्रांत उल्लेखनीय आणि चिरकाळ टिकणारे योगदान दिले आहे. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या. 'Pursuit of Excellence' हे त्यांच्या कार्याचे ब्रीद होते. त्यांची दूरदृष्टी, लोकाभिमुख कार्यपद्धती, सेवाभाव आणि शिक्षण-आरोग्य क्षेत्रातील समर्पित नेतृत्व यांमुळे ते महाराष्ट्राच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जातात. शिव छत्रपती शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत त्यांच्या नेतृत्वात संस्थेची वाटचाल राहिलेली आहे. त्यांच्या जाण्याने संस्थेचीही अपरिमित हानी झालेली आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री मा. शिवराज पाटील चाकूरकर यांनी भारतीय संसदीय लोकशाही, प्रशासन आणि सार्वजनिक जीवनात उल्लेखनीय योगदान दिले आहे. लोकसभा अध्यक्ष म्हणून त्यांनी सभागृहाचे कामकाज संयम, शिस्त आणि संसदीय परंपरांचा आदर राखत प्रभावीपणे चालविले. केंद्रीय गृहमंत्री म्हणून अंतर्गत सुरक्षा, प्रशासन आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य केले. संसदीय मूल्ये, घटनात्मक तत्त्वे आणि लोकशाहीवरील त्यांची दृढ निष्ठा त्यांच्या कार्यातून दिसून येते. लातूर जिल्ह्याच्या विकासासाठीही त्यांनी विविध पायाभूत, शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांना चालना दिली. त्यांचे सुसंस्कृत नेतृत्व, अभ्यासू वृत्ती आणि सार्वजनिक सेवाभाव प्रेरणादायी मानले जातात.

ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू, आपल्या राजर्षी शाहू महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. जनार्दन वाघमारे यांनी शिक्षण, साहित्य, समाजचिंतन आणि सार्वजनिक जीवन या सर्व क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले आहे. इंग्रजी आणि मराठी साहित्याचे गाढे अभ्यासक म्हणून त्यांनी दलित साहित्य, सामाजिक परिवर्तन, समता आणि मानवीमूल्यांचा सखोल विचार मांडला. संस्थापक कुलगुरू म्हणून विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधनपर आणि मूल्याधिष्ठित वाटचालीचा भक्कम पाया रचला. माजी खासदार म्हणून त्यांनी शिक्षण, ग्रामीण विकास आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांना प्रभावीपणे आवाज दिला. त्यांचे विद्वत्तापूर्ण लेखन, दूरदर्शी नेतृत्व आणि समाजाभिमुख कार्य पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठेवा आहे. या तिन्ही लातूरच्या सुपुत्रांना राजर्षी शाहू महाविद्यालय प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या वतीने अभिवादन करतो.

हा वार्षिक अंक आकारास आणण्यासाठी लेखन करणारे विद्यार्थी, त्यां विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे प्राध्यापक, संपादक मंडळ, वार्षिक अंक समिती, तांत्रिक सहकारी, मुद्रक तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार. त्यांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हा अंक अधिक समृद्ध आणि आकर्षक स्वरूपात साकार झाला आहे. विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला नवे क्षितिज लाभो, त्यांच्या स्वप्नांना यशाची पंखे फुटोत आणि ज्ञान, संस्कार, संवेदनशीलता व सामाजिक उत्तरदायित्व या मूल्यांच्या आधारावर ते उज्ज्वल भविष्य घडवोत, हीच सदिच्छा !

आम्हां घरी धन शब्दांचीच रत्नें । शब्दांचीच शस्त्रे यत्न करूं
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवनें शब्दें वाटू धन जनलोकां - संत तुकाराम

(प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे)
संपादक

मनोगत

राजर्षी शाहू महाविद्यालयाचा सन २०२५-२६ चा वार्षिक अंक प्रकाशन करतांना अत्यंत आनंद होत आहे. वार्षिक अंक हा केवळ एका वर्षातील घटनांचा संग्रह नसून, संस्थेच्या प्रगतीचा, गुणवत्तेचा, शैक्षणिक वाटचालीचा आणि भविष्यातील दिशेचा आरसा असतो. या अहवालामधून महाविद्यालयाने शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, सामाजिक बांधिलकी, नवोपक्रम आणि विद्यार्थी विकास या सर्व क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कार्याचा आढावा मिळतो. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविलेले असून वार्षिक अंक हे त्यांचे दस्तऐवजीकरण करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे.

मला विशेष आनंद आहे की राजर्षी शाहू महाविद्यालयाने शिक्षणाच्या गुणवत्तेबरोबरच संशोधन, कौशल्य विकास, रोजगाराभिमुख शिक्षण, डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP-२०२०) ची प्रभावी अंमलबजावणी आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांवर विशेष भर दिला आहे. या सर्व यशामागे प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि संस्थेच्या व्यवस्थापनाचे सामूहिक योगदान आहे. २०२५-२६ हे वर्ष कृत्रिम बुध्दीमत्ता (AI), डिजिटल परिवर्तन, नविन कर सुधारणा आणि शाश्वत विकासाचे वर्ष म्हणून ओळखले जाते. सदर अंकात कु. भाग्यश्री कुंभार हिने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० यावर टाकलेला प्रकाश अभ्यासपूर्ण आहे. कु. श्रावणी लगडे यांचा GEN-Z आणि कु. मृणाल माने यांचा कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) यावरचा लेख अभ्यासपूर्ण आहे.

हा अंक प्रकाशित करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उप-प्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक प्रा. विश्वनाथ पांचाळ यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हा अंक सुबक, आकर्षक आणि वेळेत पूर्ण होऊ शकला. महाविद्यालयातील विविध विभागाचे विभागप्रमुख व प्रभारी प्राध्यापक यांनी अत्यल्प काळात आपापल्या विभागाचा अहवाल सादर करून हा अंक वेळेत प्रकाशित करण्यासाठी मदत केली, त्याबददल संपादकीय मंडळ आभार व्यक्त करते. तसेच हा अंक प्रकाशित करण्यासाठी शब्दगंध समितीच्या सर्व सदस्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. मी प्राचार्य, उप-प्राचार्य, समन्वयक गुणवत्ता हमी कक्ष तसेच शब्दगंध समितीचे सर्व सदस्य, विभागप्रमुख यांचे आभार व्यक्त करतो.

पार्वती ग्राफिक्स, लातूर यांनी वेळ देऊन हा अंक सुबक बनविण्यासाठी मोलाचे सहकार्य केले, त्यांचे संपादक मंडळ आभारी आहे. हा अंक प्रकाशित करण्यासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ज्यांनी ज्यांनी सहकार्य केले, त्या सर्वांचे संपादक मंडळ आभारी आहे.

आज प्रकाशित होत असलेला हा वार्षिक अंक म्हणजे आपल्या सर्वांच्या परिश्रमांचे, समर्पणाचे आणि उत्कृष्टतेच्या ध्यासाचे प्रतिबिंब आहे. प्रत्येक यशामागे अनेक व्यक्तींचे अथक परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्न असतात. त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

डॉ. व्यंकट धुमाळ

(कार्यकारी संपादक)

अनुक्रमणिका

अ.क्र.	लेख / कविता	पृष्ठ क्र.
	मराठी विभाग	
१	रोजगार प्राप्ती : एक दिव्यस्वप्न	१
२	राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : कागदावरील क्रांती की वर्गखोलीतील परिवर्तन?	३
३	काळाच्या ओघात	४
४	भारतीय स्वातंत्र्याचा साक्षीदार - वंदे मातरमब राष्ट्रचेतनेचा अनंत स्वर	५
५	आर्थिक साम्राज्य व भूराजकीय वाद	६
६	GEN-Z	७
७	महिला सक्षमीकरण आणि न्याय : 'मुझे पंख दोगे'	८
८	कृत्रिम बुद्धिमता (AI) आणि निर्माण होणारी आव्हाने	९
९	सामाजिक माध्यमांचा युवकांवर होणारा परिणाम	१०
१०	विश्वास	११
११	वाचन संस्कृतीत होणारे बदल	१२
१२	GEN-Z नव्या क्रांतीचा उदय	१४
	हिंदी विभाग	
१३	NEP 2020 : शिक्षा का नया सवेरा	१७
१४	प्रकृति का कोरा मन	१८
१५	राही का सपना	१९
१६	आओ भारत को विकसित बनाएँ	२०
	इंग्रजी विभाग	
१७	I	२१
१८	Why Do We Overthink ?	२२
१९	A Woman is the Heart of Every Relationship	२३
२०	The Words "If Only"	२४
२१	On the Absurdity of the First Cry	२५
२२	Impact of Social Media on Youth	२६
२३	Let Us Build a Developed India	२७
२४	Cyber Security : The Need of the Hour	२८
	संस्कृत विभाग	
२५	उपजीविकाविषयका: समस्या: ।	२९
२६	भारतीय स्वातंत्रयस्य साक्षी : वन्दे मातरमब ।	३०
२७	जलवायुपरिवर्तनं मानवीयजीवनं च ।	३१
२८	सामाजिक माध्यमानां युवकेषु प्रभाव: ।	३२
२९	वृक्षाणां पर्यावरणीयं महत्वम ।	३३
३०	संस्कृतमाहात्म्यम ।	३४
३१	वृद्ध: आम्रवृक्षश्च लघुकथा।	३४
३२	विनाशकारी पूर :।	३५
३३	संस्कृतस्य आधुनिककाले उपयोगिता।	३६
३४	मित्रताया: महत्त्वम।	३८

अ.क्र.	लेख / कविता / विभाग	पृष्ठ क्र.
	रशियन विभाग	
३५	Индийская и Русская кухни имеют много общего	३९
३६	Русский чай	४०
	वार्षिक अहवाल	
३७	मराठी विभाग	४१
३८	हिंदी विभाग	४४
३९	इंग्रजी विभाग	४६
४०	संस्कृत विभाग	६१
४१	राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग	६५
४२	इतिहास विभाग	७०
४३	अर्थशास्त्र विभाग	७७
४४	समाजशास्त्र विभाग	८३
४५	भूगोल विभाग	८५
४६	संगीत विभाग	८७
४७	बी.ए. (सी.ई.पी.) विभाग	८९
४८	वाणिज्य विभाग	९२
४९	रसायनशास्त्र विभाग	१०५
५०	गणित विभाग	१११
५१	भौतिकशास्त्र विभाग	११६
५२	वनस्पतीशास्त्र विभाग	११९
५३	संगणकशास्त्र विभाग	१२९
५४	माहितीतंत्रज्ञान विभाग	१३४
५५	सुक्ष्मजीवशास्त्र विभाग	१४९
५६	प्राणीशास्त्र विभाग	१५५
५७	जैवतंत्रज्ञान विभाग	१६६
५८	ग्रंथालय विभाग	१७५
५९	क्रीडा विभाग	१७८
६०	एन.सी.सी. (मुले)	१८६
६१	एन.सी.सी. (मुली)	१९६
६२	राष्ट्रीय सेवा योजना	१९९
६३	सांस्कृतिक विभाग	२३२
६४	अविष्कार विभाग	२३३
६५	वत्कृत्व व वादविवाद विभाग	२३५
६६	विद्यार्थी परिषद	२३८
६७	हेल्थ केअर सेंटर	२४०
६८	IIT - JAM / Placement Cell	२४४
६९	Science Association	२४९
७०	Green Club	२५१

मराठी भाषा



कु. मैथिली भाडूळे

विद्यार्थीनी प्रतिनिधी



डॉ. शिवराज काचे

प्रभारी प्राध्यापक

रोजगार प्राप्ती: एक दिव्यस्वप्न

कु. भाग्यश्री कुंभार
बी.एस्सी. (बी.टी.) द्वितीय वर्ष

भारत हा लोकसंख्येच्या शक्तीवर उभा असलेला देश आहे; पण आज हीच लोकसंख्या एक प्रश्न बनली आहे. शिक्षण घेतलं... कौशल्य मिळवलं... स्वप्न पाहिली... पण रोजगार कुठे आहे? आजच्या भारताचा सर्वात अस्वस्थ करणारा प्रश्न विचारायचा झाला, तर तो महागाई नाही, तो लोकसंख्या नाही - तो आहे रोजगार. कारण भूक शरीराला त्रास देते, पण बेरोजगारी आत्म्याला कुरतरडते. आजचा तरुण पदवीधर आहे, तांत्रिक आहे, डिजिटल आहे; पण तरीही दार ठोठावताना त्याच्या हातात अर्ज असतो, नियुक्तीपत्र नाही ही शोकांतिका केवळ व्यक्तीची नाही, ती व्यवस्थेची सामूहिक अपयश कथा आहे. रोजगाराचा प्रश्न आज इतका तीव्र झाला आहे की, तो केवळ आर्थिक राहिलेला नाही - तो सामाजिक असंतोष, मानसिक ताण आणि राजकीय अस्थिरतेचं मूळ बनत चालला आहे. म्हणूनच रोजगारप्राप्ती आज स्वप्न नाही, तर दिव्यस्वप्न वाटू लागली आहे.

भारतीय राजकारणात रोजगार हा सर्वाधिक उच्चारला जाणारा शब्द आहे; पण सर्वात कमी प्रत्यक्षात उतरलेला आश्वासक घटक आहे. प्रत्येक निवडणुकीत रोजगार निर्मितीची घोषणाबाजी होते. लाखो नोकरींची आश्वासनं दिली जातात. कौशल्य योजनांची उद्घाटनं होतात; पण प्रश्न असा आहे की, या घोषणा रोजगारात का परिवर्तित होत नाहीत? कारण धोरणं कागदावर तयार होतात, पण मनुष्यबळ समाजात तयार होतं. जेव्हा धोरण आणि वास्तव यांच्यातील दरी वाढते, तेव्हा बेरोजगारी आकड्यांत दिसत नाही - ती निराश चेहऱ्यांत दिसते.

मला वाटतं, या परिस्थितीचा मूळ आरसा जर पाहायचा असेल, तर तो भारतीय शिक्षण पद्धतीत दिसतो. भारतात शिक्षण दिलं जातं; पण रोजगारासाठी तयार केलं जात नाही. आज शिक्षण आत्मशोधाची प्रक्रिया न राहता आत्मविक्रीची स्पर्धा बनली आहे. जिथे विद्यार्थी स्वतःला 'मी कोण आहे? असा प्रश्न विचारतच नाही, तर माझी किंमत किती? असा प्रश्न विचारायला शिकतो आणि याच क्षणी नागरिक हळूहळू ग्राहकात रुपांतरित होतो. बाजाराला विचार करणारा माणूस नको असतो. कारण विचार प्रश्न निर्माण करतो आणि प्रश्न सत्तेला अस्वस्थ करतात. म्हणूनच शिक्षणाला कौशल्यामध्ये, क्रेडिट्समध्ये आणि आकड्यांमध्ये अडकवण्यात आलं; पण आपलं संविधान लिहिताना भारताला फक्त शिस्तबद्ध, आज्ञाधारक समाज बनवण्याचा विचार केला नव्हता, त्यांनी विवेकशील प्रश्न विचारणारा आणि अस्वस्थ सत्य सहन करणारा समाज घडवण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे आपण फक्त स्पर्धा शिकतो, समस्या सोडवण्याची वृत्ती, व्यवहारज्ञान यांचा अभाव राहतो. परिणामी पदवीधरांची संख्या वाढते; पण रोजगारक्षमता वाढत नाही. ही शिक्षण व्यवस्थेतील विसंगती 'शिक्षित बेरोजगारी' या धोकादायक सामाजिक वास्तवाला जन्म देते.

या शिक्षणपद्धतीचा मानसशास्त्रीय परिणाम अधिक गंभीर आहे.कारण शिक्षण विद्यार्थ्याला आश्वासन देतं - 'तू शिक, आयुष्य बदलेल' पण जेव्हा मुलाखतीत नकार मिळतो, तेव्हा त्याच मनात प्रश्न उभा राहतो - 'माझं शिक्षण अपुरं होतं की व्यवस्था अपुरी आहे?' हा प्रश्न आत्मविश्वासाला तडा देतो. प्रयत्न थांबवत नाही; पण मन थकवतं आणि जेव्हा मन थकतं, तेव्हा क्षमता असूनही प्रयत्नांची धार बोथट होते. अशा अवस्थेत बेरोजगारी केवळ आर्थिक राहत नाही - ती मानसिक आरोग्य संकट बनते.

ग्रामीण भारताचा संदर्भ घेतला, तर ती समस्या आणखी गुंतागुंतीची दिसते. गावातील तरुण बुद्धीने कमी नसतो, तो संधींनी कमी असतो. शहरात डिजिटल साधनं उद्योग संपर्क, करिअर मार्गदर्शन, इंग्रजी संवाद कौशल्य, सहज उपलब्ध असतं गावात मात्र मर्यादित प्रयोगशाळा, अपुरी तांत्रिक साधनं, करिअर मार्गदर्शनाचा अभाव आणि आर्थिक अडचणी या वास्तवाशी झूंज द्यावी लागते. त्यामुळे शहरातील

विद्यार्थी करिअरचं नियोजन करतो, तर ग्रामीण विद्यार्थी नशीब आजमावतो. ही दरी केवळ भौगोलिक नाही, ती संधीची दरी आहे.

याच ग्रामीण वास्तवात आणखी एक मूक पण घातक घटक प्रवेश करतो - व्यसन, बेरोजगारी, रिकामपण, अपयश आणि मानसिक ताण यांच्या संगमातून व्यसन जन्म घेतं. दारू, तंबाखू, गुटखा किंवा स्थानिक मादक पदार्थ हे केवळ आरोग्य बिघडवत नाहीत ते इच्छाशक्ती खिळिखळी करतात. उद्योगक्षेत्राला हवा असतो विश्वासार्ह आणि स्थिर कर्मचारी व्यसन त्याच विश्वासार्हतेवर गंज लावतो. त्यामुळे रोजगाराची दारं उघडण्याआधीच बंद होतात.

व्यसनाचा परिणाम केवळ व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही. तो कुटुंबावर आर्थिक ताण आणतो, शिक्षण खंडित करतो आणि पुढील पिढीलाही स्पर्धेत मागे ढकलतो. अशा प्रकारे व्यसन वर्तमानात नाही तर भविष्यही ग्रासू लागतं. जेव्हा निकृष्ट शिक्षण, संधीचा अभाव आणि व्यसन एकत्र येतात, तेव्हा रोजगार प्राप्ती स्वप्न राहत नाही, तर ती अशक्यतेची भावना बनते.

रोजगार समस्या सोडवण्यासाठी केवळ नोकऱ्या निर्माण करणं पुरेसं नाही. आपल्याला अशा शिक्षणाची गरज आहे. जे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक कौशल्याला ओळखेल. प्रत्येक विद्यार्थी एकसारखा नसतो. शिक्षणाने कौशल्याची विविधता मान्य करून प्रत्येकाला त्याच्या सामर्थ्यानुसार घडवलं पाहिजे. लहान वयापासूनच कौशल्य नकाशीकरण, प्रायोगिक शिक्षण, स्थानिक उद्योगांशी संलग्न प्रशिक्षण आणि उद्योजकाचे मूलभूत धडे दिले गेले, तर तरुण केवळ नोकरीसाठी अर्ज करणार नाही, तर तो संधी निर्माण करणारा बनेल.

हा दृष्टिकोन घडवण्याचं माध्यम शिक्षण आहे आणि तो दृष्टिकोन शिक्षक घडवतो. जर शिक्षकाचं ध्येय फक्त विद्यार्थ्याला परीक्षा पास करवणं असेल, तर तो कर्मचारी तयार करेल. मात्र त्याचं स्वप्न विद्यार्थ्याला सर्जनशील, धाडसी, उद्योजक बनवण्याचं असेल, तर तो रोजगारनिर्माता घडवेल. म्हणूनच परिवर्तनाची सुरुवात संसदेत नाही, ती वर्गखोलीतच होते. ती धोरणातून नाही, तर ती शिक्षकाच्या ध्येयवेड्या विचारापासून होते. ज्या दिवशी प्रत्येक शिक्षक हा विचार स्वीकारेल त्या दिवशी रोजगारप्राप्ती दिव्यस्वप्न राहणार नाही. ती भारतीय शिक्षणाची साकारलेली क्रांती बनेल.

जगातील काही देशांपैकी विशेषतः जपानसारख्या राष्ट्रांनी शिक्षणातून शिस्त, सामूहिक जबाबदारी यांनी नवोपक्रम यांची संस्कृती रुजवली. तिथे तरूण स्वतःच्या प्रगतीसोबत राष्ट्राच्या प्रगतीचा विचार करतो. आपल्याकडेही अशीच मानसिकता विकसित झाली पाहिजे. शिक्षण फक्त पगारासाठी नाही, तर समाजासाठी सुध्दा आहे. ही केवळ शैक्षणिक सुधारणा नाही - ही राष्ट्रीय सुरक्षा आणि स्थैर्याची बाब आहे. कारण रोजगार देणारी पिढी निर्माण झाली, तर बेरोजगारी आपोआप कमी होईल. सरकारची भूमिका इथे केवळ अनुदान देण्याची नसून, संधीसाठी सक्षम वातावरण तयार करण्याची आहे.

भारताकडे जगातील सर्वात मोठी तरुणाई आहे. ही केवळ लोकसंख्या नाही. ही अपार उर्जा आहे; पण ही उर्जा योग्य दिशेला वळली नाही, तर ती असंतोषात रुपांतरित होऊ शकते आणि जर ती उद्योजकाकडे वळली, तर ती जागतिक शक्तीत परिवर्तित होऊ शकते. म्हणून रोजगार हा प्रश्न राहू नये. तो राष्ट्रीय सामर्थ्याचा स्तंभ व्हावा, ही शिक्षण, शासन आणि समाज यांची संयुक्त जबाबदारी आहे.

प्रत्येक जिल्ह्यातून उद्योग उभे राहिले, प्रत्येक गावातून कौशल्याधारित व्यवसाय निर्माण झाले आणि प्रत्येक महाविद्यालयातून रोजगारनिर्माते बाहेर पडले, तर भारत आयात करणारा देश राहणार नाही. तो संधी निर्यात करणारा देश बनेल. ही मानसिकता बदलली, तर रोजगार ही समस्या न राहता भारताची ओळख बनेल. तो भारताच्या प्रगतीचा सर्वात मोठा अभिमान बनेल. म्हणूनच रोजगाराला समस्या म्हणून नव्हे, तर भारताच्या नव्या शक्तीचा आधार म्हणून पाहण्याची वेळ हीच ती - 'रोजगार एक - सर्जनशीलतेची संधी'

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०: कागदावरील क्रांती की वर्गखोलीतील परिवर्तन ?

✍ कु. भाग्यश्री कुंभार
बी.एस्सी. (बी.टी.) द्वितीय वर्ष

शिक्षण हे कोणत्याही राष्ट्राचा आत्मा असते. अर्थसंकल्प बदलतात, सरकारे बदलतात, योजना बदलतात; पण शिक्षणाची दिशा बदलली, तर पिढ्या बदलतात. म्हणूनच राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) -२०२० जाहीर झाले तेव्हा त्याकडे केवळ शैक्षणिक सुधारणेच्या दृष्टीने न पाहता, राष्ट्राच्या भविष्यातील परिवर्तनाची घोषणा म्हणून पाहिलं गेले. या धोरणाने विद्यार्थी केंद्रितता, बहुविषयक शिक्षण, कौशल्याधारित अभ्यासक्रम, नवोपक्रम, संशोधन आणि रोजगारक्षमतेचा मार्ग दाखवला. नवे शैक्षणिक धोरण सांगतं - 'विद्यार्थ्याला माहिती देऊ नका त्याला विचार करायला शिकवा' परंतु प्रश्न असा आहे - हा विचार वर्गखोलीपर्यंत पोहोचला आहे का?

धोरणातील आत्मा आणि वास्तवातील अनुभव यांच्यातील अंतर शांतपणे जाणवतं. काही महाविद्यालयांमध्ये अभ्यासक्रम बदलला असेल, विषयांची रचना नव्याने आखली गेली असेल; परंतु अध्यापनाची पद्धत अजूनही पारंपरिक चौकटीत अडकलेली दिसते. वर्गात माहितीचा ओघ असतो; पण संवादाचा अभाव असतो. नोट्स सांगितल्या जातात, स्लाइड्स दाखवल्या जातात, अभ्यासक्रम पूर्ण केला जातो; परंतु 'हा विषय आपण का शिकतो?' 'याचा जीवनाशी काय संबंध आहे?', 'या ज्ञानातून आपण काय निर्माण करु शकतो?' या प्रश्नांना पुरेशी जागा मिळतेच असं नाही.

शिक्षणाचा उद्देश केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे नसतो तो समज निर्माण करणे असतो. जर विदयार्थी संकल्पना न समजता केवळ परीक्षा पास होत असेल, तर तो पदवीधर होईल; पण तो सक्षम नागरिक बनेलच असं नाही आणि हेच अंतर पुढे जाऊन रोजगाराच्या प्रश्नात रुपांतरित होतं. NEP-२०२० ने बहुविषयकता आणि विषय निवडीची लवचिकता यावर भर दिला. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार विषय निवडण्याची संधी देण्याचा हेतू मांडला गेला. परंतु काही ठिकाणी ही प्रक्रिया केवळ ओपचारिक राहते. सुरुवातीला विषयांची यादी दिली जाते. मात्र शिक्षकांची उपलब्धता, वेळापत्रकाची रचना किंवा संस्थात्मक मर्यादा यांमुळे शेवटी सर्व विद्यार्थ्यांना समान विषय देण्याचा पर्याय सुचवला किंवा स्वीकारला जातो. व्यवस्थापनाच्या दृष्टीने ही पद्धत सोयीची असू शकते, परंतु विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक क्षमतेचा आणि आवडींचा पुरेसा विचार होतो का - हा प्रश्न राहतोच की?

प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो. कोणाची विश्लेषण क्षमता उत्तम असते. कोण सर्जनशील असतो. कोण नेतृत्वगुणांनी समृद्ध असतो. समान संधी देणं आवश्यक आहे; पण समानतेच्या नावाखाली एकसारखेपणा लादणं हा शिक्षणाचा हेतू नाही. शिक्षण जर व्यक्तिमत्त्वाला वाव देणार नसेल, तर ते केवळ प्रमाणपत्र निर्माण करेल.

येथे हेतू दोषारोपाचा मुळीच नाही. शिक्षणसंस्था अनेक मर्यादांना सामोरं जात असतात - शिक्षकांची कमतरता, निधीची बंधनं, पायाभूत सुविधांची मर्यादा, ग्रामीण भागात डिजिटल साधनांचा अभाव हे वास्तव आहे, परंतु या मर्यादांपेक्षा मोठा प्रश्न मनोवृत्तीचा आहे. अध्यापन माहिती केंद्रित राहणार की, विद्यार्थी केंद्रित होणार हा निर्णय वर्गात घेतला जातो. शिक्षकाने जर का या प्रश्नाला महत्त्व दिलं, विद्यार्थ्यांना विचार मांडायला संधी दिली, तर संसाधनांच्या मर्यादांनाही ओलांडता येऊ शकतं.

रोजगाराच्या संदर्भात हा मुद्दा अधिक गंभीर ठरतो. भारतात दरवर्षी विद्यार्थी पदवीधर होतात, पण सर्वच रोजगारक्षम असतात असं म्हणता येत नाही. कारण रोजगार हा केवळ पदवीवर अवलंबून नसतो तो कौशल्य, संकल्पनात्मक स्पष्टता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि संवाद कौशल्य यांवर अवलंबून असतो. जर शिक्षणाने ही क्षमता विकसित केली नाही, तर रोजगाराचा प्रश्न कायम राहील.

NEP-२०२० ने व्यावसायिक शिक्षण, इंटर्नशिप, उद्योग संलग्नता आणि उद्योजकतेला प्रोत्साहन दिलं आहे; पण

काही ठिकाणी इंटर्नशिप केवळ कागदोपत्री राहते, उद्योग संपर्क मर्यादित असतो आणि विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव कमी मिळतो. अशा परिस्थितीत धोरण आणि वास्तव यांच्यातील दरी वाढते. याचा खरा उद्देश नोकरी देणारा विद्यार्थी घडवणं हा असला पाहिजे. जर विद्यार्थी फक्त नियुक्तीपत्राची वाट पाहत राहिला, तर बेरोजगारी वाढेल. मात्र शिक्षणाने त्याला उद्योजगता, नवोपक्रम आणि सामाजिक जबाबदारी शिकवली, तर तो स्वतः उभा राहिल आणि इतरांनाही उभं करेल. यासाठी आवश्यक आहे - 'शिक्षक सक्षमीकरण'

तसेच विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचा आणि समुपदेशनाचा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही. बेरोजगारीची भीती, स्पर्धेचा ताण आणि अनिश्चितता यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक दबावाखाली असतात. शिक्षणाने त्यांना आत्मविश्वास, संवाद कौशल्य आणि भावनिक स्थैर्य दिलं पाहिजे. आत्मविश्वास असेलला तरुण अपयशानंतरही पुन्हा उभा राहतो हीच रोजगार संस्कृतीची पायाभरणी आहे.

शैक्षणिक धोरणाचा आत्मा आणि वर्गखोलीतील अनुभव यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी संस्थात्मक प्रामाणिकपणा आवश्यक आहे. केवळ अहवालांमध्ये अंमलबजावणी दाखवणं पुरेसं नाही. विदयार्थ्यांच्या अनुभवात बदल दिसला पाहिजे, विषय समजला पाहिजे, संवाद वाढला पाहिजे आणि शिकण्याचा अर्थ व गोडी निर्माण झाली पाहिजे.

ज्या दिवशी शिक्षण माहितीच्या पलीकडे जाईल - त्या दिवशी धोरणाचा आत्मा साकार होईल तेव्हाच शिक्षण केवळ कागदावरील आराखडा राहणार नाही. ते राष्ट्रनिर्मितीची खरी शक्ती बनेल.

शेवटी ही संधी आहे. क्रांतीचे बीज आहे; पण बीज पेरुनच चालत नाही, तर पाणी, माती आणि काळजी घ्यावी लागते. शासनाची जबाबदारी आहे, संसाधनांची, शिक्षकांची जबाबदारी आहे. दृष्टिकोनाची, विद्यार्थ्यांची जबाबदारी आहे. ज्या दिवशी या तिन्ही शक्ती एकत्र येतील, त्या दिवशी रोजगार हा प्रश्न राहणार नाही. तो भारताची ओळख बनेल आणि शिक्षण खऱ्या अर्थाने राष्ट्रशक्ती ठरेल.

काळाच्या ओघात....

उद्देवाल आरती रमेश

बी. ए. द्वितीय वर्ष

काळाच्या ओघात मानवी पिढी दोन पाउले पुढे आली
मानवी प्रगतीत वाढ झाली; पण थोडीशी गती मंदावली
नवनवीन माध्यमांपुढे पारंपरिकतेने मान वाकवली
आता डिजीटल माध्यमे मात्र त्वेषाने पुढे आली.

पुस्तकांची जागा कालांतराने भ्रमणध्वनीने घेतली
वाचकांपुढे डिजीटल माध्यमांनी वेळीची मर्यादा आखली
माहितीचा अवाका भरपूर; पण वेळ मर्यादित
काळाच्या ओघात बदलत चालली वाचनाची रीत

माहिती तीच, वाचक तोच, माध्यम मात्र बदलले
व्हॉटसॲपवरचे संदेश वाचण्यातच मन मग्न झाले
वाचता वाचता रंगून जायचं पुस्तकांच्या पानांत
कधी कादंबरीच्या कथानकात, तर कधी शब्दांच्या विश्वात

काळाच्या ओघात वाचनाची गोडी कमी झाली
पुस्तकांच्या पानांची जागा मात्र स्क्रोलने घेतली
डिजीटल माध्यमामुळे वाचनाचे स्वरुप बदलले मान्य करुया
पूर्वजाकडून मिळालेली वाचन संस्कृती आजही तेवत ठेऊया !



भारतीय स्वातंत्र्याचा साक्षीदार - वंदे मातरम राष्ट्रचेतनेचा अनंत स्वर

✍ कु. भाग्यश्री कुंभार
बी.एस्सी. (बी.टी.) द्वितीय वर्ष

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात काही शब्द असे आहेत की, ज्यांनी केवळ उच्चार घडवले नाहीत, तर इतिहास घडवला आहे. 'वंदे मातरम' हा त्यापैकीच एक पवित्र घोष. हा घोष जरी केवळ काही शब्दांचा असला, तरी त्यामागे शतकांचा संस्कार, वेदनेची जाणीव, संघर्षाची ठिणगी आणि स्वातंत्र्याची आकांक्षा जडलेली आहे. तो केवळ क्रांतीचा नारा नव्हता, तो आत्मसन्मानाचा जागर होता. गुलामगिरीच्या अंधारात भारतीय मनाला ज्याने प्रकाश दिला तो हा घोष - 'वंदे मातरम' भारतीय अस्मितेचा, आत्मसन्मानाचा आणि राष्ट्रनिष्ठेचा शाश्वत मंत्र आहे. आजच्या लोकशाही भारतालाही या घोषाने आत्मपरीक्षणाची हाक दिली आहे. संसदीय दृष्टिकोनातून पाहिले, तर वंदे मातरम हे केवळ भूतकाळाचे गौरवगीत नसून वर्तमानाची जबाबदारी आणि भविष्याचे मार्गदर्शक तत्त्व आहे.

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी रचलेले 'वंदे मातरम हे गीत प्रथम आनंदमठ या कादंबरीत प्रकटले गेले. त्या काळात हे गीत केवळ साहित्य नव्हते, तर ते एक वैचारिक शस्त्र बनले होतं. 'मातरम' या शब्दात मातृभूमीला देवीच्या स्वरुपात पाहण्याची भारतीय परंपरा आहे. भूमी ही केवळ भौगोलिक सीमारेषा नसून ती संस्कृती, इतिहास, भाषा, परंपरा आणि संघर्ष यांचा समुच्चय आहे. एखादया घोषणेची सत्ताधाऱ्यांना भीती वाटली, तर त्यात परिवर्तनाची ताकद असते हे 'वंदे मातरम' ने सिद्ध केले आहे. वंदे मातरम आणि जन गण मन यांचा सन्मान राखणे म्हणजे इतिहास आणि वर्तमान यांचा सुसंवाद राखणे होय.

वन्दे मातरम - अधिकृत पहिली दोन कडवी

वन्दे मातरम

सुजलां सुफलां मलयजशीतलाम

शस्यशामलां मातरम

वन्दे मातरम

शुभ्र ज्योत्स्ना पुलकितयामिनीम

फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम,

सुहासिनीं सुमधूर भाषिणीम,

सुखदां वरदां मातरम

वन्दे मातरम

या ओळींमध्ये आलेले मातृभूमीचं वर्णन केवळ भौगोलिक नाही, तर भावनिक आणि सांस्कृतिक आहे. सुजलामब सुफलाम हे समृध्दीचे प्रतिक, शस्यश्यामलाम ही कष्टकरी शेतकऱ्यांच्या श्रमांची साक्ष, सुहासिनी सुमधूर भाषिणीम ही संवादशील आणि सौहार्दपूर्ण समाजाची ओळख. या प्रत्येक प्रतिमेत राष्ट्रनिर्मितीची दिशा आहे.

आजच्या वर्ममानात या गीताचा अर्थ अधिक व्यापक झाला आहे. मातृभूमी सुजलाम आहे, तर तिच्या नद्यांचे रक्षण करणे हे आपलेच कर्तव्य आहे. ती सुफलाम आहे, तर प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळाला पाहिजे. ती सुखदां वरदां आहे, तर प्रत्येक नागरिकाला शिक्षण, रोजगार आणि सुरक्षा मिळाली पाहिजे. राष्ट्रप्रेम हे केवळ भावनेत न राहता धोरणांत आणि कृतीत उतरलं, तरच आणि तरच या घोषाचा खरा सन्मान होईल.

आजच्या काळात 'वंदे मातरम्' चा अर्थ केवळ ऐतिहासिक संदर्भापुरता मर्यादित नाही. तो आधुनिक भारताच्या जबाबदाऱ्यांशी निगडित आहे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीत, शिक्षणाच्या विस्तारात, स्त्रीसक्षमीकरणात, संविधान सक्षमीकरणात, पर्यावरणसंवर्धनात आणि सामाजिक समतेत प्रामाणिक प्रयत्न दिसले तरच या घोषाचा आत्मा जिवंत राहील. राष्ट्रप्रेम घोषणांनी सिद्ध होत नाही. ते कृतीतून प्रकट होते.

कधी कधी हा घोष वादाच्या केंद्रस्थानी येतो; परंतु वैचारिक दृष्टीने पाहिलं, तर तो वादाचा विषय नसून संवादाचा विषय आहे. कारण राष्ट्रप्रेम विभाजनासाठी नसतं. ते एकात्मतेसाठी असतं मतभेद असू शकतात; पण राष्ट्रनिष्ठा समान असावी लागते. वंदे मातरम् हा त्या सामायिक निष्ठेचा स्वर आहे.

ही घोषणा आपल्याला स्मरण करुन देते की, स्वातंत्र्य केवळ १९४७ मध्ये मिळालेलं राजकीय स्वातंत्र्य नाही. ते सतत जपायचं आणि विकसित करायचं मूल्य आहे. प्रत्येक निर्णय, प्रत्येक कायदा, प्रत्येक धोरण मातृभूमीच्या उन्नतीसाठी असेल, तर तोच खरा 'वंदे मातरम' चा अर्थ आहे. घोषणांच्या राजकारणापलीकडे जाऊन मूल्यांच्या राष्ट्रकारणाची गरज आज अधिक आहे.

शेवटी 'वंदे मातरम् हा भारतीय स्वातंत्र्याचा साक्षीदार आहे; पण त्याहून अधिक तो भारतीय जबाबदारीचा प्रहरी आहे. जोपर्यंत युवक जागृत आहेत, लोकशाहीचा आत्मा जिवंत आहे आणि मातृभूमीप्रती समर्पणाची ज्योत प्रखर आहे तोपर्यंत हा घोष केवळ शब्द राहणार नाही. तो भारताच्या स्वाभिमानाचा, एकात्मतेचा आणि भविष्याचा अखंड दीपस्तंभ असणार आहे.



आर्थिक साम्राज्य व भूराजकीय वाद

संकेत अरुण कुलकर्णी
बी.एस्सी. (बी.टी.) द्वितीय वर्ष

मानवाचा इतिहास सत्तेच्या संघर्षाचा इतिहास आहे. मानव हा सत्तेच्या जोरावर जमिनीसाठी वाद करत आला आहे; परंतु २१ व्या शतकात मानव हा आपल्या तिजोरीच्या जोरावर युद्ध करत आहे. जो देश सर्वाधिक धनवान आहे तो सर्वशक्तीशाली मानला जात आहे. उदा. अमेरिकासारखे देश अमेरिका हा जगातील सर्वशक्तीशाली देश मानला जातो. तो तिजोरीच्या जोरावर ताकद दाखवत आहे. जसे कोणत्याही देशावर वार करणे, कोणत्याही देशाचा विरोध करणे किंवा निर्बंध लावणे इत्यादी कामे अमेरिका करत आहे. याला आर्थिक साम्राज्यवाद म्हणतात. विकसित देश आपल्या ताकतीच्या जोरावर विकसनशील व गरीब देशांवर आपला ताबा मिळवण्याचा प्रयत्न करत असतो.

अशा प्रकारे भांडवलशाही देश आपले साम्राज्य वाढवत आहेत. या माध्यमातून ते दुसऱ्या देशातील खनिजे, त्यांचे साठे, ताब्यात घेतात व आपले साम्राज्य वाढवतात. यामुळे दोन्ही देशांच्या जनतेचे नुकसानच होते. युद्धामुळे तेथील घरांचे, शाळांचे आणि दवाखान्यांचे नुकसान होते. जमिनीच्या एखाद्या तुकड्यासाठी असो किंवा हजारो एकरसाठी असो, असे वाद पैश्यांच्या जोरावर दाबले जातात. यामध्ये गरीब देशांचे व सर्वसामान्यांचे नुकसानच होत आहे.

यामध्ये मोठ्या कंपन्यांचा फायदा होतो कारण कमी पैशांमध्ये त्यांना मोठा जमिनीचा भाग मिळतो. या कारणामुळे ज्या ठिकाणी विकासाची खरीच गरज आहे, तेथील लोक जमीन देत नाहीत व विकास थांबतो. या सर्व गोष्टींमध्ये सरकारने लक्ष घातले पाहिजे व दोन्ही बाबींचा विचार करुन निर्णय घेतला पाहिजे.

GEN Z :

✍ लगडे श्रावणी एस.
बी.एस्सी. सीएस (तृतीय वर्ष)

आम्ही फक्त पुढची पिढी नाही

आम्ही बदल घडवणारी पिढी आहोत.

डिजिटल युगात जन्मलेली GEN-Z ही पहिली पिढी आहे. त्यांनी केवळ तंत्रज्ञानाला स्वीकारलेच नाही, तर तंत्रज्ञानासोबतच ती वाढली आहे. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया ही आमच्यासाठी केवळ मनोरंजनाची साधने नाहीत, ती आमच्या विचारांची, अभिव्यक्तीतची आणि संधीची नवी दारे आहेत. Instagram आणि YouTube सारख्या माध्यमांमुळे आजचा तरुण केवळ प्रेक्षक नसून निर्माताही बनला आहे.

GEN Z म्हणजे फक्त ट्रेंड्स आणि रील्स नाहीत.

ही पिढी प्रश्न विचारते

ही पिढी अन्यायाविरुद्ध आवाज उठवते

ही पिढी मानसिक आरोग्य, लैंगिक समानता, पर्यावरण संरक्षण Greta Thunberg यांसारख्या विषयांवर खुलेपणाने बोलते. यांसारख्या तरुण कार्यकर्त्यांकडून प्रेरणा घेऊन आजची तरुणाई शांत राहण्याऐवजी कृती करण्यावर विश्वास ठेवते.

भारतातील महाविद्यालयीन तरुणांमध्येही मोठा बदल दिसून येतो आहे. यशाची व्याख्या अलीकडे बदलली आहे. डॉक्टर किंवा अभियंता होणे, हेच अंतिम ध्येय राहिलेले नाही. आजचा विद्यार्थी स्टार्टअप्स, फ्रीलान्सिंग, क्रीडा, सामाजिक कार्य, डिजिटल क्रिएशन, प्रोग्रामिंग अशा विविध क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करत आहे. आम्हाला केवळ नोकरी नको आहे. आम्हाला उद्देशपूर्ण आयुष्य हवे आहे.

होय! आव्हानेही आहेत.

सोशल मीडियामुळे होणारी तुलना, शैक्षणिक दबाव, करिअरची अनिश्चितता, मोठं काहीतरी करुन दाखवण्याची सततची अपेक्षा. या सर्वांचा सामना आम्हाला करावा लागतो; पण या दबावाखाली न तुटता त्यातूनच अधिक मजबूत होण्याची क्षमता GEN Z मध्ये आहे.

आम्ही प्रामाणिकपणावर विश्वास ठेवतो.

आम्ही समावेशकतेवर विश्वास ठेवतो.

आम्ही बदल घडविण्यावर विश्वास ठेवतो.

GEN Z भविष्याची वाट पाहत नाही. आम्हीच भविष्य घडवत आहोत. ही बंडखोरी नाही. ही सजगतेची क्रांती आहे.

GEN Z नव्या क्रांतीचा उदय ही केवळ एक संकल्पना नाही, तर वर्गखोल्यांत, स्टार्टअप्समध्ये, सामाजिक चळवळीमध्ये आणि रोजच्या संवादात घडणारी वास्तवता आहे.

'आजची आमची जिद्दच उद्याच्या जगाचे रुप ठरवणार आहे'.



महिला सक्षमीकरण आणि न्यायः 'मुझे पंख दोगेफ

✍ प्रियंका कांदे पाटील

प्राध्यापक सुक्ष्मजीवशास्त्र

भारतीय स्त्री-पुरुष नेहमी मुलगा होण्यासाठी प्रार्थना करतात. मुलीसाठी नाही. ज्येष्ठांचे आशीर्वाद मुलासाठी असतात, मुलीसाठी नाहीत; पण संपत्ती हवी असली की, लोक माता लक्ष्मीकडे प्रार्थना करतात. शिक्षणात यश हवे असले की, लोक माता सरस्वतीकडे प्रार्थना करतात. तणाव दूर करण्यासाठी लोक माता अंबाबाईकडे प्रार्थना करतात आणि राक्षसांपासून सुटका हवी असली की, लोक माता कालीकडे प्रार्थना करतात. आता मला सांगा लोक ज्या देवतांकडे प्रार्थना करतात त्या स्त्री आहेत, तेव्हा घरात मुलगी असण्यास हेच लोक का संकोच करतात?

महिला केवळ आपल्या घराचा कणा नाहीत, तर त्या आपल्या भविष्याच्या शिल्पकार आहेत. शतकानुशतके त्यांचा आवाज दाबला गेला आहे. त्यांच्या स्वप्नांकडे दुर्लक्ष केले गेले आहे. त्यांच्या क्षमतेचा कमी अंदाज लावला गेला आहे. महिलांचे सक्षमीकरण करणे ही काही देणगी नाही. तो न्याय आहे. तो उपकार नसून ती एक गरज आहे. कारण जेव्हा स्त्रियांचा उत्कर्ष होतो तेव्हा सक्षमीकरणाची सुरुवात संधीपासून होते. शिक्षण ही स्वातंत्र्याची दारे उघडणारी गुरुकिल्ली आहे. आर्थिक स्वातंत्र्य महिलांना निवडीची शक्ती देते. जेव्हा हे आधारस्तंभ मजबूत होतात, तेव्हा स्त्रिया केवळ स्वतःचे जीवन बदलत नाहीत, तर त्या संपूर्ण समाजाचे परिवर्तन घडवून आणतात.

सक्षम स्त्रिया हे संकट नसून एक वरदान आहेत. त्या शास्त्रज्ञ बनून शोध लावत आहेत. शेतकरी बनून राष्ट्राचे पोट भरत आहेत. नेत्या बनून समाजाला दिशा देत आहेत आणि माता बनून पिढ्या घडवत आहेत. एका महिलेला सक्षम करणे म्हणजे मानवतेलाच सक्षम करणे होय. तिची स्वप्ने, तिचा आवाज आणि तिचे जीवन महत्त्वाचे आहे. एखादी स्त्री खंबीरपणे उभी राहते, तेव्हा जग संकुचित राहू शकत नाही. एखादी स्त्री चमकते, तेव्हा संपूर्ण जग उजळून निघते. महिलांचे सक्षमीकरण हे केवळ महिलांबद्दल नाही ते आपल्या सर्वांबद्दल आहे. 'स्त्रीवर प्रेम केल्यामुळेच ती सुंदर भासते. सौंदर्यामुळे तिच्यावर प्रेम होत नाही' बलात्कार हा केवळ एका महिलेविरुद्धचा गुन्हा नाही तो मानवतेविरुध्द, प्रतिष्ठेविरुध्द आणि आपल्या समाजाच्या आत्म्याविरुद्धचा गुन्हा आहे. जेव्हा जेव्हा अशी घटना घडते, तेव्हा तेव्हा केवळ एक महिलाच पीडित नसते, तर संपूर्ण राष्ट्राची सदसद्विवेकबुद्धी रक्ताळते. ही हिंसा वासनेबद्दल नसून ती सत्ता, क्रुरता आणि ताकदीच्या दुरुपयोगाबद्दल आहे. याविषयी मौन तोडणे हे आपले कर्तव्य आहे. १७ व्या शतकात शिवाजी महाराज त्यांच्या कडक नैतिक संहितेसाठी आणि महिलांच्या संरक्षणासाठी ओळखले जात असत. त्यांनी बलात्कार करणाऱ्यांना इतकी कठोर शिक्षा दिली की, पुन्हा असा गुन्हा करण्याचे धाडस कोणीही केले नाही. त्यांनी सिद्ध केले की, खऱ्या नेतृत्वाचा अर्थ या भूमीतील प्रत्येक कन्येच्या सन्मानाचे रक्षण करणे हा आहे; परंतु २०२५-२०२६ मध्येही आपल्याला अशा घटना ऐकायला मिळतात ज्या आपल्या सदसद्विवेकबुद्धीला हादरवून सोडतात. पीडित न्यायाची प्रतीक्षा करतात, कुटुंबे शांतपणे सोसतात आणि समाज लाजेने ग्रासलेला असतो. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदाहरणातून शिकायला हवे. आपण गप्प बसणार नाही, आपण कठोर कायदे, जलद खटले आणि सर्वात महत्वाचे म्हणजे मानसिकतेत बदल करण्याची मागणी करु. कारण आपण अशी व्यवस्था निर्माण करायला हवी की, जिथे न्याय जलद मिळेल, जिथे प्रतिष्ठेचे रक्षण होईल आणि जिथे प्रत्येक महिला न घाबरता मुक्तपणे वावरु शकेल? कारण महिलांचे रक्षण करणे हा केवळ इतिहासाचा धडा नाही, तर ते

आजचे तातडीचे कर्तव्य आहे.

लैंगिक शिक्षण म्हणजे लवकर सक्रिय होण्यास प्रोत्साहन देणे नाही, तर लवकर जबाबदारी घेण्यास प्रोत्साहित करणे होय. आपल्या मुलांना शिकवायला हवे की, त्यांचे शरीर मौल्यवान आहे. त्यांच्या निवडी महत्त्वाच्या आहेत आणि त्यांच्या प्रतिष्ठेचा नेहमी सन्मान केला पाहिजे. आपण त्यांना ज्ञान देतो, तेव्हा आपण त्यांना स्वतःचे रक्षण करण्याची, इतरांचा आदर करण्याची आणि एक निरोगी, सुरक्षित समाज निर्माण करण्याची शक्ती देतो.

मैने किताबे मांगी, मुझे चुल्हा मिला
मैने दोस्त मांगा, मुझे दुल्हा मिला
मैने सपने मांगे, मुझे प्रतिबंध मिले
मैने संबंध मांगे, मुझे अनुबंध मिले
कल मैने धरती मांगी थी, मुझे समाधी मिली थी
अब मैं आकाश माँगती हूँ मुझे पंख दोगे.....

'PANKH' चा पूर्ण अर्थः P – Power (शक्ती) - महिलांना त्यांच्या अंतर्गत शक्तीची ओळख करुन देणे आणि त्याचा उपयोग करण्यास प्रोत्साहित करणे.

A – Awareness (जागरुकता) - हक्क, आरोग्य, शिक्षण आणि संधीबद्दल ज्ञान पसरवणे.

N – Nurture (संगोपन) - वाढ, आत्मविश्वास आणि नेतृत्व कौशल्यांना समर्थन देणे.

K - Knowledge (ज्ञान) - स्वातंत्र्यासाठी शिक्षण आणि कौशल्य विकासाला प्रोत्साहन देणे.

H - Hope (आशा) - उज्ज्वल, आत्मनिर्भर भविष्यावर विश्वास निर्माण करणे.

कृत्रिम बुध्दिमत्ता (AI) आणि निर्माण होणारी आव्हाने

कु. मृणाल ए. माने
बी.एस्सी. सीएस (तृतीय वर्ष)

मानवाने आपल्या बुद्धीच्या बळावर यत्रांची निर्मिती केली; परंतु आज अशी वेळ आली आहे की, ही यंत्रे मानवासारखी विचार करु लागली आहेत. या अद्भूत परिवर्तनामागे असलेली शक्ती म्हणजे कृत्रिम बुद्धीमत्ता (Artificial Intelligence - AI) संगणक किंवा मशीनरींना शिकण्याची, निर्णय घेण्याची आणि समस्यांचे निराकरण करण्याची क्षमता होय. आज ही केवळ वैज्ञानिक कल्पना नसून आधुनिक समाजाच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावणारी वास्तव शक्ती बनली आहे.

AI: बदलत्या जगाचा आधार

आज आपण नकळत AI चा वापर करत आहोत. मोबाईलमधील व्हॉइस कमांड, सोशल मीडियावरील आपल्याला आवडणाऱ्या पोस्टचे सुचवलेले पर्याय, ऑनलाइन खरेदी करताना दिसणाऱ्या शिफारशी, बँकिंग व्यवहारामधील सुरक्षा तपासणी आणि मार्गदर्शन करणारी नेव्हिगेशन प्रणाली या सर्व सेवा AI वर आधारित आहेत. यामुळे मानवी जीवन अधिक सोयीस्कर, जलद आणि अचूक झाले आहे.

विविध क्षेत्रांतील AI चे योगदान -

AI च्या साहाय्याने रोगांचे अचूक निदान, वैद्यकीय प्रतिमांचे विश्लेषण आणि उपचार पद्धती सुधारल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक पातळीवर शिकण्याची संधी मिळते.

AI मुळे निर्माण होणारी आव्हाने

१.रोजगारावर परिणाम

२. गोपनीयतेचा प्रश्न

३. नैतिकतेचा प्रश्न

४. तंत्रज्ञानावर अवलंबित्व

५. बनावट माहितीचा प्रसार

६. सायबर सुरक्षा धोके

निष्कर्ष -

१) कृत्रिम बुद्धिमत्ता ही आधुनिक युगातील परिवर्तनाची प्रमुख शक्ती आहे. ती मानवी जीवन अधिक सोपे, कार्यक्षम आणि प्रगत बनवत आहे; परंतु तिच्या वाढत्या प्रभावामुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

२) जागरुकता, नैतिकता आणि योग्य नियोजन यांच्या साहारय्याने AI मानवजातीसाठी वरदान ठरु शकते.

३) AI च्या मदतीने तंत्रज्ञानाचा स्वामी बनणे हीच खरी प्रगती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही प्रगतीचा मार्गदर्शक दीप आहे.



सामाजिक माध्यमांचा युवकांवर होणारा परिणाम

पाटील अर्पिता शिवराज

बी.एस्सी. सीएस (तृतीय वर्ष)

सामाजिक माध्यमांचा युवकांवर होणार परिणाम आपण पाहिला तर तो सर्वाधिक मोबाईलचा दिसेल. हल्लीच्या काळात युवकांवर मोबाईलच्या व्यसनामुळे जास्त परिणाम होत आहे. मला माहिती आहे मोबाईल हा गरजेचा आहे व त्यातून आपल्याला खूप गोष्टी शिकायला भेटतात. खूप गोष्टींचा फायदाही आपल्याला होतो. मोबाईलमुळे युवकांवर गुन्हेगारीचे परिणाम जास्त होताना दिसून येत आहेत. मोबाईल हे घातक माध्यम आपल्याला ज्ञान मिळावून देतो. जगाशी नातं जोडायला शिकवतो; पण स्वत:ला एकट करून सोडतो. वेळ वाया जातो, स्वप्न मागेच राहून जातात. आपल्या व्यक्तीसाठी आपण वेळ देत नाहीत. हा युवकांवर होणारा गंभीर परिणाम आजच्या समाजात दिसून येत आहे. या माध्यमांचा चांगलाही उपयोग तेवढाच होतो आणि वाईटपण परिणाम तेवढाच होत असतो. आजच्या पिढीतील युवकांना या माध्यमापासून दूर ठेवणे गरजेचे आहे. वेळेचा अपव्यय होतो, अभ्यासाकडे दुर्लक्ष होते. युवकांवर मानसिक ताण आणि नैराश्य वाढते.

नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. युवक व्यसनाच्या अधीन जात आहेत. सामाजिक माध्यमांची वाढती दुनिया, येणाऱ्या पढीची, युवकांची नवीन कहाणी झाली आहे. सामाजिक माध्यमे ही दोन्ही बाजूंनी धार असलेली तलवार आहेत. त्यामुळे आपण कोणत्याही बाजूने गेलो, तरी आपणच अडकणार आहेत.

फेक आयुष्य हे आपल्याला रील्स, व्हिडीओ पाहून असे वाटते की, हे आपल्याकडे पाहिजे. मात्र आपल्या युवकांना हे समजत नाही. रियल आयुष्यामध्ये होणाऱ्या गोष्टी अशा प्रकारे नसतात. त्या गोष्टींचा परिणाम आपल्या युवकांवरती जास्त होत चाललेला आहे. फेक आयुष्याची स्पर्धा करताना युवक हल्ली जास्त दिसत आहेत. सायबर bullying वाढली

आहे. कोणत्या तरी अनोळखी व्यक्तीच्या व्हिडीओखाली जाऊन trolling, harassment करणे या गोष्टी युवकांमध्ये जास्त दिसून येत आहेत.

समाजामध्ये privacy risk म्हणजे personal information leak होण्याचा धोका अधिक प्रमाणात युवांवर होत आहे. सामाजिक माध्यमांमुळे युवकांवर वाईट संगतीचा प्रभाव पडत आहे. चुकीच्या सवयी लागत आहेत. एकमेकांबद्दल गैरसमज आणि अफवा पसरत आहेत.

या गोष्टीमुळे दबाब वाढून युवक चुकीचे निर्णय घेऊन चुकीच्या मार्गावरती चालतात. अशा गोष्टीमुळे युवकांचा आत्मविश्वास कमी होऊ लागतो. युवक गुन्हेगारी क्षेत्रात जाण्याचा धोका होऊ शकतो. त्यामागचे कारण समाजात असे माध्यमेच युवकांच्या मनावर विपरीत परिणाम करून जात आहेत.

मला ऐवढेच म्हणायचे आहे की, समाजिक माध्यमांत गुंतल्यामुळे सगळं आयुष्य कुठेतरी हरवलं आहे. हसू आणि नाती सगळी अस्पष्ट अशा सामाजिक माध्यमांत आनंद शोधत आहेत आयुष्यभर; पण मन मात्र शांततेसाठी रडत बसले आहे. रात्रभर आई-वडीलांशी, वडिलधाऱ्या व्यक्तींशी बोलणं कमी झालं, नवीन नवीन माध्यमांमुळे जगणे हरपले आहे. आपले म्हणणारे आहेत तुझ्याकडे खूप सारे; पण त्यातले खरे मात्र कोणी नाही रे तुझ्याकडे. सामाजिक माध्यमामध्ये वेळ निघून जाईल तुला कळणारही नाही, स्वप्न मात्र तसेच राहतील तुला समजणारही नाही. थोडं थांब, सामाजिक माध्यमातून वेळ काढून स्वत:कडे पाहून घे, त्यांचे वाईट परिणाम तुझ्यावर हवी नको होऊ देऊ. खरं आयुष्य अजूनही तुझ्या समोर आहे, जरा डोळे उघडून पाहून तरी घे! युवकांनी सामाजिक माध्यमांमुळे त्यांच्यावर होणाऱ्या नुकसानापासून दूर राहण्याचा प्रयत्न करावा. यातून आपल्याला ऐवढेच समजते की, सामाजिक माध्यमे ही उपयुक्त साधन आहे; पण त्याचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. युवक त्याचा समतोल वापर करून यश मिळवू शकतात. मला अस म्हणायचे आहे की, युवक हा समाजाचा आरसा असतो, समाज जसा आहे, तसा युवक घडत असतो.

विश्वास

कु. चारुशिला रविंद्र काळम
एम.एस्सी. भौतिकशास्त्र प्रथम वर्ष

आपण एखाद्यावर विश्वास ठेवतो, म्हणजे नक्की काय करतो? ती व्यक्ती एखादी गोष्ट करेलच किंवा करणार नाही असं म्हणण्याचे कारण, की त्या व्यक्तीबद्दलच्या आपण बाळगलेल्या अपेक्षा.

या प्रश्नाचं उत्तर मला तरी आजपर्यंत मिळालेलं नाही; पण एक गोष्ट मला पटलेली आहे, ती म्हणजे आपल्या माणसांवर विश्वास दाखवणं होय. ती व्यक्ती जर सत्याच्या बाजूने असेल, बरोबर असेल, तर कोणत्याही परीस्थितीत त्या व्यक्तींची साथ देणं आणि ती जर चुकत असेल, अनीतिच्या मार्गाकडे वळत असेल, तर तिला सुधरण्यासाठी मदत करणे. विश्वास ठेवण्याने ज्याने विश्वास ठेवलाय आणि ज्याच्यावर विश्वास ठेवलाय असे दोघेही दबावाखाली येतात, तर विश्वास दाखवण्याने दोघांमध्येही मोकळेपणा येतो. विचार करा, जर प्रत्येक माणसाने आपल्यावर दाखवला गेलेला विश्वास सार्थ ठरवला, तर जग किती सुंदर होऊन जाईल.

तसंही विश्वास या शब्दातही एक श्वास असतो. जो एकदा गेला की, परत येत नाही. कारण जग सगळ्यांत आधी आणि सगळ्यात शेवटी विश्वासावरच चालतं...



वाचन संस्कृतीत होणारे बदल

✍ अदित्य अनिल पाटील
बी.एस्सी. सीएस (तृतीय वर्ष)

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने
शब्दाचीच शस्त्रे यत्न करु
शब्दची आमुच्या जीवाचे जीवन
शब्द वाटू धन जनलोका
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव
शब्देची गौरव पूजा करु

याचा अर्थ - शब्द हे केवळ उच्चार नसतात. ते विचारांचे बीज असतात. संस्कृतीचे अधिष्ठान असतात आणि मानवजातीच्या प्रगतीचे मूळ स्त्रोतही असतात. ज्या समाजात वाचनाची परंपरा सशक्त असते, तो समाज विचारांनी समृद्ध, संस्काराने परिपूर्ण आणि प्रगतीच्या मार्गावर अग्रेसर असतो.

मानवाच्या बौद्धिक उत्क्रांतीचा इतिहास पाहिला तर एक गोष्ट ठळकपणे जाणवते आणि ती म्हणजे शब्दांचा प्रवास. शब्दांच्या माध्यमातून विचारांना आकार मिळाला, संस्कृती घडली आणि समाज प्रगल्भ झाला. वाचन ही त्या शब्दप्रवासाची सजीव परंपरा आहे. काळाच्या ओघात ही वाचन संस्कृती विविध टप्प्यांतून विकसित होत गेली. कधी हस्तलिखित ग्रंथाच्या स्वरुपाने, कधी छापील पुस्तकांच्या माध्यमातून. आज डिजिटल विश्वाच्या व्यापक पटावर ती विस्तारत आहे.

भारतीय ज्ञानपरंपरेत वाचन संस्कृतीला आत्युच्च स्थान आहे. वेद, उपनिषदे, पुराणे यांपासून संत साहित्यापर्यंत ज्ञानाचा अखंड प्रवाह वाहताना दिसतो आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांनी भावार्थदीपिका (ज्ञानेश्वरी) ग्रंथाद्वारे आध्यात्मिक ज्ञान लोकाभिमुख केले. संत एकनाथ, संत नामदेव यांनी भक्तीपर साहित्याच्या माध्यमातून वाचन संस्कृती अधिक सशक्त केली. मराठी साहित्यात वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, कविवर्य कुसुमाग्रज, बालकवी (त्र्यंबक बापुजी ठोंबरे), शिवाजी सावंत यांसारख्या दिग्गजांनी आपल्या साहित्यकृतीमधून वाचन संस्कृती अधिक समृद्ध केली.

वाचन संस्कृती या वैभवशाली परंपरेबाबत काही लिहिल गेल आणि त्यामध्ये लातूर जिल्ह्याची वाचन चळवळ हा महत्वपूर्ण मुद्दा मागे राहावा असे कधी होत नाही. वाचन संस्कृतीच्या जतन व संवर्धनासाठी ग्रंथालय चळवळीचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या तत्त्वांनी या चळवळीला दिशा दिली. या चळवळीला व्यापक रुप प्राप्त झाले असून, लातूर जिल्ह्यात या कार्याची एक विलक्षण आणि प्रेरणादायी परंपरा निर्माण झाली आहे. 'लातूर जिल्हा ग्रंथालय संघ' ही संस्था या चळवळीचे एक सशक्त केंद्र म्हणून ओळखले जाते. लातूर जिल्हा ग्रंथालय संघाच्या कार्याचा विचार केला असता एक नाव ठळकपणे समोर येते ते म्हणजे डॉ. त्र्यंबकदास झंवर ही केवळ व्यक्ती नाही, तर एक चालती बोलती वाचन चळवळ होती. त्यांनी आपल्या अफाट बुद्धीमत्ता, दूरदृष्टी आणि अथक परिश्रमाच्या जोरावर संपूर्ण जिल्ह्यात ग्रंथालयाची उभारणी केली. त्यांचे कार्य केवळ कागदावर मर्यादित नव्हते, त्यांनी गावोगावी जाऊन वाचनाच महत्त्व लोकांच्या मनात रुजवले. प्रत्येक गावात ग्रंथालय असावे प्रत्येक घरात पुस्तक असावे, आणि प्रत्येक व्यक्ती वाचनशील व्हावी, हा त्यांचा ध्यास होता. काकाचे सातत्याने बोलताना 'ग्रंथालयाविना जो गाव राहील, त्याच्या जीवनाला काहीच अर्थ नाही' हे एक ब्रीदवाक्य होते. त्यांनी वाचन संस्कृतीला एक चळवळ बनवले.

ग्रंथालय म्हणजे केवळ पुस्तकांचा साठा नाही. ते ज्ञानाच मंदिर आहे, हे त्यांनी लोकांना पटवून दिले. त्यांच्या भाषणांमधून, मार्गदर्शनातून आणि कृतीतून त्यांनी असंख्य तरुणांना वाचनाची गोडी लावली. त्यांच्या या कार्यामुळे लातूर जिल्ह्यात

वाचन चळवळीला एक वेगळीच ओळख मिळाली. त्यांच्या या कार्याचा प्रभाव व्यापक होता. आज लातूर जिल्ह्यात शेकडो गावांमध्ये वाचनालय सुरु झाले. गावा-गावांमध्ये उभी असलेली ग्रंथालये त्यांच्या विचारांची साक्ष देतात. त्यांनी उभी केलेली ही चळवळ केवळ काही काळापुरती मर्यादित राहीली नाही.ती पुढील पिढ्यानांही प्रेरणा देणारी ठरली. डॉ. त्र्यंबदास झंवर काकांनी उभारलेल्या वाचन चळवळीने लातूर जिल्ह्यात वाचन संस्कृतीत लक्षणीय बदल घडवून आणले. पूर्वी पारंपरिक स्वरुपात असलेल वाचन आता काळानुसार बदलत गेले.

एकेकाळी ग्रंथालयात जाऊन पुस्तक वाचणारा वाचक आज मोबाईल, संगणक आणि इंटरनेटच्या माध्यमातून ई-पुस्तके, लेख आणि विविध माहिती सहज मिळवू लागला आहे. त्यामुळे वाचनाची साधने बदलली; पण वाचनाची गरज आणि महत्त्व अजूनही तितकेच टिकून आहे. पूर्वी वाचन केवळ ज्ञान मिळवण्यासाठी केल जायचं; पण आज वाचनाचं स्वरुप अधिक व्यापक झालं आहे. स्पर्धापरीक्षा, करिअर, व्यक्तिमत्वविकास आणि मनोरंजन यांसाठी वाचन केलं जात आहे. त्यामुळे वाचनाची दिशा आणि उद्दिष्टे बदलली आहेत.

तसेच वाचनाची सवयही पूर्वी शांत आणि एकट्याने करण्याची गोष्ट होती. आज वाचन कट्टे, पुस्तक चर्चा, सोशल मीडियावरील लेख आणि अभिप्राय यामुळे वाचन अधिक संवादात्मक झाले आहे. वाचक आता केवळ वाचक राहिला नाही, तर तो विचार मांडणारा, लिहिणारा आणि चर्चेत सहभागी होणारा बनला आहे. या सर्व बदलांमुळे वाचन संस्कृती अधिक गतिमान, आधुनिक आणि सर्वसमावेशक झाली आहे. लातूर जिल्ह्यातील ही बदलती वाचन संस्कृतीपरंपरा आणि आधुनिकता यांचा सुंदर संगम घडताना दिसतो. या सर्व बाबी आपण पाहत असताना वाचन संस्कृतीमध्ये झालेले बदल पाहिले. मात्र वाचलेच पाहिजे यासाठी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे लिहतात-

जगणे सुंदर करण्यासाठी वाचावे
अंतरी आनंद भरण्यासाठी वाचावे
पार अथांग आहे हा जीवन प्रवास
भवसागर सुखे तरण्यासाठी वाचावे
प्रेमभावना स्नेह वाढी लावण्या
अन करता विसरण्यासाठी वाचावे.
विसर न पडावा थोरांच्या कार्याचा
गाथा त्यांची सदा स्मरण्यासाठी वाचावे
करुनी मनाची चौफेर मशागत
छान विचार पेरण्यासाठी वाचावे
वाचावे कुणाचे मन जिंकण्यासाठी
कुणास्तव मन हरण्यासाठी वाचावे
स्पर्धाच स्पर्धा जाता हर क्षेत्री
यशाचा मार्ग धरण्यासाठी वाचावे

वरील ओळींचा आशय हाच आहे की, वाचन चळवळ व ग्रंथालय हे समाजाचा वाटाड्या म्हणून ग्रंथालयाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. समाजाला दिशादर्शन म्हणून ग्रंथालये दीपस्तंभाची भूमिका बजावतात. वाचन संस्कृतीतील बदलांचे चित्र पहिले तर एक गोष्ट स्पष्ट दिसते- काळ बदलतो, साधने बदलतात; पण ज्ञानाची तहान कायम असते. आज डिजीटल माध्यमांनी वाचनाला वेग दिला असला, तरी पुस्तकांचा सुगंध आणि ग्रंथालयाची उब अजुनही तितकीच जिवंत आहे.



GEN-Z नव्या क्रांतीचा उदय

✍ अमृता धनराज पाटील

बी.एस्सी. बायोटेक द्वितीय वर्ष

आज कालच्या Modern युगात GEN-Z हा शब्द खूपच Trending आहे. मनामध्ये पहिला प्रश्न उद्भवतो की काय आणि कोण आहेत हे GEN-Z ? तर GEN-Z या शब्दाचा Fullform म्हणजेच पुर्णार्थ Generation-Z असा होतो. Generation चे पहिले तीन अक्षर मिळून GEN-Z हा शब्द तयार झालेला आहे.

नेमक GEN-Z म्हणजे काय हे जाणून घेण्यासाठी आपल्याला काळाच्या थोडसं मागे जायला हवं. आपण म्हणू शकतो की हे MODERN AGE साधारणतः भारतात मोबाईल आपल्यापासूनच सुरु झालं जवळपास १९९० ज्याला आपण आज ९०' चा काळ असे म्हणतो. त्याकाळापासूनच नवीन Trends यायला लागले आणि आता हे जग फारच पुढे गेलेले आहे. आजच्या नवजवान पिढीने आतापर्यंतच्या प्रत्येक वयातील व्यक्तीचे गट पाडून त्यांना एक वेगळे नाव दिले आहे. ते खालीलप्रमाणे-

काळ (Period)	पिढीचे नाव (Generation Name)
1926 – 1945	Silent Generation
1946 – 1964	Baby Boomers
1965 – 1980	Generation – V
1987 – 1996	Generation y (Millenials)
1997 – 2012	Generation- z
2013 – 2024	Generation- α
2025 – 2026	Generation- β

Silent Generation, Baby Boomers, Generation x, y, z, α, β हे Generation चे प्रकार आहेत.

आता दुसरा प्रश्न मनामध्ये उद्भवतो की, हे प्रकार कोणत्या आधारावर पाडले गेले आहेत? तर हे प्रकार वयोगटानुसार तर पाडलेच गेले; पण त्याहूनही पलीकडे हे गट बुद्धिमत्ता, विचारशक्ती आणि विचारशैली यावर आधारित आहेत. प्रत्येक वयोगटातील व्यक्तींचे विचार वेगवेगळे असतात त्यांचा समाज प्रतीचा दृष्टिकोनही वेगवेगळा आहे. जुन्या काळामध्ये अर्थात MODERN AGE च्या अगोदर भारतीय समाजामध्ये खूपच अंधविश्वास पसरलेला होता. त्या काळानुसारच Silent Generation, Baby boomer Generation x आणि y चे विचार आहेत. ते विचार भारताला मागे टाकणारे आहेत, असे म्हणणे चुकीचे नाही.

तो समाज खूपच कुचकट आणि निर्दयी होता. त्या काळामध्ये जातीवाद, धर्मवाद, हिंदू वर्णवाद, राजा रंक या विचार पद्धतीचा होता. या सर्वांनी भारताला काळोख अंधारामध्ये टाकून दिले होते. गरीब वर्गांना बोलण्याचा अधिकार नव्हता, ना शिक्षणाचा अधिकार. आपली भारत माता स्वतंत्र असूनही आपल्या माता-भगिनी ना स्वतंत्र होत्या, ना सुरक्षित होत्या.

आजचे युग नव्या क्रांतीचे आणि नवउदयाचे आहे. आजचे नवयुवक तसेच नवपीढी हे Generation-Z आहेत. म्हणजेच GEN-Z आहेत. GEN-Z चे विचार नव्या क्रांतीला आव्हान देणारे आहेत. हा प्रवर्ग कोणत्याही रुढी आणि परंपरांचा विचार करत नाही.

काहीही अनुचित घडले तर हे GEN-Z त्याचा ठाम विरोध करतात. यांच्यामध्ये कसलाही जातीवाद आणि धर्मवाद नाही आहे ते छत्रपतींच शौर्य, महात्मा फुलेंच बंधुत्व आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच ज्ञान आहे.

जवळपास वयाच्या १६-१७ व्या वर्षापासूनच हे लोक सामाजिक भेदभावांचा विरोध करतात. स्वतःचे मत मांडताना धाडसाने आणि आत्मविश्वासाने सादर करतात. यांना पाहताना वाटते की, आता कुठे भारत यशाच्या मार्गाला लागला आहे. हे मी खात्री ने सांगू शकते की, GEN-Z च्या सानिध्यात भारत एकेदिवशी गगनभेदी बनेल. ते म्हणतात ना Sky is the limit. अर्थात आकाश एक अशी पातळी आहे. ज्याच्यावर कोणी नाही आणि अशा ठिकाणी आपल्या भारत देशाला पाहण्याचा विचारच मनाला आत्मानंद देणारा आहे.

GEN-Z ची विचारशैली, बुद्धिक्षमता आणि त्यांचे सामाजिक कार्य खूपच चांगले व यशाचे आहे; परंतु काही असे गुणधर्म त्यांच्यामध्ये आहेत जे त्यांना प्रवाहविरोधक बनवू शकतात. जसे की बुद्धिमत्ता खूप आहे; परंतु धैर्य आणि विवेक कमी आहे. एक काम अर्धवट सोडून लगेच दुसर करावेसे वाटते. राग खूप जास्त आणि सहन करण्याची शक्ती खूपचं कमी आहे. वत्कृत्व चांगले आहे; परंतु शब्दवर्ण अयोग्य आहेत. कुठलेही कार्य जलद करु शकतात; परंतु मनामध्ये आळस खूप आहे. या अशा गुणधर्मामुळे वडिलधाऱ्या पिढीचा नवयुवकावरचा विश्वास उडून गेला आहे. आज जे Social Media नावाचं जे अस्त्र आहे ते खूपचं विचित्र आहे. चांगला वापर केला, तर प्रेमअस्त्र तयार होतो. नाहीतर ब्रम्हस्त्र होतो आणि ते सर्व विध्वंस करतो.

आता वेळ आलेली आहे स्वतःला आवरायची, स्वतःला सावरायची. वडिलांना विश्वास द्यायची आणि देशावर विश्वास ठेवायची. स्वतःचा अहंकार आणि आळस कमी करुन आपण कोणतीही गोष्ट प्राप्त करु शकतो. आपल्या देशाला प्रथमश्रेणी मध्ये पोहचवू शकतो. हे काम आता सर्व देशवाशियांनी GEN-Z वर सोपवलं आहे आणि मला खात्री आहे, हे काम ते अतिशय विवेक आणि चंचलतेने पार पाडतील.





Mandale Shivani Keshav
B.Sc. (CS) First Year

हिंदी भाषा



कु. जोगदंड भाग्यश्री

विद्यार्थीनी प्रतिनिधी



प्रा. सूर्यकांत चव्हाण

प्रभारी प्राध्यापक

NEP 2020 : शिक्षा का नया सवेरा

✍ जोगदंड भाग्यश्री उत्तम

(बी.ए. तृतीय)

रामपुर की तंग गलियों के एक छोटे से मकान में आर्यन अपने माता-पिता और भाई-बहन के साथ रहता था। बचपन में आर्यन का व्यक्तित्व दो हिस्सों में बँटा था। मैदान पर वह एक उभरता खिलाड़ी और दोस्तों के बीच बेहद लोकप्रिय था लेकिन किताबों के बीच आते ही उसकी चमक फीकी पड़ जाती थी। पहली से चौथी कक्षा तक तो सब ठीक रहा पर असली चुनौती तब शुरू हुई जब उसके पिता विठ्ठलराव ने उसका स्कूल बदल दिया।

विठ्ठलराव एक साधारण सी नौकरी करते थे लेकिन सामाजिक समझ के मामले में उनका कद बहुत ऊँचा था। उनका बड़ा बेटा मेधावी था और एक नामी कॉलेज से पढ़कर अच्छी नौकरी कर रहा था। वहीं उनकी बेटी भी पढ़ाई में अव्वल थी। विठ्ठलराव चाहते थे कि आर्यन भी अपनी बहन की तरह होशियार बने। इसलिए उन्होंने आर्यन का दाखिला उसी के स्कूल में करा दिया।

डर की धुंध और उम्मीद की किरण पाँचवीं कक्षा के उस बड़े स्कूल में आर्यन एकदम अकेला पड़ गया। वह ऐसा महसूस करता था जैसे किसी बोरी के मेंढक को अचानक समंदर की लहरों के बीच छोड़ दिया गया हो। घर में अनुशासन का सख्त पहरा था। पिता और बड़े भाई का रौब ऐसा कि माँ भी सहमी रहती थी। ऐसे में आर्यन अपने मन का डर किससे कहता? वह खामोश रहने लगा और क्लास की आखिरी बेंच उसकी दुनिया बन गई।

वक्त का पहिया घूमा और आर्यन आठवीं में पहुँचा। यहाँ उसकी मुलाकात अरुण पांडे सर से हुई। पांडे सर के इतिहास और भूगोल पढ़ाने का अंदाज कुछ ऐसा था कि आर्यन के मन पर जमी डर की बर्फ पिघलने लगी। जब पहली बार उसके ३० में से १८ अंक आए तो उसे अपनी आँखों पर यकीन नहीं हुआ। यह १८ अंक उसके लिए किसी गोल्ड मेडल से कम नहीं थे क्योंकि आज तक उसने ०५ का आंकड़ा कभी पार नहीं किया था। आत्मविश्वास बढ़ा तो अंकों का ग्राफ भी चढ़ा; साल के अंत तक वह ६० में से ४५ अंक लाने लगा।

कोरोना का संकट और आर्ट्स का चुनाव के दरम्यान आर्यन आगे बढ़ रहा था लेकिन घर के टॉपर्स के बीच उसके ये अंक मामूली ही माने गए। दसवीं में पहुँचते ही 'कोरोना' की पहली लहर ने दस्तक दी। घर बैठे पढ़ाई हुई और परिवार को लगा कि आर्यन पढ़ाई में कमजोर है, इसलिए उसे आर्ट्स (कला संकाय) लेने पर मजबूर किया गया। आर्यन के सपने कुछ और थे, पर वह चुप रहा।

ग्यारहवीं और बारहवीं के बाद वह D.Ed करना चाहता था लेकिन तब तक नियमों में बदलाव होने के कारण उसे B.A. में दाखिला लेना पड़ा। उसकी बहन ने लातूर के एक प्रतिष्ठित कॉलेज में उसका एडमिशन करा दिया। आर्यन फिर से घबराहट के साये में था। उसे लगा कि इतने बड़े कॉलेज के मेधावी छात्रों के बीच वह फिर से पिछड़ जाएगा। कॉलेज में कदम रखते ही उसे नई शिक्षा नीति (NEP 2020) का सामना करना पड़ा। शुरुआत में उसे गहरा धक्का लगा। जब कम अंकों के कारण उसे हिंदी विषय मिला तब वह रोया, उसे लगा कि मोबाइल और ऑनलाइन गेमिंग के चक्कर में उसने अपना भविष्य बिगाड़ लिया है।

लेकिन जैसे ही क्लासेस शुरू हुई, आर्यन का नजरिया बदल गया। NEP ने उसे वह मौका दिया जो पुरानी व्यवस्था में असंभव था। वह आर्ट्स का छात्र था पर उसे साइंस की केमिस्ट्री लैब देखने का अवसर मिला। उसने बॉटनी में 'बटर मशरूम' की बारीकियों को समझा और साथ ही भारतीय संविधान का भी गहराई से अध्ययन किया।

उसकी रचनात्मकता को पंख तब मिले जब एक प्रोफेसर ने उसे कविता लिखने को कहा। आर्यन ने अपनी माँ पर

एक मराठी कविता लिखी- 'काही स्वार्थ आहे का तुझा?' (कोई स्वार्थ है क्या तेरा?)। वह कविता इतनी मर्मस्पर्शी थी कि उसे कॉलेज के पोस्टर पर जगह मिली और आर्यन का सम्मान हुआ। इसके बाद G-२० के एक कार्यक्रम में आर्यन द्वारा लिखे गए नारों (Slogans) ने धूम मचा दी। अब लोग उसे 'बैकबेंचर' नहीं बल्कि एक 'प्रतिभाशाली युवा' के रूप में पहचानने लगे थे।

छुट्टियों में जब आर्यन घर गया तो समाज का नजरिया अब भी पुराना था। लोग पूछते, 'बेटा क्या कर रहा है?' और विठ्ठलराव झेंपते हुए कहते, 'बस B.A. कर रहा है।' उन्हें लगता था कि B.A.की क्या अहमियत? पर आर्यन जानता था कि वह सिर्फ डिग्री नहीं ले रहा, वह 'कौशल' (Skill) सीख रहा है। वह हिंदी पढ़ नहीं रहा था, बल्कि हिंदी की नई संभावनाओं की खोज कर रहा था।

पढ़ाई पूरी हुई, आर्यन ने CET पास की और अंततः नांदेड़ के एक नामी कॉलेज से होते हुए वह 'आर्यन सर' बन गया। कहानी का सबसे बड़ा मोड़ तब आया जब आर्यन का एक पुराना दोस्त मिला, जिसने पुरानी पद्धति से डिग्री ली थी और अब बेरोजगार था। उसने चिढ़कर पूछा, 'भेदभाव क्यों? डिग्री दोनों के पास है पर नौकरी सिर्फ तुम्हें मिली ?' आर्यन ने मुस्कुराकर जवाब दिया, 'दोस्त, यह भेदभाव नहीं, NEP का प्रभाव है। तुमने सिर्फ किताबें रटीं, लेकिन NEP ने मुझे बोलने की कला (Communication Skills) और अपनी भावनाओं को व्यक्त करने का साहस दिया। मेरे पास सिर्फ कागज का टुकड़ा नहीं, बल्कि काम करने का हुनर है।' आर्यन ने उसे अपने एक छात्र का उदाहरण दिया, जिसे पढ़ाई से ज्यादा स्कूटर मैकेनिक बनने में रुचि थी। NEP के तहत उसे उसी क्षेत्र में विशेषज्ञता मिली और आज वह स्वावलंबी है।

प्रकृति का कोरा मन

✍ **सिद्दीकी सादिया**
(बी.ए. तृतीय)

क्या प्रकृति का राजा रूठ गया है?
हवाओं की दिशा खो गई है
कभी भीषण सूखा पड़ता है
तो कभी बाढ़ का डर सताता है।

कड़ाके की धूप तप रही है
धरती माता झुलस रही है
इंसान के लालच के आगे
अब धरती माँ थक रही है।

कंक्रीट के इन जंगलों के सामने
शुद्ध हवा अब झुक रही है
पहाड़ ढह गए, जमीनों में दरारें आ गई,
फिर भी इंसान का 'मैं-मैं' का राग खत्म नहीं हुआ।

हमने प्रकृति को मुफ्त समझकर बहुत लूटा है
इसीलिए आज धरती का कलेजा फट गया है
सूरज प्रकाश देता है, चाँद चाँदनी देता है
पर हम मूर्ख इंसान ज़मीन के एक टुकड़े के लिए लड़ते हैं।

प्रकृति ही असली 'मालिक' है
हम तो केवल यहाँ 'किरायेदार' हैं
कितना हक़ जताते हो इन फूलों पर?
उन्हें जन्म देनेवाले तो ये पेड़ हैं।

समझ तब आएगा जब-साँस लेने के लिए
हवा भी किराया माँगेगी!

राही का सपना

✍ मोहिते संध्या ईश्वर

(बी.ए. तृतीय)

यहां मैंने तीन-तीन जॉब छोडी वहां आज एक जॉब मिलना बहुत मुश्किल है। मुझे अभी भी याद है कि मैं कितनी खुश थी अपनी पहली जॉब पाकर। हालांकि वह मेरे सपनों की कंपनी नहीं थी। फिर भी पहली जॉब थी। मेरा सपना था की मैं टाटा कंपनी में काम करूँ। किंतु वहाँ जाने के लिए मेरे पास डिग्री नहीं थी। मैं आज २४ वर्ष की हूं। अपने परिवार से दूर घर को छोडकर या भाग के आयी हूं, अपने सपने को सच करने सपनों के शहर। उन्हें उडान देने के लिए अकेली आयी हूं।

यह सिलसिला शुरू हुआ १९ वें जन्मदिन से। मैंने अपने माँ-पापा से कहा था कि मुझे पढ़ाई के लिए बाहर जाना है। पापा ने मना किया और कहा, 'जो पढ़ना है अपने शहर में रहकर पढ़ो, बाहर जाने की जरुरत नहीं।' खुशी के मौके पर मुड का बैंड बाजा बज गया। राही अपने मन ही मन में कहती है, 'मुझे जो चाहिए वह दे दो, वरना अपने हिसाब से मैं ले सकती हूं।' ऐसा पापा को कहने की हिम्मत न थी। कुछ दिन राही खामोश थी। एक बार प्रथम वर्ष की परीक्षा खत्म हुई। उसी दिन झगड़कर सभी के सो जाने के बाद आधी रात ठीक ११:३० बजे की रेल से मुंबई भाग आयी। जितना सोचा उतना आसान तो कुछ नहीं था। मुंबई आयी तो कई धक्के खाये किंतु कभी अपना गुरूर नहीं बेचा। जब तक पैसा था तब तक शुरु के कुछ दिन सुहाने थे। उसी में थोडी मुंबई घुमी, रहने के लिये किराये से मकान लिया।

अब शुरू हुआ आत्मनिर्भर स्त्री के लिए सूख का सफर। लगभग तीन हफ्ते बीते, न पैसा था न काम था। ऊपर से मुंबई में रहने का खर्चा। साथ लाए ८०-९० हजार जो बहुत बडी रक्कम थी। तीन हफ्तो में कहाँ गई पता ही नहीं चला। खैर, कई तकलीफ के बाद एक जॉब मिली थी। दस हजार रुपये के साथ मेरी पहली जॉब। इतने से तो कुछ न होता फिर भी कुछ तो गुजारा हो रहा था। आधा पैसा भाडे में जाता, बचा हुआ किराने में जाता। हालात बुरे थे। घर की याद आ ही थी फिर सोचा जब तक खुद का मकान, गाडी नहीं लेती तब तक घर वापसी नहीं होगी। यह जॉब कुछ छह-सात महिने की थी। फिर एक फायनास कंपनी में काम मिला। इस तनख्वाह से डबल में वहां तनख्वाह पच्चीस हजार रुपये की थी, यह सोचकर खुश थी कि खुद के लिए खुद की कमाई से कुछ ले सकती थी। पहली तनख्वाह कहां जाती पता नहीं चलता था।

दूसरी जॉब से मैंने पनी पढ़ाई शुरू की। डिग्री प्राप्त की और फोन लिया। इतनी खुशी थी कि खुद का खर्चा खुद उठा रही थी। खुशी में शामिल होने के लिये मेरे अलावा कोई नहीं था। कई महिने काम किया फिर ऐसे-ऐसे लोगों से पाला पड़ा कि लड़की देखी नहीं कि लार टपकाते रहे। इस डर से यह भी जॉब छोड़ दी। एक महिना तो जॉब ढूँढने में गया, बचा-खुचा पैसा भी गया।

आगे फिर एक ऐसा काम मिला जो सुरक्षित भी और ज्यादा पैसेवाला भी था। यह काम कॉकी शॉप पर था । यह जगह हर वक्त भीड़ से भरी हुई रहती थी। यहां तनख्वाह भी पैंतीस हजार थी। यहां पर पैर टूटनेवाला काम था। हर वक्त उस टेबल पर जाओ, इस टेबल को साफ करो, उस टेबल की ऑडर ले लो; इन सबसे खुद के लिए समय नहीं मिलाता था। कुछ वक्त बाद इस जॉब को छोडने फैसला किया तो तनख्वाह बढ़ाकर चालीस हजार रुपये की गई। फिर कितना भी काम दो, मना नहीं कर सकते थे।

इसी दौरन मैंने शेअर मार्केट का कोर्स किया, बची हुई पढ़ाई पूरी की और फिर एक दिन उस कंपनी में इंटरव्ह्यू देने गई, जहाँ काम करने का मेरा सपना था। शाम को वहीं से मेल आया कि 'आप कल से काम पर आ सकती हैं।' मेरा तो खुशी का ठिकाना ही नहीं रहा। जिस कंपनी में हमेशा से जाना चाहती थी आज मैं उसी का हिस्सा बन गयी थी। शुरु में मुझे शेअर मार्केट के विभाग में काम मिला कि कंपनी ने किस-किस वस्तु के उत्पादन पर कितने शेअर लगाया गया है? कंपनी में मेरी तनख्वाह नब्बे हजार रुपये थी। राही के हालात सुधर गए। किराये के घर से खुद का मकान और नई गाडी भी ले ली।

धीरे-धीरे लगन ओर मेहनत से वहां काम करने लगी। इसी मेहनत को देखकर दो साल बाद राही विभाग प्रमुख बन गयी। साथ ही मेरी तनख्वाह भी डेढ़ लाख हो गई। अब राही के

पास खुद का सब कुछ था। वह खुश थी किंतु मन में एक सवाल बार-बार उठ रहा था कि माँ-पापा की तीसवीं सालगिरा पर घर जाऊँ या नहीं? गयी तो गल्ली-मोहल्ले के लोग बातें बनाएंगे। माँ-पापा की नाक कट जायेगी। किंतु सोचा कि गई तो मैंने ऐसा कुछ किया ही नहीं। अगर मैं सही थी तो घर से भाग क्यों गयी? फिर जवाब नहीं.. इस सोच में दो दिन गए। फिर यह कहकर घर चल पड़ी कि जो होगा सो देखा जाएगा। राही छुट्टी लेकर घर आ गई किंतु जो सोचा था उससे ठीक उलटा हुआ। डांटने के बजाए सब प्रेम से बात कर रहे थे। पापा मोहल्ले में मिठाई बाँट रहे थे कि मेरी बेटी बडी कंपनी में काम करती है और मुंबई में खुद का मकान है। खुशी का ठिकाना ही नहीं था। यह देखकर राही भी खुश हुई, अब उसकी खुशी में उसका परिवार साथ था।

इसी दरम्यान माँ की आवाज आयी, 'राही उठो...उठो राही... कॉलेज जाना नहीं है? कितनी देर हो रही है उठो.....'

सुंदर हसीन सपना चूर-चूर हो गया। राही उठी खुद को संभालते हुए कहा, 'आज यह भले ही सपना हैं किंतु एक दिन इसे मेरी जिंदगी का हिस्सा जरूर बनाऊँगी। भाग कर नहीं पापा की सहमति के साथ इसे अवश्य पूर्ण करूंगी।' यह कहकर राही कॅलेज चली जाती है।

आओ भारत को विकसित बनाएँ

✍ **डॉ.प्रकाश रोडिया**

सहयोगी प्राध्यापक वाणिज्य विभाग

आओ भारत को विकसित बनाएँ
सपनों को साकार सजाएँ।
नारा नहीं, यह प्रण हो हमारा
हर दिल में दीपक प्यार भाईचारा।
गाँव-गाँव तक विकास पहुँचाए।
शहरों में संवेदना आए।
कोई भूखा ना सोने. पाये।
हर चेहरे पर मुस्कान खिलाये।
शिक्षा गढ़े सशक्त इंसान
ज्ञान संग चरित्र महान।
कौशल, विज्ञान, शोध, नवाचार
बनें भारत की नई पहचान।
डिजिटल दीपक हर हाथ में हो
तकनीक की शक्ति हर बात में हो
काग़ज़ नहीं, पारदर्शिता बोले
ई-शासन से समृद्धि डोले
किसान के खेतों में हरियाली,
उद्योगों में आत्मनिर्भरता निराली।
मेक-इन-इंडिया, स्टार्ट-अप की उड़ान
रोज़गार बने भारत की पहचान।
नारी सशक्त, समर्थ युवा
बुजुर्गों को भी लगे ना दवा
जाति, धर्म, भाषा से ऊपर
मानवता की मिसाल जगभर ।
स्वच्छ हवा, स्वच्छ जल
प्रकृति से नाता हर पल ।
विकास हो टिकाऊ, संतुलित,
धरती माँ हो जाये पुलकित
सीमाओं पर हमारे वीर खडे
देश की तरक्की का धीर बढे
शांति, शक्ति, संयम के साथ,
विश्व को दें भारत मजबूत साथ ।
सुशासन हो, जवाबदेही,
भ्रष्टाचार की नामो निशान नही ।
कानून समान, न्याय सुलभ,
आम जन का पूरा हो मतलब
भारत केवल अर्थव्यवस्था नहीं,
संस्कृति और मूल्यो के संस्कार यहीं ।
वसुधैव कुटुम्बकमब का संदेश हमारा
लगे दुनिया को सबसे प्यारा
करे २०४७ का स्वप्न साकार,
सिर्फ़ सरकार नहीं, हम सब तैयार।
हर नागरिक बने राष्ट्र निर्माता,
विकसित कहलाए भारत माता।
कलम, कर्म और श्रम से नींव रचाए,
अपने हिस्से का दीप जलाए।
मैं नहीं, हम हम सबका प्रण प्यारा
विकसित कहलाए भारत हमारा ।

English
Department



कु. धनश्री दळवे
विद्यार्थीनी प्रतिनिधी

शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर
॥ आत्मेह तमसो ज्योतिः॥
स्थापना - १९७०



डॉ. चंद्रशेखर दवणे
प्रभारी प्राध्यापक

'I'

Sayyed Zoha

BA II Year

The word **"I"** is more than just a pronoun. It represents who you are your thoughts, feelings, values, dreams, strengths, weaknesses, and everything that makes you unique. Even though we live with ourselves every day, many of us do not truly know who we are.

Today, we spend more time paying attention to other people than to ourselves. We are interested in what they wear, what they achieve, what they think, and how they live. We know so much about others, but very little about ourselves. Instead of asking, **"Who am I?"**, we often ask, **"What are other people doing?"**

As the saying goes, **"I know about the ocean, and I wonder about the sky, but I still don't know how deep my own ocean is."** This reminds us that we often try to understand the world around us while forgetting to understand ourselves. Knowing yourself is important because this is your life, not someone else's. You are the one who has to live it. If you do not know yourself, how will you know what truly makes you happy or what you want to achieve?

Many people spend years feeling confused. They ask themselves, **"Do I really like this?"**, **"Is this what I want?"**, or **"Am I just following everyone else?"** These questions come up because they have never taken the time to understand themselves.

Many people also copy others without realizing it. If a friend likes something, they start liking it too. If everyone follows a trend, they follow it as well. Sometimes they even hide their real opinions just to fit in. Although this may seem harmless, it slowly takes away their identity and confidence.

However, every person is different. Everyone has different talents, abilities, dreams, and goals. No two people are the same. Therefore, comparing yourself with others or trying to become someone else only takes you further away from your true self. You were not meant to become another person. You were meant to become the best version of yourself. When you truly know yourself, your life becomes clearer. You make better decisions, set meaningful goals, and stop living only to please other people. Instead, you begin to live according to your own values and purpose.

Sadly, many people give themselves away to others. They give away their attention, time, energy, and even the power to decide how they should feel about themselves. As a result, they become so focused on everyone else that they forget the most important person to understand themselves. Life is yours to live. No one else can live it for you. Before worrying about what other people expect from you, ask yourself what truly matters to you. Discover your interests, take care of your physical and mental health, and work towards becoming the person you really want to be.

When you start valuing yourself, other people are also more likely to value you. Real confidence comes from trusting yourself, even when no one else is standing beside you. Self-respect begins with knowing yourself.

In conclusion, the word **"I"** is not just a word. It is your identity, your voice, your purpose, and your true self. Before trying to understand the world, take time to understand yourself. Before looking at others, look within. The day you truly discover your **"I"** is the day your life becomes clearer, more confident, and more meaningful.

Why Do We Overthink?

✍ Sayyed Zoha

BA II Year

Overthinking is the habit of thinking about something too much and too often. It usually begins with a simple situation, but soon the mind starts creating extra questions, fears, and possible outcomes. A small mistake, a short message, or an uncertain decision can turn into hours of worry. This is why overthinking is so common today: people live with constant pressure, uncertainty, and too much information, so the mind keeps searching for answers and safety even when there is no real danger.

It is important to understand the difference between thinking and overthinking. Thinking is useful because it helps us solve problems, make decisions, and learn from experience. Overthinking, on the other hand, repeats the same thoughts again and again without leading to action or peace. Thinking moves us forward, while overthinking keeps us stuck.

Psychologically, we overthink because the brain is designed to protect us. It tries to predict danger, avoid mistakes, and reduce uncertainty. When we feel stressed, insecure, or afraid of failure, the mind becomes more active and starts replaying situations. It asks "What if?" again and again because it wants control. However, not every problem can be solved by thinking more. Sometimes the mind creates more fear than the situation actually deserves.

Today, overthinking has become even more common because of social media, pressure, uncertainty, and comparison. Social media makes people compare their lives with others, which can create self-doubt and insecurity. Academic pressure, work stress, and the fear of making the wrong choice also push people into constant mental activity. In a world where everything changes quickly, many people feel they must always be prepared for the worst. This makes the mind restless and unable to relax.

Overthinking affects mental, emotional, and physical health. Mentally, it can reduce concentration, memory, and decision-making. Emotionally, it can increase anxiety, fear, sadness, and frustration. Physically, it may cause headaches, tiredness, muscle tension, poor sleep, and a racing heart. Over time, overthinking can make everyday life feel heavier and more exhausting than it should be.

One reason overthinking becomes a habit is that repeated thoughts strengthen the same mental pattern. The brain learns by repetition, so when we keep returning to the same worries, it becomes easier for the mind to do it again. This is a psychological fact: what we repeat often becomes automatic. That is why overthinking can feel difficult to stop, even when we know it is not helping us.

It is also important to remember that thoughts are not always facts. Just because something enters your mind does not mean it is true. Fear, insecurity, and past experiences can make thoughts seem real even when there is no evidence. Learning to question your thoughts instead of believing every one of them is a powerful way to reduce overthinking.

There are many simple ways to reduce overthinking. First, try to notice when your mind is repeating the same worry. Then, pause and ask yourself whether the thought is based on facts or fear. Deep breathing, journaling, exercise, and enough sleep can help calm the mind. Limiting social media and comparison can also reduce unnecessary stress. It is also helpful to focus on action instead of endless thinking. When possible, solve the problem, make a decision, and move forward. If the thought is not useful, let it pass.

In conclusion, overthinking is common because the human mind wants safety, certainty, and control. However, too much thinking can harm our peace, health, and happiness. Healthy thinking helps us grow, but overthinking keeps us trapped in fear and doubt. By understanding our thoughts, questioning them, and practicing calmer habits, we can learn to live with more clarity and less stress.

***

A Woman is the Heart of Every Relationship

Pathan Zikra
B.A second year

A woman is a beautiful gift from God. There is no one more beautiful than a woman.

The whole world admires her intelligence, simplicity, and beauty. A woman is the beauty of relationships. With her kindness and love, she fills every home with happiness. She teaches people the true meaning of love and keeps every relationship strong. As a daughter, a sister, a wife, and a mother, she fulfills every responsibility with patience and sincerity. She faces many hardships and difficulties in life, yet she overcomes them with courage. This is the greatness of her strength. Women spend their entire lives facing countless hardships and challenges. They bear physical pain and many responsibilities, yet they continue moving forward with patience and determination. Examples of such great wornen are Rani Lakshmibai, Kalpana Chawla. Mother Teresa, Indira Gandhi, Savitribai Phule, and Fatima Sheikh. They inspire us with their courage, kindness, leadership, and dedication to society. As John Keats said, "Truth is beauty, beauty is truth." This is especially true of a woman because she remains truthful and sincere in every relationship. Her honesty strengthens every bond and earns the trust and respect of everyone around her. A mother sacrifices herself to give birth to her child. Despite all this, how can this world call women weak? How can ariyone say that women are powerless...?

A Mother who sold her soul only for her child.
A Daughter who sails through a sea so blind.
A Sister's love for her brother is deeper than any ocean.
And all women's beauty lies in love and devotion.

The Words "If Only"

✍ **Sayyed Alisha**

B.A Second Year

Have you ever noticed ? how often we say the words "if only"?

"If only I had more money."

"If only my life was better."

"If only I had one more chance."

These two words may seem small, but they can slowly take away our happiness.

Many of us spend too much time thinking about the things we don't have. We keep wishing for a better life, more success, or different opportunities. At the same time, we forget to appreciate the blessings we already have.

Life does not always give us everything we want. Some dreams remain unfinished. Some opportunities are missed. Some wishes never come true. That is a part of life, and everyone experiences it.

Instead of always saying "if only," we should learn to say "it's okay." Accepting reality does not mean giving up. It means understanding that we cannot control everything, but we can choose how we move forward.

Many people think:

"If only my dreams had come true."

"If only time could stop."

"If only there was no pain behind every smile."

"If only imagination became reality."

"If only every wait had an ending."

These thoughts are normal. However, if we keep thinking about them all the time, we may forget to enjoy the present.

There is a saying:

"While saying 'if only,' we slowly left reality behind. When we finally accepted reality, we realized we had already lost so much."

Some dreams stay unfinished.

Some losses can never be replaced.

But life does not stop because of them.

If something is important to you, work hard for it. Give your best and never stop trying. But if things still do not happen the way you hoped, learn to let them go and say, "It's okay."

Be thankful for what you have.

Accept what you cannot change.

Keep moving forward with hope.

Because sometimes, peace begins the moment we stop saying "if only" and start saying "it's okay."

On the Absurdity of the First Cry

✍Aditya Kadam

(Asst. Prof. Dept of Microbiology)

A baby in a womb relies completely on its mother for everything. Nutrition and oxygen, bath come from the placenta. The moment it separates from its mother. it no longer has placental support. it is forced to rebel against the pressure difference between its lungs and atmosphere for that purpose, it has to inflate its lungs for the very first time. Crying becomes the reflex that force ais into lungs, lungs, clears. the amniotic fluid out, and kickstarts proper Ling If the baby laughs instead of crying. it wouldn't be able to generate enough pressure needed to open up the lungs. Crying in a way turns out to be nature's CPR. breathing begun CPR. a loud announcement that life has begun.

The Department of English organized a Workshop on Corporate Skills on 29 August 2025 for UG and PG students. Dr. Sagar Kondekar, Assistant Professor at SRTM University Sub-Center, Latur, was invited as the resource person. He explained the importance of corporate and soft skills and guided students on developing these skills to meet present-day professional requirements. Students actively participated in various workshop activities, which enhanced their understanding of communication, personality development, and workplace skills. Dr. Chandrashekhar Dawane introduced the program and the chief guest, while Mr. Ashish Maske delivered the vote of thanks. A total of 72 students and 4 teachers attended the workshop. The program successfully motivated students to improve their corporate skills and prepare for future career opportunities.



Dr Chandrashekhar Dawane delivering the concept note of the program and introducing the Resource Person Dr Sagar Kondekar.



Dr Sagar Kondekar, the Resource Person sharing his insights in the workshop.

2.2 Workshop on Interview Skills

The Department of English organized a Workshop on Interview Skills for UG and PG students on 23 September 2025. The program aimed to familiarize students with interview techniques, improve their communication skills, and develop their understanding of soft skills and personality development for professional success. Principal Dr. Mahadev Gavhane presided over the program, and Dr. Chandrashekhar Dawane was the resource person. He explained the importance of interviews in career development and guided students through practical interview strategies. The workshop included a mock interview session. The workshop was successful, and students shared positive feedback, finding it highly useful and informative.



Dr Chandrashekhar Dawane guiding the students in Workshop on Interview Skills for Students.



Students attending interview

2.3 Workshop on Basic Tricks of English Writing:

The Department of English, Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur organized a workshop on 11th March 2026. It was arranged for UG students of Arts, Commerce, Science, IT, and B.Voc. The topic of the workshop was "Basic Tricks of English Writing." The main objective was to develop students' English Writing Skills. It also aimed to cultivate writing habits and reduce fear of writing. Students learned the common reasons for mistakes in English writing. The session also focused on building confidence through practice-oriented methods. The resource person, Krishna Deshmukh, conducted an informative, practical, and interactive session. Students actively participated and interacted during the discussion session. The workshop provided useful guidance on improving writing skills. Participants found the session helpful and motivating.



Students attending the workshop on Writing Skills



Krishna Deshmukh while interacting with the students

3. Langlit- Students' Association Activities:

LangLit – Students' Association of English helps in the academic, personal, and professional growth of students. It improves communication skills, encourages interest in literature, and develops creativity, confidence, leadership, and teamwork. Through activities like debates, seminars, workshops, drama, quiz competition, and writing competitions, students gain practical learning and exposure beyond the classroom. The association also created a healthy academic environment and prepares students for higher education, careers, and social awareness through language and literary activities. So under the association, we took various activities for the students. Apart from competition, we took every Saturday one activity throughout the whole year. The entire office bearer took active participation in all activities and promoted students for

participating in it.

3.1 Inaugural Function of Students' Association "Langlit"

The Department of English organized the Inaugural Function of Students' Association "Langlit" on 07 August 2025. UG and PG students actively participated in the event. Adv. Shileshbhaiya Gojamgunde, a renowned dramatist and script writer was the Chief Guest. The program aimed to introduce students to contemporary dramatists and writers from society. It also focused on improving students' communication and literary understanding. Dr. Chandrashekhar Dawane delivered the introductory speech about the Students' Association "Langlit." Dr. Anuja Jadhav introduced the Chief Guest. Adv. Gojamgunde shared his views on dramatic techniques used in theatre and drama. He explained that society itself is a stage and every individual plays different roles in life. His speech inspired students and created enthusiasm among the audience. Mr. Sadashive Shinde, Vice Principal of the college, presided over the program. The event concluded successfully with positive feedback and appreciation from the students.



Mr Sadashiv Shinde felicitating the resource person Adv Shaileshbhaiya Gojamgunde



Adv Shaileshbhaiya Gojamgunde guiding the students

3.2 Poster Presentation on Rabindranath Tagore

The Department of English organized a Poster Presentation on Rabindranath Tagore through the Students' Association "Langlit" on 08 August 2025 to mark the death anniversary of Rabindranath Tagore. UG and PG students actively participated by presenting posters on Tagore's life, works, and contribution to Indian Writing in English.



Dr Mahadev Gavhane and Mr Sadashiv Shinde unveiling the poster of Rabindranath Tagore



Students giving presentation to Principal and Vice Principal in Poster Presentation Competition

3.3 Poster Presentation on Indian Writers in English

The Department of English organized a Poster Presentation on Indian Writers in English through the Students' Association "Langlit" on 24 January 2026. The program was conducted for UG and PG students to introduce the significance of Indian English literature and to highlight the works, themes, and writing styles of renowned Indian authors. Dr. Anuja Jadhav, HoD of the English Department, inaugurated the event. Students creatively presented posters on writers such as Rabindranath Tagore, Mahesh Dattani, Vijay Tendulkar, Sudha Murthy, and Chetan Bhagat. The competition helped students improve their research, presentation, and communication skills while developing interest in literature.



Prof Dr Anuja Jadhav (HoD) inaugurating the Poster Presentation Competition



Participants giving presentation on their posters

3.4 Book Review Competition

The Department of English organized a Book Review Competition through the Students' Association "Langlit" on 18 September 2025 for UG and PG students. The program aimed to develop students' critical thinking, analytical reading, and writing skills through book review writing. Dr. Anuja Jadhav and Dr. Sachin Bhandare attended the event and encouraged the participants.



Teachers and participants in Book Review Competition

3.5 Joke Cracking Activity

The Department of English organized a Joke Cracking Activity through the Students' Association "Langlit" on 11 September 2025 at the Audio Visual Hall of the English Department for UG and PG students.



Participants in Joke Cracking Competition

4. Knowing Book Lecture Series:

The Department of English organized a Knowing Book Lecture series throughout the year to develop reading culture, critical thinking, and intellectual curiosity among students and teachers. It encourages participants to explore important books, authors, and ideas beyond the syllabus. Through lectures and discussions, students improve their understanding, communication, and analytical skills. The series also promotes literary awareness, academic interaction, creativity, and lifelong learning habits. It creates an enriching academic environment where knowledge, values, and different perspectives are shared meaningfully. Dr Sachin Bhandare is the incharge of this Knowing Book Lecture Series.

4.1. Knowing Book Lecture on Creative Poetry

The Department of English organized a Knowing Book Lecture on 25th September 2025. Dr. Sandip Chavan was invited as the resource person for the program. He delivered a lecture on how poetry is created and the art of writing poetry. He also explained the emotional appeal and beauty of poetry. The main objective was to increase students' interest in reading and writing poetry. It also aimed to acquaint students with the art and composition of poetry. Dr. Sachin Bhandare introduced the purpose of the lecture. Dr. Chandrashekhar Dawane introduced the resource person. Dr. Chavan recited some of his own poems and emotionally connected with students. He explained that poetry is created through emotions, ideas, imagination, and sensitivity. Students listened attentively and enjoyed the poetic session. They learned that poetry can emerge from small events and daily experiences. Students also sang rhythmic patterns of poems with the resource person. Overall, the lecture was inspiring, enjoyable and successful.



Dr Anuja Jadhav, HoD English, felicitating the resource person Dr Sandip Chavan.



Dr Sandip Chavan, the Resource Person sharing his insights in the workshop

4.2 Knowing Book Lecture on Dopamine Detox

The Department of English organized the second lecture of the Knowing a Book Lecture Series during the academic year 2025–26. Dr. Dnyaneshwar Choudhari, Assistant Professor of English from Maharashtra Mahavidyalaya, Nilanga, was invited as the resource person. He delivered a lecture on the self-help book Dopamine Detox by Thibaut Meurisse. The main objective was to acquaint students with the book and its ideas. It also aimed to develop reading habits and promote a mobile-free lifestyle. Students were made aware of the importance of dopamine detox The program was anchored by Miss Nikita Rawale. Dr. Anuja Jadhav felicitated the guest with a book. Mr. Sanvidha Darkase introduced the resource person. Dr. Choudhari explained the harmful effects of excessive mobile usage. He also discussed how social media addiction affects mental and physical health. He guided the students about practical ways to practice Dopamine Detox. Miss Disha Jagtap proposed the vote of thanks. Overall, the lecture was informative, motivating, and beneficial for students.



Dr Anuja jadhav, HoD English, felicitating the resource person Dr Dnyaneshwar Choudhari



Dr Dnyaneshwar Choudhari delivering his views on Dopamine Detox

5. Alumnae Talk:

The Department of English organized alumni talk one in the semester. Alumni Talks are important for the English Department because they provide students with career guidance, motivation, industry exposure, and academic support. Alumni share their professional experiences and help students understand career opportunities, required skills, and higher education options. These talks also improve students' confidence, communication skills, and professional attitude while creating networking opportunities and strengthening the relationship between the department and its former students.

Thus, Alumni Talks contribute greatly to the whole academic and personal development of students.

5.1 Alumnae Talk by Suchita Katu

The English Department organized an "Alumnae Talk" programme on 24 September 2025 for UG students. The program was presided over by Dr. Mahadev Gavhane. The resource person for the program was Ms. Suchita Katu. Dr. Anuja Jadhav was especially present for the occasion. Mr. Anant Panchal coordinated the program successfully. The program was organized with the aim of motivating students and guiding them towards a bright future. It also focused on strengthening communication between alumni and present students. Ms. Suchita Katu shared her inspiring life journey, struggles, achievements, and valuable experiences with the students. Her speech motivated students to work hard and prepare for competitive examinations. She also conducted interactive activities to encourage participation. She fondly remembered her college days and expressed gratitude towards the institution. The audience listened enthusiastically and actively participated in the session. The program concluded with a vote of thanks delivered by Dr. Sachin Bhandare. Overall, the Alumnae Talk was highly successful, informative, and inspiring for all students.



Dr. Anuja Jadhav felicitated the Resource Person Ms. Suchita Katu



Ms. Suchita Katu shared her life experienced, struggle of her life with the students.

6. Guest Lecture:

The Department of English organized a Guest Lecture on 23rd August 2025. The topic of the lecture was "NEP 2020 and the Role of Students." The program was arranged for UG I, II, and III students. The main objective was to create awareness about India's New Education Policy 2020. It also focused on the history and transformation of the Indian education system. Students were guided to understand their role under the new policy. The lecture also explained recent changes and career opportunities under NEP 2020. Dr. R. T. Bedre was the resource person for the program. He conducted an interactive and informative session for the students. He highlighted the nature, features, and importance of NEP 2020. Students actively listened and showed great interest in the session. The participants

expressed happiness and satisfaction after the lecture. Overall, the guest lecture was successful, informative, and beneficial for students.



Dr R T Bedre interacting with Students in the guest lecture on NEP2020 and the Role of Students



Dr R T Bedre explaining the New Education Policy to the audience.

7. Career Orientation Program:

The Department of English organized a Career Orientation Program on 1st August 2025 for students of DSC and Minor (English) UG I, II, and III. The program was designed to provide valuable guidance on career development, career opportunities, interview techniques, and market demands for English graduate students. Dr. Nishank Pimple was the resource person who conducted an interactive and informative session. The program helped the students to understand various career options and prepare themselves for future opportunities. Overall, the session was fruitful, motivating, and successful.



Dr Nishank Pimple felicitated by Dr Anuja Jadhav, HoD



Dr Nishank Pimple while interacting with the students during his talk.

8. Out Reach Activity:

The Department of English organized an "Out Reach Program" at Yashwant Vidyalaya Latur and Jijamata Kanya Prashala Latur for UG students. The program was organized under the guidance of Dr. Anuja Jadhav, HoD, Department of English. Mr. Anant Panchal worked as the Coordinator of the program. The main aim of the program was to improve students' confidence and teaching skills. It also focused on enhancing English Grammar Knowledge among school students. B.Sc. CS First Year students actively took

part in the activities. Participants visited the schools and taught various English Grammar Concepts. Each participant conducted 7 to 8 periods and solved grammar-related doubts of school students. The program ended successfully with happiness, motivation, and positive feedback from all participants.





Students from Department of English teaching the students of Jijamata School and headmistress's feedback certificate

9. Inter-collegiate Oratory and Poster Presentation Competition:

The Department of English organized an Inter-collegiate Oratory and Poster Presentation Competition on 10th October 2025. The event was held to celebrate the birth anniversary of the renowned Indian author R. K. Narayan. The program aimed to introduce students to Narayan's life, works, and literary contributions. Invitations were sent to various colleges to encourage participation. There was no entry fee, and winners received cash prizes for both competitions. Topics for the oratory competition focused on literature, mythology, adaptation theory, women writers, and social media. Poster presentation themes included R. K. Narayan's literature and English language and literature. The event aimed to build confidence, creativity, communication skills, and presentation abilities. A total of 76 participants attended the program. Fourteen students registered for the competitions. Out of them, 7 students participated in oratory and 7 in poster presentation. Students delivered speeches confidently and presented creative handmade posters. Judges evaluated the performances fairly and encouraged participants. A prize distribution ceremony was held at 2:00 p.m. under the chairmanship of Dr. Vedpathak Sir. Overall, the competition was successful, inspiring, and beneficial for all participants.



Juries of oratory competition while judging the participant



Juries of Poster Presentation competition while judging the posters



A group photo with Students



Dr. Deepak Vedpathak while felicitating the winners



A group photo along with winners and participants

10. Library Session:

Library Sessions in the English Department are important because they help students to develop reading habits, research skills, and independent learning. These sessions introduced students to literary books, reference materials, journals, dictionaries, and digital resources useful for language and literature studies. They improve comprehension, vocabulary, critical thinking, and academic writing skills. Library Sessions also encouraged students to explore authors, literary theories, and research topics beyond the classroom syllabus. They created a strong academic environment and support the intellectual and professional growth of students. So the department takes one library session in the month on various authors and their books.

10.1 Library Session for IT students

The Department of English, Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur organized a Library Session for IT students and teachers on 30 July 2025 at the Research Center of the department.



Teachers and students in Library Session

10.2 Library Session on World and Indian Scientists and their Scientific Works

The Department of English organized a Library Session on 20th August 2025. Around 50 books on various scientists were displayed, and students expressed happiness and satisfaction.



Faculty of the department and the students in the Library Session.



Experiential Reading of the Students in Library Session

10.3 Library Session on "Motivational and Life Skills Development

The Department of English organized a Library Session on "Motivational and Life Skills Development" in the last week of September 2025 as part of its monthly library activity. A total of 58 students from UG and PG programs, along with 7 teachers participated in the session.





Teachers and students in Library Session

10.4 Library Session on World Famous Autobiographies

The Department of English, Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur organized a Library Session on 27th January 2026. It was on World Famous Autobiographies. A total of 50 participants attended, including teaching staff, and students. The department displayed 40 books on famous autobiographies for reading.



Students in Library Session

10.5 Library Session on Women Writers

The Department of English organized a Library Session on Women Writers on 12th March 2026. Readers explored books written by famous women writers and enjoyed reading them.



Student while enjoying reading books in Library Session

11. Film Fest:

A Film Fest in the English department is needed to enhance students' understanding of literature, language, culture, and communication through visual media. It helped students for analyzing films based on novels, plays, and literary themes, improving their critical thinking and interpretative skills. Film festivals also developed listening and speaking abilities by exposing students to different accents, styles, and forms of expression in English. A Film Fest created an enjoyable academic environment that connected literature with modern media and practical learning. So we show one motivational, inspiring movie in every month to the students.

11.1 Good Will Hunting - Movie

The Department of English, Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur organized a Film Fest on 29th July 2025. The movie screened for students and teachers was Good Will Hunting.



Students while enjoying the movie "Good Will Hunting"

11.2 The Founder- Movie

The English Department organized a Film Fest featuring the movie The Founder for UG students. The film is based on the true story of Ray Kroc and his journey from a struggling salesman to a successful businessman. The movie was directed by John Lee Hancock and written by Robert Siegel.



Filmfest in Visual Lab

11.3 A Beautiful Mind - Movie

The Department of English organized a Movie Screening on 24th January 2026. The program was arranged for students of both UG and PG classes. The activity aimed to provide educational and moral learning through cinema. It also focused on improving students' listening skills.

11.4 IAS Govind - Movie

The Department of English, Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur (Empowered Autonomous Institution) organized a Film Fest on 13th March 2026.



Students while enjoying the movie "IAS GOVIND"

Achievement of the faculty members:

1. Dr Anuja Jadhav

Dr Anuja Jadhav climbed on the Kalasubai Mountain Peak with 150 students and 6 teachers and sang our Indian National Anthem. It was the World Record noted in International Book of Records.



Dr Anuja Jadhav climbed on Kalasubai Mountain Peak

Kalsubai Peak is the highest mountain peak in the Indian state of Maharashtra. It is located in the Western Ghats (Sahyadri mountain range) near Bari village in Ahmednagar district. Its Height is about 1,646 meters (5,400 feet) above sea level. It is known as "Everest of Maharashtra" It is famous for: Trekking, sunrise views, camping, and monsoon scenery and Highest point in Maharashtra

2. Dr Chandrashekhar Ashok Dawane

"Dr. B. R. Ambedkar Legacy Award" (also referred to as the Dr. B. R. Ambedkar Social Award/ Samman in some event pages) to individuals and organizations who have made outstanding contributions in areas connected with the ideals of Dr. B. R. Ambedkar. According to the foundation, the award is mainly given for contributions in: Social justice, Equality and human rights, Protection of marginalized communities, Fighting discrimination, Education and teaching, Social work, and community services and Women empowerment. Dr Chandrashekhar Dawane got this award in 2025.

The "International Teacher Excellence Award" by the Tretayug Foundation is given to educators and academic leaders who have shown exceptional contribution, innovation, dedication, and excellence in the field of education. The main purpose of the award is: to honor teachers and mentors who inspire students, to recognize innovation and creativity in teaching, to appreciate dedication toward education and society, to encourage educational leadership and student empowerment, to celebrate educators who shape the future through knowledge and guidance.

****

संस्कृत विभाग

भारतीय राष्ट्रजीवनाचे दोन प्रमुख आधारस्तंभ म्हणजे संस्कृत भाषा आणि भारतीय संस्कृती होय. किंबहुना भारतीय संस्कृतीची मूळ प्रेरणा, तात्त्विक अधिष्ठान आणि वैश्विक विचारदर्शन हे प्रामुख्याने संस्कृत भाषेतच संचित आहे. या अमूल्य सांस्कृतिक व भाषिक वारशाचे जतन, संवर्धन आणि शास्त्रीय पुनरुज्जीवन करण्याच्या उदात्त हेतूने राजर्षी शाहू महाविद्यालयाचा संस्कृत विभाग निरंतर कार्यरत आहे. केवळ भाषेचे अध्यापन करणे एवढ्यापुरतेच मर्यादित न राहता. प्राचीन ज्ञानपरंपरेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास साधणे आणि त्यांना आधुनिक काळातील रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देणे, ही विभागाची प्रमुख ध्येयधोरणे आहेत. याच उद्देशांच्या पूर्ततेसाठी संस्कृत विभागाद्वारे वर्षभरात भाषिक कौशल्ये, संशोधनवृत्ती आणि व्यावसायिक सक्षमीकरण यांवर आधारित विविध नाविन्यपूर्ण उपक्रम शास्त्रीय पद्धतीने राबविले जातात, त्यांचा संक्षिप्त वृत्तांत खालीलप्रमाणे प्रस्तुत केला आहे.

संस्कृत विभागाच्या वार्षिक उपक्रम परंपरेनुसार, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी 'संस्कृत दिन' उत्साहात साजरा करण्यात आला, त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण कौशल्यांना वाव देण्यासाठी संस्कृत नाटक, समूहगायन, वक्तृत्व आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे विशेष आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात एकूण ९० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. सदर कार्यक्रमास बिहार येथील ज्येष्ठ विद्वान आचार्य पंडित संजय सत्यार्थी यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लाभली. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात संस्कृत भाषेतील रोजगाराच्या आधुनिक संधी, भारतीय ज्ञान परंपरेतील (IKS) संस्कृतचे अनन्यसाधारण महत्त्व, भाषिक सौंदर्य आणि या भाषेची व्याकरणिक व वैज्ञानिक तर्कशुद्धता यावर सखोल प्रकाश टाकला. विशेष म्हणजे, कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि व्यवस्थापन विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. त्यामुळे त्यांच्यातील संघटन कौशल्य आणि व्यवस्थापकीय दृष्टिकोनास चालना मिळाली.









संस्कृत दिवस कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी विविध उपक्रमे प्रस्तुत करताना व कार्यक्रमाचे मुख्य वक्ते विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करताना.

संस्कृत कार्यक्रमाचे औचित्य साधून संस्कृत विद्यार्थी मंडळाची (Sanskrit Student Council) अधिकृतरीत्या स्थापना करण्यात आली असून, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे औपचारिक स्वागत करून त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांचा पदभार सोपविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्त्वगुण, संघटन कौशल्य आणि विषयाप्रती उत्तरदायित्व विकसित करण्याच्या हेतूने गठित करण्यात आलेल्या या मंडळातील निम्नलिखित सदस्यांनी विभागाद्वारे आयोजित विविध उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अत्यंत मोलाचे आणि सक्रिय सहकार्य प्रदान केले आहे.

अध्यक्ष.- अमृता डोईफोडे., उपाध्यक्ष - आरती नागोराव पोतदार., सचिव.- येदले प्राची गणेश., सह सचिव.- श्वेता सांळुके., कोषाध्यक्ष.- जाधव दिक्षा औदुंबर., सदस्य.- प्रांजल जाजू., सदस्य.- माने प्रशांत., सदस्य.- कांबळे साक्षी विजय., सदस्य.- जाधव श्रेया., सदस्य.-गम्पले महेश तानाजी., सदस्य.- श्रेया सोनवणे.







संस्कृत विद्यार्थी मंडळातील विद्यार्थ्यांचे स्वागत करत असताना मान्यवर.

संस्कृत भाषेच्या अध्ययनासोबतच विद्यार्थ्यांना या भाषेतील समृद्ध साहित्याचा आणि महान साहित्यिकांच्या जीवनकार्याचा सखोल परिचय व्हावा, या उद्देशाने संस्कृत विभागाच्या वतीने विशेष अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २६ जून २०२५ रोजी संपन्न झालेल्या या व्याख्यानासाठी 'महाकविकालिदासस्य जीवनं साहित्यञ्च' हा विषय निर्धारित करण्यात आला होता, यावर संजीवनी महाविद्यालय, चापोली येथील संस्कृत विभाग प्रमुख डॉ. गणेश पेठकर यांनी मुख्य वक्ता म्हणून अभ्यासपूर्ण व तांत्रिक विवेचन सादर केले. महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. भीमराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सत्रामुळे विद्यार्थ्यांना कालिदासांच्या वाङ्मयीन शैलीचे आणि त्यांच्या साहित्यातील तात्त्विक सौंदर्याचे सखोल ज्ञान प्राप्त झाले, जे त्यांच्या शैक्षणिक प्रगल्भतेसाठी अत्यंत पूरक ठरले.





मुख्य वक्ते यांच स्वागत करताना व प्रमुख वक्ते मार्गदर्शन करताना.

महाविद्यालयात दिनांक ९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'कॉलेज डे' निमित्त विद्यार्थी-शिक्षक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये प्रशासकीय आणि शैक्षणिक जबाबदाऱ्यांचे अनुभवात्मक प्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने संस्कृत विभागाच्या प्रमुखपदी कु. आरती नागोराव पोतदार हिची निवड करण्यात आली होती. याच उपक्रमाचा भाग म्हणून कु. अमृता देवकते, अमृता डोईफोडे, गोविंद कासले आणि श्वेता साळुंके या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अध्यापनाचे कार्य यशस्वीपणे



सांभाळले. या प्रयोगशिल उपक्रमातून सहभागी विद्यार्थ्यांना संस्कृत विषयाच्या अध्यापनशास्त्रातील (Pedagogy) बारकावे, वर्गाभ्यास व्यवस्थापन आणि प्रभावी संवाद कौशल्ये यांचे प्रत्यक्ष कृतीतून सखोल ज्ञान प्राप्त झाले, ते त्यांच्या भावी व्यावसायिक कौशल्य विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले.







कॉलेज डे निमित्त बी.ए. तृतीय वर्षाचे विद्यार्थी संस्कृत विभागात कार्य करीत असताना.

संस्कृत, हिंदी आणि इतिहास विभाग, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA) आणि 'पी. एम. उषा' (PM-USHA) पुरस्कृत योजनेच्या संयुक्त विद्यमाने (दिनांक

२५.०२.२०२६. रोजी) 'भारतीय ज्ञान परंपरा' (Indian Knowledge Systems - IKS) या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचा मुख्य उद्देश प्राध्यापक आणि विद्यार्थी वर्गाला प्राचीन भारतीय ज्ञान प्रणालीतील विविध आयामांची शास्त्रीय ओळख करून देणे आणि त्यांना या क्षेत्रात संशोधनासाठी प्रवृत्त करणे हा होता. सदर कार्यक्रमाच्या विविध सत्रांमध्ये डॉ. गौरव कडलग, श्री. मिथिलेश भाकरे आणि डॉ. प्रभाकर कोलेकर या तज्ज्ञांनी भारतीय ज्ञान परंपरेचे ऐतिहासिक महत्त्व, तांत्रिक सुसंगतता आणि आधुनिक काळातील उपयुक्तता यावर विस्तृत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या चर्चासत्रासाठी देशभरातून मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या चर्चासत्राला व्यापक शैक्षणिक आणि संशोधनात्मक स्वरूप प्राप्त झाले.

संस्कृत विभागाद्वारे वर्षभरात आयोजित करण्यात आलेल्या सर्व शैक्षणिक व संशोधनात्मक उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांचे नेतृत्त्व व उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच या उपक्रमांच्या नियोजनबद्ध पूर्ततेसाठी प्रा. विनय गायकवाड, प्रा. दयानंद आर्य, प्रा. मुरलीधर जाधव आणि प्रा. सोमदेव शिंदे यांनी सक्रिय योगदान दिले. या प्रक्रियेत संस्कृत अभ्यास मंडळाचे पदाधिकारी आणि विभागातील सर्व विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग व त्यांनी केलेले परिश्रम यामुळे हे सर्व कार्यक्रम उद्दिष्टपूर्तीकडे यशस्वीपणे मार्गक्रमित होऊ शकले.









संस्कृत, हिंदी आणि इतिहास विभाग, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (MSFDA) आणि 'पी. एम. उषा' (PM-USHA) पुरस्कृत योजनेच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय ज्ञान परंपरा' (Indian Knowledge Systems - IKS) या विषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे काही छायाचित्रे

राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभाग

'राजकारण हे केवळ सत्तेचे शास्त्र नसून ते समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे.' या ब्रीदवाक्याला अनुसरून राजर्षी शाहू महाविद्यालय येथील राज्यशास्त्र विभाग सातत्याने कार्यरत आहे. एखाद्या राष्ट्राचा विकास हा तेथील सजग नागरिकत्वावर अवलंबून असतो आणि हे सजग नागरिक घडवण्याचे महत्त्वाचे काम राज्यशास्त्र विभाग पेलत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ हे विभागासाठी अत्यंत उत्साहवर्धक आणि उपक्रमशील राहिले. केवळ वर्गातील अध्यापनापर्यंत मर्यादित न राहता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना समकालीन राजकीय घडामोडींचे आकलन व्हावे, या उद्देशाने विभागाने वर्षभरात विविध उपक्रमांचे आयोजन केले. "Republic' विद्यार्थी मंडळाच्या माध्यमातून एकूण शैक्षणिक वर्षामध्ये अनेक उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने विविध विषयावर अतिथी व्याख्यान, चर्चासत्र, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, आदर्श ग्राम मॉडेल स्पर्धा, अभ्यास सहल, राष्ट्रीय परिषद आदी उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य तथा विभागप्रमुख डॉ.महादेव गव्हाणे सर यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. विभागातील प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे,प्रा.श्रीकृष्णा पांचाळ, प्रा.ऋतुजा बावचकर, डॉ.वितेश निकते यांनी सर्व उपक्रम यशस्वीपणे राबवले.

राज्यशास्त्र विभागांतर्गत घेतलेले विविध उपक्रम :

०१) Republic विद्यार्थी मंडळाची स्थापना :

राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्याचे प्रतीवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी Republic विद्यार्थी मंडळ स्थापन करण्यात आले. प्रतिनिधींची निवड लोकशाही पद्धतीने निवडणुकांच्या माध्यमातून करण्यात आली.

अ.क्र.	पदाधिका-याचे नाव	वर्ग	पद
१	राजनाळे जागृती मारोती	एम.ए. द्वितीय वर्ष	अध्यक्ष
२	चव्हाण दिव्या दिलीप	बी.ए. तृतीय वर्ष	उपाध्यक्ष
३	मोरे ज्ञानेश्वरी तानाजी	एम.ए. प्रथम वर्ष	सचिव
४	शिंदे अभिषेक बालाजी	बी.ए. द्वितीय वर्ष	सहसचिव
५	टेंकाळे राणी बालाजी	एम.ए. द्वितीय वर्ष	सहसचिव
६	भोसले अजिंक्य मारोती	बी.ए. प्रथम वर्ष	खजिनदार
७	बिरकिले प्रेम प्रभाकर	एम.ए. प्रथम वर्ष	सदस्य
८	शिंदे किरण रावसाहेब	बी.ए. तृतीय वर्ष	सदस्य
९	बनसोडे श्रेया महेंद्र	बी.ए. द्वितीय वर्ष	सदस्य
१०	लांडगे साक्षी संतोष	बी.ए. प्रथम वर्ष	सदस्य
११	येवते अंजली विजयकुमार	एम.ए. प्रथम वर्ष	निमंत्रीत सदस्य

२.स्वागत समारंभ :

बी.ए. प्रथम व एम.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना बी.ए. द्वितीय, तृतीय व एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य हेतू नवीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची, विभागाची ओळख व्हावी हा होता. म्हणून दिनांक १९-०८-२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता व्ही.एल.सी. हॉलमध्ये समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमामुळे नवीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन वातावरणाशी जुळवून घेण्यास मदत झाली आणि वरिष्ठ व कनिष्ठ विद्यार्थ्यांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. कार्यक्रमास विभागातील प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. श्रीकृष्णा पांचाळ, प्रा. ऋतुजा बावचकर डॉ.वितेश निकते इत्यादी प्राध्यापक .उपस्थित होते. या कार्यक्रमात १०१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.



स्वागत समारंभ प्रसंगी विभागातील उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी



स्वागत समारंभ प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे



स्वागत समारंभ प्रसंगी विभागातील उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी



स्वागत करताना विद्यार्थी

०३. आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त आदर्श ग्राम मॉडेल व अण्वस्त्र प्रदर्शन:

राज्यशास्त्र विभागामार्फत दिनांक १४-१०-२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त बी.ए. प्रथम व बी.ए. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांकडून 'आदर्श ग्राम मॉडेल व अण्वस्त्र' या विषयावर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य प्राचार्य डॉ.रावसाहेब कावळे यांच्या हस्ते झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे प्रा.ओमप्रकाश शहापूरकर व विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. प्रदर्शनाच्या दोन दिवस अगोदर विभागाने विद्यार्थ्यांना गाव नियोजन, पाणी संवर्धन, शासकीय संस्था आणि भारतातील ग्राम सुरक्षा यांसारखे विषय दिले होते. त्यावर विद्यार्थ्यांकडून आदर्श ग्राम मॉडेल व अण्वस्त्र मॉडेल तयार केले गेले. विभागातील सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या प्रदर्शनास एकूण ३३७ विध्यार्थ्यांनी भेट दिली. परीक्षक म्हणून प्रा. भगवंत बोकडे आणि प्रा. सुदर्शन पाटील यांनी जबाबदारी पार पाडली.



उद्घाटन करताना डॉ.रावसाहेब कावळे, प्राचार्य. डॉ.महादेव गव्हाणे व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी



आदर्श ग्राम मॉडेल व अण्वस्त्र प्रदर्शन याची पाहणी करताना प्राचार्य अनिरुद्ध जाधव, उप-प्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे व इतर प्राध्यापक व विद्यार्थी



आदर्श ग्राम मॉडेल व अण्वस्त्र प्रदर्शन याची पाहणी करताना डॉ.रावसाहेब कावळे, प्राचार्य.डॉ.महादेव गव्हाणे व उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

०४.शाहू समाचार पत्राचे विमोचन :

राज्यशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांमध्ये राजकीय लेखन कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने एम.ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी 'शाहू समाचार' या वृत्तपत्राची सुरुवात केली. या वृत्तपत्राचे विमोचन दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या हस्ते करण्यात आले.या प्रसंगी विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला असून एकूण २२ विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदविला.हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या लेखन, विश्लेषण आणि अभिव्यक्ती कौशल्यांना चालना देणारा ठरला असून त्यांच्या बौद्धिक विकासासाठी उपयुक्त आहे.



शाहू समाचार या वृत्तपत्राचे विमोचन करताना प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे सर, उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

०५. मतदाराना शपथ व संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन :

राज्यशास्त्र विभागामार्फत युवकांमध्ये लोकशाही मूल्ये व नागरी हक्काची जाणीव दृढ करण्याच्या उद्देशाने 'संविधानाच्या प्रस्तावनेचे सामूहिक वाचन व मतदारांना शपथग्रहण' हा उपक्रम दि.२६.११.२०२५ रोजी सकाळी ११.३० वा. हॉल न.३०५ मध्ये आयोजित करण्यात आला. आधुनिक लोकशाही व्यवस्थेमध्ये नागरिक बहुतेक वेळा आपल्या अधिकारांवर भर देतात मात्र राष्ट्र टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या कर्तव्यांची जाणीव निर्माण होणे तितकेच महत्त्वाचे आहे. याची जाणीव ठेवून विभागाने हा शपथग्रहण कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना संविधानातील मूलभूत मूल्ये न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांची आठवण करून दिली. या कार्यक्रमास विभागातील प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. श्रीकृष्ण पांचाळ, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. ऋतुजा बावचकर आणि डॉ. वितेश निकते उपस्थित होते. या उपक्रमामध्ये पदवी व पदव्युत्तर स्तरावरील ८० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून राष्ट्राप्रती आपली बांधिलकी पुन्हा दृढ केली.



प्रा.ज्ञानेश्वर बनसोडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



मतदाराना शपथ देताना प्राध्यापक

०६. सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा:

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त राज्यशास्त्र विभागामार्फत वक्तृत्व स्पर्धेचे दि.०३.०१.२०२६ रोजी ११.३० वा. VLC हॉल मध्ये आयोजन करण्यात आले. भारतातील पहिल्या महिला शिक्षिका व महान समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा

उपक्रम राबविण्यात आला. स्पर्धेसाठी '२१वे शतक आणि महिला सक्षमीकरण', 'भारतीय लोकशाही व महिलांचा सहभाग' आणि 'महिलांची सुरक्षा व धोरणात्मक आव्हाने' हे विषय दोन दिवस अगोदर विद्यार्थ्यांना देण्यात आले. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील ८८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला तर एकूण ७ विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रभावीपणे मांडले. प्रा. भगवंत बोकडे व प्रा. बापूसाहेब जेवळेकर यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पहिले. विभागातील प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. श्रीकृष्ण पांचाळ, प्रा. सुदर्शन पाटील आणि प्रा. ऋतुजा बावचकर , डॉ. वितेश निकते यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या वक्तृत्व कौशल्यास चालना मिळाली. तसेच महिलांविषयी जागरूकता व सामाजिक भान वृद्धिंगत झाले.



वक्तृत स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी व प्राध्यापक

०७. राष्ट्रीय परिषद :

'उच्च शिक्षणातील अभिनव व सर्वोत्तम पद्धतींची प्रभावी अंमलबजावणी'

भारतामधील उच्च शिक्षण क्षेत्रात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२०, उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि विद्यार्थी-केंद्रित उत्कृष्टतेवर नव्याने दिला जाणारा भर यामुळे आमूलाग्र परिवर्तन होत आहे. या बदलत्या गरजा लक्षात घेऊन आणि शैक्षणिक गुणवत्ता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने 'उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्ण व सर्वोत्तम पद्धतींची प्रभावी अंमलबजावणी' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन १२ मार्च २०२६ रोजी करण्यात आले. ही प्रतिष्ठित परिषद प्रधानमंत्री उच्चतर शिक्षण अभियान (PM-USHA) अंतर्गत महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी (MSFDA), पुणे यांच्या सहकार्याने राजर्षी शाहू महाविद्यालय (अधिकार प्रदत्त स्वायत्त संस्था), लातूर येथील राज्यशास्त्र, लोकप्रशासन आणि समाजशास्त्र विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेमध्ये विशेषतः सामाजिक विज्ञान आणि आधुनिक प्रशासन तसेच सामाजिक विकास यांतील परस्परसंबंध अधोरेखित करण्यात आले. राज्यशास्त्र, लोकप्रशासन आणि समाजशास्त्र हे सुजाण नागरिकत्व घडविण्याचे मूलभूत आधारस्तंभ कसे आहेत, यावर भर देण्यात आला. चर्चे मध्ये धोरण विश्लेषणातील अनुभवाधारित शिक्षण (Exeriential Learning), समाजशास्त्रीय संशोधनासाठी डिजिटल संग्रहांचा वापर, तसेच समुदायाधारित प्रकल्पांचा अभ्यासक्रमात समावेश करून या विषयांना समकालीन रोजगार बाजाराशी अधिक सुसंगत बनविण्याच्या पद्धतींवर चर्चा झाली. या विषयांवर केंद्रित संवादातून आयोजकांनी बहुविषयक दृष्टिकोनाची आवश्यकता अधोरेखित केली, ज्यामध्ये सामाजिक जागरूकता आणि प्रशासकीय कार्यक्षमता या तांत्रिक प्रगतीसोबत समांतरपणे विकसित होतात.या परिषदेमध्ये एकूण ७३ प्राध्यापक सहभागी झाले .



राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे व इतर मान्यवर .



राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना
प्राचार्य डॉ.राजेंद्र शिंदे व इतर मान्यवर



मार्गदर्शन करताना डॉ.ज्योती सिंग व परिषदेतील सहभागी प्राध्यापक.



मार्गदर्शन करताना डॉ.निलेश बेरड
व परिषदेतील सहभागी प्राध्यापक.

08. Movie Club :

Republic विद्यार्थी मंडळाकडून Movie Club च्या अंतर्गत विद्यार्थ्यांना समाजातील विविध ज्वलंत प्रश्नावर, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक अशा विविध विषयाशी संबंधी असणारे चित्रपट दाखविले जातात. या उपक्रमाचा उद्देश चित्रपटांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजातील विविध ज्वलंत प्रश्नांची ओळख करून देणे हा होता.

या Movie Club अंतर्गत जय भिम, चक्रव्यूह, मोहोजदारो, यासारखे चित्रपट दाखवण्यात आले. प्रत्येक चित्रपटानंतर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घेण्यात आली, त्यांनी आपले विचार मांडले व विविध मुद्द्यांवर मतप्रदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिंतनशील व विश्लेषणात्मक विचारसरणी विकसित झाली. तसेच समाजातील वास्तव परिस्थितीचे आकलन होऊन त्यांच्यात सामाजिक जबाबदारीची भावना दृढ झाली.



चित्रपट पाहताना सहभागी विद्यार्थी.

****

इतिहास विभाग

दरवर्षीप्रमाणे सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातही इतिहास विभागाद्वारे विद्यार्थी विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शाहु इतिहास विद्यार्थी मंडळाची निवड, शाहू इतिहास विद्यार्थी मंडळाचे उदघाटन, पीएम उषा द्वारे प्रायोजित भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन, शैक्षणिक अभ्यास सहल, वक्तृत्व स्पर्धा, कौन बनेगा हिस्ट्री स्कॉलर स्पर्धा, सांस्कृतीक कार्य विभाग, पुरातत्व व वस्तुसंग्राहलये संचालनालय, मुंबई यांच्या अंतर्गत सहाय्यक संचालक (पुरातत्व), नांदेड विभागाच्या सहयोगाने ऐतिहासिक किल्ले औसा येथे हेरिटेज वॉकचे आयोजन, पारंपारिक भारतीय वेशभूषा स्पर्धा, पारंपारिक भारतीय खाद्य संस्कृती स्पर्धा, पारंपारिक भारतीय पेय संस्कृती स्पर्धा, ऐतिहासिक प्रश्नमंजूषा स्पर्धा, शाहू व्याख्यानमाला इ. उपक्रमांचा त्यामध्ये समावेश आहे. अशा रितीने या शैक्षणिक वर्षामध्ये इतिहास विभागाने अभ्यासेत्तर शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांना प्राधान्य दिले. या मध्ये पुढील उपक्रम राबविण्यात आले.

शाहू इतिहास विद्यार्थी मंडळ व्याख्यानमाला

शैक्षणिक वर्षे २०२५-२६ मध्ये इतिहास विभागाद्वारे विद्यार्थ्यांची व्याख्याने हा एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला. वर्षभरात दर आठवड्याला एक या प्रमाणे विविध विषयांवर एकूण चौदा विद्यार्थ्याच्या व्याख्यानांचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. याकरिता सर्व विद्यार्थ्यांच्या नावांच्या चिठ्ठया तयार करण्यात येऊन, ज्या विद्यार्थ्याच्या नावाची चिट्ठी निघेल, त्या विद्यार्थ्यांनी एक आठवड्याच्या अल्प कालावधीमध्ये व्याख्यानाची तयारी करून विशिष्ट विषयांवर आपले विचार व्यक्त केले.

व्याख्याते विद्यार्थी व व्याख्यानाचा विषय-

अ.क्र.	दिनांक	विद्यार्थ्यांचे नाव	व्याख्यानाचा विषय
१	०५ जुलै २०२५	मगर किशोर	डॉ. बाबसाहेब आंबेडकर - इतिहास आणि वर्तमान
२	१२ जुलै २०२५	सिरसाट पृथ्वीराज	महात्मा जोतिबा फुले: व्यक्ती व कार्य
३	२४ जुलै २०२५	सुर्यवंशी साक्षी	लोकमान्य टिळक: व्यक्ती व कार्य
४	३१ जुलै २०२५	उददेवाल आरती	शिव जयंती व गणेशोत्सव: काल आणि आज
५	१४ ऑगस्ट २०२५	काळे कांचन	मराठी भाषा आपली ओळख आपली शान
६	२० ऑगस्ट २०२५	सारडा नेतल	स्त्री पुरूष समानतेचा आवाज- कृतीतून की, केवळ भाषणातून
७	०३ सप्टेंबर २०२५	शेख आफ्रिन	विलासराव देशमुख राजकीय वाटचालीचा इतिहास
८	१९ सप्टेंबर २०२५	इंगळे आदित्य	एक गोष्ट जीवनाची
९	२६ सप्टेंबर २०२५	सुडे तपस्या	नालंदा: भारतीय ज्ञानाचा वारसा
१०	१० ऑक्टोबर २०२५	सुर्यवंशी ऋषीकेश	प्लासीच्या युध्दावेळची राजकीय परिस्थती
११	१५ डिसेंबर २०२५	आलगुडे गायत्री	इंदिरा गांधी यांची राजकीय कामगिरी
१२	२४ डिसेंबर २०२५	राऊतराव श्रीकृष्ण	निरोगी दिर्घाआयुष्याचा मूलमंत्र
१३	२७ जानेवारी २०२६	ढगे आदित्य	गुरूनानक
१४	०६ फेब्रुवारी २०२६	रोंगे स्नेहा	शिवशाही ते लोकशाही

शाहू इतिहास विद्यार्थी मंडळ प्रतिनिधी निवड

विद्यार्थ्यांमधील सुप्त नेतृत्व गुणांना संधी देण्याकरिता दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील शाहू इतिहास विद्यार्थी मंडळामध्ये पुढील विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव	पद	वर्ग
१	सिरसाट पृथ्वीराज गोविंद	अध्यक्ष	बी.ए. तृतीय वर्ष
२	मगर किशोर हरिदास	उपाध्यक्ष	बी.ए. तृतीय वर्ष
३	कु. सारडा नेतल जुगलकिशोर	सचिव	बी.ए. तृतीय वर्ष
४	कु. सोनवणे अपेक्षा चंद्रकांत	सहसचिव	बी.ए. द्वितीय वर्ष
५	ढगे आदित्य कैलास	सदस्य	बी.ए. द्वितीय वर्ष
६	सुर्यवंशी ऋषिकेश संतोष	सदस्य	बी.ए. द्वितीय वर्ष

विविध स्पर्धाचे आयोजन-

शाहू इतिहास विद्यार्थी मंडळाच्या स्थापनेचा मूळ उददेश विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांना वाव देणे व त्यांच्यात नेतृत्व गुणांचा विकास करणे हा आहे. शाहू इतिहास विद्यार्थी मंडळ प्रतिनिधींची निवड केल्यानंतर त्या मार्फत विभागातील विद्यार्थ्यांकरीता अभ्यासपूर्ण, मनोरंजनात्मक, इतिहास विषयाशी सुसंगत अशा काही स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

प्रश्नमंजूषा स्पर्धा -

इतिहास विभागाद्वारा ०९ सप्टेंबर २०२५ रोजी इतिहास प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. जागतिक व भारतीय इतिहासातील प्रश्नांवर आधारित ही प्रश्नमंजुषा स्पर्धा होती. २५ ऑगस्ट २०२५ रोजी या स्पर्धेसाठी पूर्व परीक्षा घेण्यात आली. २३ विद्यार्थ्यांनी पूर्व परीक्षा दिली. त्यातील गुणानुक्रमे प्रथम १६ विद्यार्थ्यांची मुख्य स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या १६ विद्यार्थ्यांचे प्रत्येक गटात चार विद्यार्थी याप्रमाणे चार गटांमध्ये विभाजन करण्यात आले.

मौर्य गट	गुप्त गट
गरड क्रांती राजकुमार	शेख आफ्रिन रशिद
घाटूळे वैष्णवी संजय	ठाकुर पायल अमरसिंह
रोंगे स्नेहा राजकुमार	अलगुडे गायत्री संजय
राऊतराव श्रीकृष्ण बालाजी	काळे कांचन दत्तात्रय

सातवाहन गट	राष्ट्रकुट गट
सारडा नेतल जुगलकिशोर	सुडे तपस्या संजय
मुळे अरविंद हणमंत	सिरसाट पृथ्वीराज गोविंद
उददेवाल आरती रमेश	पटाईत गायत्री बालाजी
ढगे आदित्य कैलास	सुर्यवंशी ऋषिकेश संतोष

मुख्य स्पर्धेत एकूण पाच फेऱ्या घेण्यात आल्या. प्रथम फेरीत प्राचीन भारताच्या इतिहासावर, द्वितीय फेरीत मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर, तृतीय फेरीत आधुनिक भारताच्या इतिहासावर व चौथ्या फेरीत आधुनिक जगाच्या इतिहासावर प्रत्येक गटाला पाच-पाच प्रश्न विचारण्यात आले. शेवटच्या बझर फेरीत एकूण १२ प्रश्न विचारण्यात आले, अंतिम फेरीत सातवाहन गट विजयी ठरला. इतिहास विभागप्रमुख लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी या स्पर्धेचे समन्वयक म्हणून काम पहिले.



इतिहास प्रश्नमंजुषा स्पर्धेत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारताना लेफ्ट. डॉ. अर्चना टाक



इतिहास प्रश्नमंजुषा स्पर्धेत सहभागी विद्यार्थी, समवेत लेफ्ट. डॉ. अर्चना टाक

कौन बनेगा हिस्टी स्कॉलर-

इतिहास विभागाद्वारे दि. ०४ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक व मनोरंजनात्मक अशा कौन बनेगा हिस्टरी स्कॉलर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी इतिहास विषयावर आधारित वस्तूनिष्ठ प्रश्नांच्या १६० चिठठया तयार केल्या. ०५ विद्यार्थ्यांनी यामध्ये स्पर्धक म्हणून सहभाग नोंदविला. उर्वरित विद्यार्थी श्रोते म्हणून उपस्थित राहिले. क्रमाक्रमाने येऊन प्रत्येक स्पर्धकाने एकेक चिठठी उचलून त्यातील प्रश्न वाचून त्याचे उत्तर दिले. उत्तर बरोबर आल्यास त्या स्पर्धकाला एक गुण प्राप्त होई. सर्वाधिक प्रश्नांची बरोबर उत्तरे देणारी कु. आरती रमेश उददेवाल हिने हिस्ट्री स्कॉलर हा बहुमान पटकावला. या स्पर्धेमुळे उपस्थित सर्व विद्यार्थ्यांच्या इतिहास विषयक ज्ञानात निश्चितपणे भर पडली.



कौन बनेगा हिस्टी स्कॉलर या स्पर्धेत सहभागी विद्यार्थी

वन मिनिट शो-

दि. ०८ सप्टेंबर २०२५ रोजी विद्यार्थ्यांसाठी वन मिनिट शो या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकूण २३ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या स्पर्धेत युरोप खंडातील विविध देशांची नावे, हडप्पा संस्कृतीतील शहरांची नावे, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांची नावे, शिवकालीन किल्ल्यांची नावे, मोगल बादशाहांची नावे, महाराष्ट्रातील समाजसुधारकांची नावे, महाराष्ट्रातील जिल्ह्यांची नावे इ. विषय विद्यार्थ्यांना देण्यात आले. अवघ्या एक मिनिटात सर्वाधिक नावे लिहिणारे पुढील विद्यार्थी विजेते ठरले.

क्रमांक	विजेत्यांची नाव
प्रथम	उददेवाल आरती रमेश
द्वितीय	सारडा नेतल जुगलकिशोर
तृतीय	काळे कांचन दत्तात्रय

शाहू इतिहास विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन -

दि. १६ सप्टेंबर २०२५ रोजी प्रमुख पाहुणे डॉ. सदाशिव दंदे यांच्या शुभहस्ते शाहू इतिहास विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. 'इतिहास विषयातून करिअरच्या संधी' या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अभ्यासात कठोर परिश्रम करण्यासाठी आणि आपल्या ध्येयावर ठाम राहण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरित केले. यावेळी शाहू इतिहास विद्यार्थी मंडळातील सर्व प्रतिनिधी तसेच इतिहास विभागातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



शाहू इतिहास विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन करताना डॉक्टर सदाशिव दंदे, लेफ्ट. डॉ. अर्चना टाक, डॉ. कल्याण सावंत, सचिव कु. नेतल सारडा, सदस्य ऋषिकेश सूर्यवंशी



राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करताना डॉ. सदाशिव दंदे व सर्व विद्यार्थी प्रतिनिधी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे डॉ. सदाशिव दंदे



शाहू इतिहास विद्यार्थी मंडळ उद्घाटन प्रसंगी उपस्थित विद्यार्थी व विद्यार्थिनी

पारंपारिक भारतीय खाद्य संस्कृती स्पर्धा-

१६ सप्टेंबर २०२५ रोजी इतिहास विभागाद्वारे पारंपरिक भारतीय खाद्यसंस्कृती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डॉ. कल्याण सावंत, डॉ. स्वाती फेरे आणि श्रीमती. अनिता काळे यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. स्पर्धक विद्यार्थ्यांनी इडली, आप्पे, शिरखुर्मा, व्हेज बिर्याणी, दही-धपाटे, भज्जी आणि भाकरी, कोंडीची भाकरी, मास वडी, झुणका-भाकरी, कांदे पोहे इ. असे वेगवेगळ्या प्रकारचे भारतीय खाद्य पदार्थ तयार केले होते. वर्गनिहाय पुढील विद्यार्थी विजेते ठरले.

वर्ग	क्रमांक	विजेत्यांची नाव
बी.ए. द्वितीय वर्ष	प्रथम	कांबळे भूमी लक्ष्मण
	द्वितीय	चंदे अश्विनी नारायण
	तृतीय	रसाळ साक्षी ज्ञानेश्वर
	उत्तेजनार्थ	ढगे आदित्य कैलास
बी.ए. तृतीय वर्ष	प्रथम	कांबळे सुनिल पिंटू
	द्वितीय	ठाकुर पायल अमरसिंग
	तृतीय	सारडा नेतल जुगलकिशोर
	उत्तेजनार्थ	अलगुडे गायत्री संजय





पारंपरिक भारतीय खाद्य संस्कृती स्पर्धेचे परीक्षण करताना परीक्षक डॉ. कल्याण सावंत

पारंपरिक भारतीय खाद्य संस्कृती स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांनी बनविलेली विविध पारंपारिक भारतीय





गव्हाची खीर, पराठे, घुगऱ्या, दही पराठे खाद्यपदार्थ

पारंपारिक भारतीय वेशभूषा स्पर्धा

इतिहास विभागाने १६ सप्टेंबर २०२५ रोजी भारतीय पारंपरिक वेशभूषा स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी भारताच्या विविध भागांतील विविध प्रकारच्या वेशभूषा परिधान केल्या होत्या. या वेशभूषांमध्ये दक्षिण भारतीय, पंजाबी, बंगाली, महाराष्ट्रीयन, गुजराती, काश्मिरी, पैठणी इत्यादींचा समावेश होता. प्रमुख पाहुणे आणि उद्घाटक डॉ. सदाशिव दंदे यांनी विजेत्यांना प्रमाणपत्रे देऊन सन्मानित केले. लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी स्पर्धेच्या समन्वयक म्हणून काम पाहिले. डॉ. राहुल मोरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ. स्वाती फेरे आणि प्रा. अनिता काळे यांनी या स्पर्धेचे परीक्षक म्हणून काम पाहिले. त्यांनी वेशभूषांचे निरीक्षण केले आणि विजेत्यांची नावे खालीलप्रमाणे घोषित केली.

वर्ग	क्रमांक	विजेत्याचे नाव
बी.ए. द्वितीय वर्ष	प्रथम	उददेवाल आरती रमेश
	द्वितीय	सुर्यवंशी ऋषिकेश संतोष
	तृतीय	काळे कांचन दत्तात्रय
बी.ए. तृतीय वर्ष	प्रथम	सारडा नेतल जुगलकिशोर
	द्वितीय	कांबळे सुनिल पिंटू
	तृतीय	राऊतराव श्रीकृष्ण बालाजी



कु. नेतल सारडा, पारंपरिक बंगाली वेशभूषेचे सादरीकरण करताना



कु. वैष्णवी घाटुळे, पारंपरिक दक्षिण भारतीय वेशभूषेचे सादरीकरण करताना

पारंपारिक भारतीय पेय संस्कृती स्पर्धा

दि.०९ फेब्रुवारी २०२६ रोजी इतिहास विभागाद्वारे पारंपारिक भारतीय पेय संस्कृती या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये एकूण १६ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. चव, नैसर्गिक घटक, आरोग्यदायी गुणधर्म, सादरीकरण या बाबींचा विचार करून पुढील विद्यार्थ्यांना विजेते म्हणून घोषित करण्यात आले.

क्रमांक विजेत्यांची नाव

प्रथम श्रीकृष्णा राऊतराव

द्वितीय साक्षी ज्ञानेश्वर रसाळ

तृतीय आरती रमेश उद्देवाल

किल्ले औसा येथे हेरिटेज वॉक

१९ ते २५ नोव्हेंबर हा कालावधी ' जागतिक वारसा सप्ताह' (Heritage Week) म्हणून पाळला जातो. याच अनुषंगाने, इतिहास विभागाने २४ नोव्हेंबर २०२५ रोजी औसा किल्ल्यावर 'वारसा पदयात्रा' (Heritage Walk) आयोजित केली होती. वारसा पदयात्रेचा मुख्य उद्देश स्थानिक परिसरातील ऐतिहासिक वास्तूंना भेटी देणे, त्या परिसराची निगा राखणे

आणि त्या वास्तूंचे जतन करणे हा असतो. वास्तविक पाहता, ही संकल्पना सर्वप्रथम पाश्चात्य देशांमध्ये उदयास आली होती. तथापि, लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी औसा किल्ल्यावर या आगळ्यावेगळ्या संकल्पनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. 'जागतिक वारसा सप्ताहा' च्या निमित्ताने आयोजित या वारसा पदयात्रेचा एक भाग म्हणून, महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व संचालनालयाचा नांदेड विभाग आणि राजर्षी शाहू महाविद्यालयाचा इतिहास विभाग यांनी औसा या ऐतिहासिक किल्ल्याला भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी किल्ल्याच्या इतिहासाविषयी सविस्तर माहिती जाणून घेतली. लेफ्टनंट डॉ. अर्चना टाक यांनी किल्ल्याविषयीची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. राजर्षी शाहू महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांनी, महाविद्यालयातील एन.सी.सी. (NCC) कॅडेट्स आणि औसा येथील मुक्तेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या सोबतीने किल्ल्याच्या परिसराची स्वच्छता केली. एकूण ४५ विद्यार्थी यामध्ये सक्रिय सहभागी झाले.





किल्ले औसा येथे ऐतिहासिक वास्तूची स्वच्छता करताना विद्यार्थी व प्राध्यापक

बदामी, पट्टदकल व ऐहोळे शैक्षणिक अभ्यास सहलीचे आयोजन

शैक्षणिक अभ्यास सहली विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये महत्वाची भूमिका बजावतात. चार भिंतीच्या आतील औपचारिक शिक्षणाच्या बाहेर जाऊन निसर्गाच्या शाळेत विद्यार्थी हा अनुभवावर शिकत असतो. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडण्यासाठी इतिहास विभागाने दरवर्षीप्रमाणे या शैक्षणिक वर्षात देखील अभ्यास सहलीचे आयोजन केले होते. इतिहास विभागातर्फे सध्या कर्नाटक राज्यामध्ये असलेली चालुक्य राजवटीची राजधानी बदामी, युनेस्कोने जाहीर केलेल्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीतील पट्टदकल व प्राचीन मंदिर नगरी ऐहोळे इ. ठिकाणी असलेल्या शैल मंदिरांना व बांधीव मंदिरांना १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भेट देण्यात आली. एकूण १८ विद्यार्थ्यांनी या सहलीमध्ये सक्रीय सहभाग नोंदविला. इतिहासविभाग प्रमुख डॉ. अर्चना टाक व डॉ. राहुल मोरे यांनी या सहलीचे आयोजन केले होते.



बदामी येथील प्राचीन मंदिरात विद्यार्थी व प्राध्यापक वृंद



ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय, बदामी येथे विद्यार्थी व प्राध्यापक

'भारतीय ज्ञानप्रणाली' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान यांच्या प्रायोजकत्वाने आणि महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे यांच्या सहयोगाने राजर्षी शाहू महाविद्यालयातील इतिहास, संस्कृत व हिंदी या विभागांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर आधारित एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. एकूण चार सत्रांमध्ये तीन साधन व्यक्तींनी भारतीय ज्ञान परंपरेविषयी उपस्थिताना मार्गदर्शन केले.

प्रथम सत्रात महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे येथून आलेले डॉक्टर गौरव कडलग यांनी 'भारतीय ज्ञान परंपरा आणि विश्वबंधुत्व' या विषयावर उपस्थिताना मार्गदर्शन केले. भारतीय ज्ञान परंपरा म्हणजे काय? भारत सरकारला भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्याची गरज का भासली असावी? भारतीय ज्ञान परंपरेचा सद्यस्थिती मध्ये जीवन जगताना कसा उपयोग करून घेता येऊ शकतो? अशा विविध विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले.

त्यानंतर द्वितीय सत्रात महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था, पुणे येथूनच आलेले डॉक्टर मिथिलेश भाकरे यांनी 'भारतीय ज्ञान परंपरा आणि सामाजिक, पर्यावरण आणि एकूणच समग्र आरोग्य' या विषयावर समग्र मार्गदर्शन केले. विशेषतः भारतीय ज्ञान परंपरा आणि मानसशास्त्र यातील सहसंबंध त्यांनी उलगडून दाखविला.

तिसऱ्या व चौथ्या सत्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ येथील प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्त्व विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉक्टर प्रभाकर कोळेकर यांनी भारतीय ज्ञान परंपरेविषयी आपले विचार मांडले. त्यांनी 'भारतीय ज्ञान प्रणालींचा शोध - परिमाणे, चौकटी आणि पद्धतशीर दृष्टिकोन' या विषयावर भारतीय ज्ञान परंपरेचे विविध पैलू अत्यंत सोप्या आणि प्रभावी शब्दात उलगडून सांगितले. वेद, उपनिषद, आयुर्वेद, योग, गणित, खगोलशास्त्र इ. क्षेत्रातील भारताचे योगदान प्रभावीपणे मांडले.

भारतीय ज्ञान परंपरेचा सखोल अभ्यास करून तिच्या मूल्यांचे संवर्धन व प्रसार करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे, हाच संदेश या चर्चासत्रातून सर्वांना मिळाला.

या चर्चासत्राकरिता भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर आधारित पुस्तक प्रकाशित करण्याकरिता विविध अभ्यासकांकडून लेख मागविण्यात आले होते. एकूण ८७ लेख प्राप्त झाले. या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

चर्चासत्राचे मुख्य आयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे आणि उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हे चर्चासत्र संपन्न झाले. डॉ. राहुल मोरे यांनी चर्चासत्राच्या अहवालाचे वाचन केले. इतिहास विभागप्रमुख लेफ्ट. डॉ. अर्चना टाक यांनी आभार मानले. विविध महाविद्यालयातील एकूण ७७ विद्यार्थी व प्राध्यापकांनी यामध्ये सहभाग घेतला.



'भारतीय ज्ञान परंपरा आणि विश्वबंधुत्व' या विषयावर उपस्थित त्यांना मार्गदर्शन करताना मा. डॉ गौरव कडलग



आभार प्रदर्शन सादर करताना इतिहास विभाग प्रमुख लेफ्ट. डॉ. अर्चना टाक

अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षभरात विद्यार्थ्यांच्या अध्ययनासह विकास घडविण्याच्या दृष्टिकोनातून अर्थशास्त्र विभाग व डॉ. बी. आर. आंबेडकर अर्थशास्त्र विद्यार्थी मंडळाद्वारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. ते पुढीलप्रमाणे-

१. प्रो. ॲडम स्मिथ पुण्यतिथी दिन साजराः

प्रो. ॲडम स्मिथ हे स्कॉटलंडमधील प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ आणि तत्ववेत्ते होते. त्यांना अर्थशास्त्राचे जनक असे म्हणतात. त्यांचे सर्वात प्रसिध्द पुस्तक 'The wealth of Nations' आहे. यात त्यांनी उत्पादन, व्यापार आणि अर्थव्यवस्थेचे तत्व स्पष्ट केले. त्यांच्या या आर्थिक विचारांची उहापोह करण्यासाठी महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभाग आणि डॉ. बी. आर. आंबेडकर अर्थशास्त्र विद्यार्थी मंडळाद्वारे दि. १८ जुलै २०२५ रोजी, हॉल नंबर ३२२ मध्ये पुण्यतिथी दिन साजरा केला. या कार्यक्रमामध्ये पदव्युत्तर वर्गातील



अर्थशास्त्र विभाग व डॉ.बी.आर.आंबेडकर अर्थशास्त्र विध्यार्था मंडळाच्या वतीने आयोजित प्रो ॲडम स्मिथ पुण्यतिथी कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रा. रुपाली जाधव यांनी प्रो. ॲडम स्मिथ यांच्या आर्थिक विचाराची प्रासंगिकता विद्यार्थ्यांना सांगितली. प्रा. जीवन गायकवाड यांनी प्रो.ॲड्म स्मिथच्या अर्थशास्त्रातील योगदानाबद्दलची माहिती दिली. या कार्यक्रमाचे आभार प्रा. वडगावे व्ही. जे. यांनी व्यक्त केले.

२. स्वागत समारंभ कार्यक्रमः

बी. ए. प्रथम व एम. ए. प्रथम वर्षाच्या एम. ए. द्वितीय व बी.ए. द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांद्वारा स्वागत समारंभाचा कार्यक्रम दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी, VLC हॉल मध्ये आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय, अर्थशास्त्र विभागातील विविध कार्यक्रम व विद्यार्थी यांची ओळख करुन देणे, तसेच त्यांच्यामध्ये बांधिलकी निर्माण करणे हा होता. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. पी. गाडेकर यांनी केले. स्वागत समारंभाच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भूगोल विभागातील डॉ. किशोर शिंदे हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार एम. ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थीनी साक्षी कांबळे हिने मानले.



स्वागत समारंभाप्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे डॉ.किशोर शिंदे, विभाग प्रमुख डॉ.बी.पी.गाडेकर, प्राध्यापक व विद्यार्थी

३. निबंध स्पर्धाः

दि.१३ ऑक्टोबर २०२५ रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीन निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. सामाजिक व आर्थिक विषयांवर आधारित निबंध लेखनामुळे विद्यार्थ्यांना चिकित्सक विचार करण्यास व आपले विचार प्रभावीपणे मांडण्याची संधी मिळाली. स्पर्धा शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. प्राध्यापकांनी निबंधांचे मूल्यमापन मौलिकता, विचारांची स्पष्टता व सादरीकरण या निकषांवर

आधारित केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे लेखन कौशल्य व ज्ञान वाढीस चालना मिळाली.

४. भित्तीपत्रक स्पर्धा:

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील अर्थशास्त्र विभागातर्फे १५ ऑक्टोबर २०२५ रोजी 'भित्तीपत्रक स्पर्धा' विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागासह यशस्वीरित्या पार पडली. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना विविध आर्थिक संकल्पनांविषयीची आपली समज, सर्जनशील आणि दृश्यात्मकदृष्ट्या आकर्षक पोस्टर्सच्या माध्यमातून मांडण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करुन दिले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांनी क्रिप्टोकरन्सी, बचत आणि गुंतवणुकीचे पारंपारिक व आधुनिक स्रोत, आंतरराष्ट्रीय व्यापार आणि डिजिटल पेमेंट यांसारख्या विषयांचा आपल्या सादरीकरणात समावेश केला होता. स्पर्धेचे मूल्यमापन विषयाची अचूकता, स्पष्टीकरणातील सुस्पष्टता, सर्जनशीलता



भित्तीपत्रक स्पर्धेत विद्यार्थी आपले भित्तीपत्रक परीक्षक डॉ.निशांक पिंपळे व विभागातील प्राध्यापकांना स्पष्ट करुन सांगताना विद्यार्थी

आणि सादरीकरणाचे एकूण कौशल्य या निकषांवर आधारित केले होते. या कार्यक्रमाने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास आणि विश्लेषणात्मक विचारक्षमता विकसित होण्यासही मदत झाली. या कार्यक्रमाने एक परस्परसंवादी आणि गतिमान अध्ययन यामुळे वातावरण निर्माण केले. विद्यार्थ्यांना विचारांची देवाणघेवाण करता आली आणि आर्थिक मुद्यांविषयी अधिक सखोल अंतर्दृष्टी प्राप्त करता आली. एकंदरीत, ही पोस्टर सादरीकरण स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी अत्यंत माहितीपूर्ण आणि लाभदायक ठरली असून, त्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये आणि कौशल्य विकासात मोलाचे योगदान दिले. या स्पर्धेचे परीक्षण डॉ. गाडेकर बी.पी., प्रा. जे.एच. गायकवाड, प्रा. आर.एन. जाधव आणि प्रा. एन.आर. वाळके यांनी केले.

५. अनुभवात्मक आणि शोध आधारित अध्ययनांतर्गत औद्योगिक क्षेत्रभेट:

अर्थशास्त्र विभाग आणि डॉ. बी. आर. आंबेडकर विद्यार्थी मंडळाद्वारे दि. २४.०१.२०२६ ते २६.०१.२०२६ रोजी तीन दिवसीय औद्योगिक अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. ही औ द्योगिक अभ्यास सहल मॅप्रो उद्योग समूह (स्ट्रॉबेरी) - वाई, पाचगणी, महाबळेश्वर, वासोटा किल्ला, सातारा इ. ठिकाणी आयोजित करण्यात आली. या अभ्यास सहलीद्वारे विद्यार्थांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष क्षेत्रीय अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली. ज्यामुळे त्यांची निरीक्षणशक्ती, प्रश्न विचारण्याची क्षमता आणि व्यवहारिक समज वाढण्यास मदत मिळाली. मॅप्रो उद्योग समूह (स्ट्रॉबेरी) या ठिकाणी विद्यार्थ्यांना उत्पादन प्रक्रिया, गुणवत्ता नियंत्रण आणि पॅकेजिंग समजून घेतले. तसेच वासोटा किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा आणि किल्ल्याचे महत्व समजून घेण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांमध्ये साहसी वृत्ती वाढवण्यास मदत झाली. भौगोलिक वैशिष्ट्ये आणि नैसर्गिक सौदर्याचा अभ्यास



मॅप्रो उद्योग समूह (स्ट्रॉबेरी) - वाई औद्योगिक अभ्यास सहली दरम्यान उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

विद्यार्थ्यांनी केला. या शैक्षणिक सहलीसाठी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बी.पी. गाडेकर, प्रा. जीवन गायकवाड व प्रा. रुपाली जाधव व प्रा. नितीन वाळके यांनी विशेष परिश्रम घेतले.

६. केंद्रीय अंदाजपत्रकाचे थेट प्रक्षेपण कार्यक्रमः

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ दरम्यान विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आले. त्यापैकी Blended आणि Technology Enabled learning या संकल्पने अंतर्गत दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी, VLC Hall येथे "Live Budget Session २०२६-२७'' हा उपक्रम यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बी.पी. गाडेकर, अर्थशास्त्र विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजनात सचिव प्रा. एन. आर. वाळके आणि समन्वयक प्रा. जे. एच. गायकवाड, प्रा. रुपाली जाधव यांचे योगदान होते. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांना केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ चे थेट प्रक्षेपण (Live Telecast) दाखविण्यात आले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी अर्थसंकल्पातील विविध तरतूदी, महसुल व खर्च रचना, वित्तीय तुट तसेच कृषी, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधा आणि सामाजिक क्षेत्रातील तरतुदी यांचे सखोल निरीक्षण केले. यानंतर विद्यार्थ्यांसोबत संवादात्मक चर्चा सत्र घेण्यात आले. ज्यामध्ये त्यांनी आपले विचार मांडले व शंका निरसन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सैध्दांतिक ज्ञानासोबत प्रत्यक्ष आर्थिक घडामोडींचे आकलन होण्यास मदत झाली.



केंद्रिय अर्थसंकल्प २०२६-२७ चे थेट प्रक्षेपणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विभागप्रमुखा डॉ.बी.पी.गाडेकर

७. कॉलेज डे कार्यक्रमाचे आयोजनः

विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविणे, वक्तृत्व कौशल्ये विकसित करणे, संवाद कौशल्ये विकसित करणे, अध्यापन कौशल्ये विकसित करणे आणि प्राध्यापक म्हणून एक दिवसाचा अनुभव देण्यासाठी अर्थशास्त्र विभागाने ०९.०२.२०२६ रोजी B.A. III व M.A. II वर्गातील विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय कॉलेज डे कार्यक्रम आयोजित केला. कॉलेज डे कार्यक्रमाची सुरुवात औपचारिक उद्घाटन व स्वागतपर भाषणाने झाली. प्रास्ताविकेत विभाग प्रमुख डॉ. बी.पी. गाडेकर यांनी अर्थशास्त्र विषयाच्या शिक्षणातील प्रायोगिक शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले. तसेच त्यांनी प्रत्यक्ष अनुभवामुळे संकल्पना स्पष्टता वाढते तसेच विद्यार्थ्यांना संशोधन व स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करण्यास मदत होते, असे सांगितले. या प्रसंगी बी.ए. तृतीय व एम.ए. द्वितीय वर्गातील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग नोंदविला. विभागप्रमुख डॉ. बी.पी. गाडेकर, प्रा. जे.एच. गायकवाड आणि प्रा. नितीन वाळके यांनी विद्यार्थ्यांच्या अध्यापनाचे मार्गदर्शन व मूल्यमापन केले. सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि त्यापैकी श्रीनिवास पुरी (UG) व साक्षी कांबळे (PG) यांना "Best Teacher Award" प्रदान करण्यात आला.



कॉलेज डे कार्यक्रमात उत्कृष्ट अध्यापन करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करताना अर्थशास्त्र विभागप्रमुख व प्राध्यापक

८. जागतिक महिला दिन साजराः

महिला सक्षमीकरण, महिलांचा आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील कार्यांचा आढावा घेण्यासाठी

अर्थशास्त्र विभाग आणि डॉ. बी. आर. आंबेडकर अर्थशास्त्र विद्यार्थी मंडळाद्वारे जागतिक महिला दिन दि. ०९.०३.२०२६ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये UG व PG च्या विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. सर्व विद्यार्थ्यांनी स्त्रीयांची सद्यस्थिती, स्त्रियांचे अधिकार, फार पूर्वी स्त्री जे आयुष्य जगत होती यावर भाष्य केले व आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांनी आपल्या बौध्दिक पातळीनुसार स्त्रियांच्या कार्याचे वर्णन स्वतःच्या भाषेत व्यक्त करण्याचा प्रयत्न या कार्यक्रमाद्वारे केला. हा कार्यक्रम प्रा. रुपाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.



जागतिक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. रुपाली जाधव

९. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्र विद्यार्थी मंडळ २०२५-२६

सदस्यांचे नावे -

१. अध्यक्ष - साक्षी कांबळे (M.A.-S.Y.)

२. उपाध्यक्ष - अश्विनी माने (M.A.-F.Y.)

३. सचिव - अब्दुलगफार पटवारी (B.A.-T.Y.)

४. कोषाध्यक्ष - संध्या मलशेट्टे (B.A.-S.Y.)

५. सहसचिव - गुणवंत वंगवाडे (B.A.-F.Y.)

६. सदस्य - निखिल इंगळे (M.A.-S.Y.)

७. सदस्य - समिक्षा बनसोडे (M.A.-F.Y.)

८. सदस्य - पायल वाघ (B.A.-T.Y.)

९. सदस्य - महादेवी शिंदे (B.A.-S.Y.)

१०. सदस्य - राजश्री राऊत (B.A.-F.Y.)

भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी दिलेले सामाजिक न्याय, समता आणि शिक्षणाचे तत्वज्ञान आजही आपल्या जीवनाला दिशा देणारे आहे. या महान विचारांचा प्रचार-प्रसार आणि विद्यार्थ्यांमध्ये बौध्दिक जागृती घडवून आणण्यासाठी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्र विद्यार्थी मंडळ (२०२५-२६) ची स्थापना करण्यात आली. दि. ११ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता VLC हॉल येथे कार्यक्रमाचे उद्घाटन आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. निशांक पिंपळे प्राध्यापक गणित विभाग RSML उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी डॉ. बी.पी. गाडेकर, सहयोगी प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग RSML उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची घोषणा व स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि कार्यक्रमाला रंगत आणली. यावेळी निबंध स्पर्धा व पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेचे निकाल जाहीर करत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

भित्तीपत्रक स्पर्धेचे पुरस्कार विजेते विद्यार्थी:

१.प्रथम - धमले भैरवी नितीन (B.A.-F.Y.)

२.प्रथम - इगवे निकिता विजयकुमार (M.A.-S.Y.)

३.द्वितीय - बनसोडे अंजली उद्धव (M.A.-S.Y.)

४.तृतीय - गवळी ऋतुजा गोविंद (M.A.-S.Y.)

निबंध स्पर्धेचे पुरस्कार विजेते विद्यार्थी:

१.प्रथम - वाले अजय बाळासाहेब (B.A.-F.Y.)

२.द्वितीय - गायकवाड सोनाली सुभाष (B.A.-F.Y.)

३.तृतीय - माने अंकिता दिलीप (B.A.-F.Y.)

४.प्रथम - कल्याणी ऋतुजा संजीव (M.A.-S.Y.)

५.द्वितीय- कांबळे साक्षी तानाजी (M.A.-S.Y.)

६. तृतीय- इंगळे निखिल लक्ष्मण (M.A.-S.Y.)

७. उत्तेजनार्थ - इगवे निकिता विजयकुमार (M.A.-S.Y.)

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मार्गदर्शनातुन विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा दिली. अध्यक्षीय भाषणातून विद्यार्थ्यांना अभ्यास आणि संशोधनासाठी प्रोत्साहित करण्यात आले. तर आभार प्रदर्शन श्रीनिवास पुरी यांनी व्यक्त मानले.

१०. Under MoU - One day online National Level workshop

अर्थशास्त्र विभाग राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १८.०३.२०२६ रोजी, VLC हॉल मध्ये संशोधन पध्दती या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटक यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवदास सिरसाठ हे होते. कार्यशाळेचे अध्यक्ष राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते. या कार्यशाळेचे प्रमुख साधन व्यक्ती मध्यप्रदेश येथील IGNT विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातील डॉ. मनोहर येरकलवार हे होते. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांना संशोधन विषयाच्या संदर्भात विषयाची निवड, तथ्यसंकलन, उद्दीष्टे परीकल्पना, संशोधन अहवाल याबद्दल सखोल माहिती देणे हा होता. डॉ. मनोहर येरकलवार यांनी अधिक सोप्या शब्दामध्ये विद्यार्थ्यांना संशोधन पध्दतीवर मार्गदर्शन केले. संयोजक व सहसंयोजक म्हणून डॉ. दिपक भारती व डॉ. बी. पी. गाडेकर यांनी काम पाहिले. आयोजक सचिव म्हणून प्रा. रुपाली जाधव आणि प्रा. नितीन वाळके यांनी काम पाहिले. यामध्ये बी.ए. तृतीय व एम.ए. द्वितीय वर्गातील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. शेवटी या कार्यशाळेचे आभार प्रा. रुपाली जाधव यांनी मानले.



एकदिवसीय राष्ट्रीय ऑनलाईन कार्यशाळेचे उद्घाटन करताना प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे.

११. एकदिवसीय राष्ट्रीय ऑनलाइन कार्यशाळाः

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथील अर्थशास्त्र विभाग आणि यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथील अर्थशास्त्र विभाग यांनी सामंजस्य करारांतर्गत (MoU) एकदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील ऑनलाइन कार्यशाळेचे संयुक्त विद्यमाने, दिनांक २८ मार्च २०२६ रोजी 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले. विद्यार्थी आणि प्राध्यापकांना केंद्रीय अर्थसंल्पाविषयी सखोल ज्ञान आणि समज प्राप्त करुन देणे, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात समन्वयक डॉ. बी.पी. गाडेकर आणि डॉ. दीपक भारती यांच्या प्रास्ताविक भाषणाने झाली. यावेळी त्यांनी या कार्यशाळेचे महत्त्व आणि उद्दिष्टे स्पष्ट केली. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी केले. त्यांनी राष्ट्रीय विकासामध्ये केंद्रीय अर्थसंकल्पाचे असलेले महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषण प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाट यांनी दिले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. एस. एच. कडेकर यांनी विद्यार्थ्यांना अर्थसंकल्पाचा अभ्यास आणि विश्लेषण प्रभावीपणे कसे करावे, याविषयी एक अत्यंत अभ्यासपूर्ण आणि विचारप्रवर्तक व्याख्यान दिले. त्यांनी अर्थसंल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये, विविध क्षेत्रांसाठी केलेली तरतूद

(वाटप), कर रचना आणि विद्यार्थी व स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने त्याचे असलेले महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले. सूत्रसंचालन कु. मनोरमा पवार यांनी केले. तर प्रा. जीवन गायकवाड यांनी आभार मानले.

१२. RBI Foundation Day निमित्त अतिथी व्याख्यानः

RBI Foundation Day निमित्त दि. ०१ एप्रिल २०२६ रोजी हॉल क्र. २०५ येथे अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. सुरज सुर्यवंशी (IRS उत्तीर्ण) उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या स्वागताने करण्यात आली. आपल्या मनोगतात प्रा. सुरज सुर्यवंशी यांनी स्पर्धा परीक्षेतील यशाचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्यांनी अभ्यासाचे योग्य नियोजन, वेळेचे व्यस्थापन, सातत्य आणि चिकाटी यांचे महत्व स्पष्ट केले. तसेच UPSC, MPSC व Banking परीक्षांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना योग्य अभ्यास पध्दती व संदर्भ पुस्तकांची माहिती दिली. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची सखोल माहिती मिळाली. तसेच त्यांच्यामध्ये सहभाग नोंदवून विविध प्रश्न विचारले व शंका निरसन करुन घेतले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. पी. गाडेकर (विभागप्रमुख) यांनी RBI Foundation Day ची पार्श्वभूमी विषद करुन केली. शेवटी आभार प्रदर्शन करत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

१३. निरोप समारंभाचा कार्यक्रम

अर्थशास्त्र विभागातील B.A. प्रथम व द्वितीय वर्ष तसेच M.A. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी B.A. तृतीय व M.A. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचा कार्यक्रम दि. १५.०४.२०२६ रोजी सकाळी ०९ वाजता, VLC हॉल मध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी विभागातील प्राध्यापक डॉ. चंद्रशेखर दवणे उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणामधून विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी प्रेरणा दिली. महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाविद्यालयाची मूल्ये भविष्यात आयुष्यात जोपासण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध कलागुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचलन प्रा. रुपाली जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी. पी. गाडेकर, प्रा. जीवन गायकवाड व प्रा. नितीन वाळके आदी उपस्थित होते. शेवटी कार्यक्रमाचे आभार बी.ए. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी सोनाली गायकवाड हिने मानले



बी.ए. व एम.ए. अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभाप्रसंगी
उपस्थित प्रमुख पाहुणे, विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी

समाजशास्त्र विभाग

समाजशास्त्र विभाग विद्यार्थ्यांचा सर्वांगपूर्ण विकास घडून यावा, यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतो. समाजभान जागृत असलेले आणि समाजाच्या विकासासाठी कृतीशील दृष्टीकोन बाळगणारे नागरिक म्हणून भविष्यात विद्यार्थ्यांनी समाज कल्याणासाठी योगदान द्यावे, यासाठी समाजशास्त्र विभागाच्या वतीने दरवर्षी विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्येही समाजशास्त्र विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दि.११.०८.२०२५ रोजी समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'जागतिक आदिवासी दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी सेमिनारच्या माध्यमातून आदिवासीच्या जीवनावर आणि आदिवासी संस्कृतीवर समाजशास्त्रीय परिभाषेत अभ्यासपूर्ण मते प्रकट केली.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री.आकाश कांबळे

समाजशास्त्र विभागाच्या वतीने माजी विद्यार्थ्यांनी सध्या शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे, यासाठी आवर्जुन प्रयत्न केले जातात. दि.१०.०९.२०२५ रोजी 'ॲल्युमिनाई टॉक' अर्थात 'माजी विद्यार्थी संवाद' चे आयोजन केले होते. समाजशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी आकाश कांबळे यांनी या कार्यक्रमात 'दिव्यांगांचे कल्याण आणि समाजशास्त्रीय ज्ञानाचे उपयोजन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिव्यांगासाठी काम करणाऱ्या प्रसिध्द अशासकीय संघटनेत कार्यरत असणाऱ्या श्री. आकाश कांबळे यांनी या प्रसंगी महाविद्यालयीन जीवनातील अनेक आठवणींना उजाळा दिला आणि त्यांच्या जीवनातील यशस्वितेत महाविद्यालयीन जीवनात त्यांची जी जडणघडण झाली, त्याचाही मोठा वाटा असल्याचे स्पष्ट केले.

दि.१५.१०.२०२५ रोजी समाजशास्त्र विभागाच्या वतीने 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. वाचनप्रेरणा दिन म्हणजे देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दूल कलाम यांची जयंती समाजशास्त्र विभागाच्या वतीने या निमित्ताने निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमास विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

दि.१०.१२.२०२५ रोजी जागतिक मानवाधिकार दिन साजरा केला जातो. समाजशास्त्र विभागाच्या वतीने या जागतिक मानवाधिकार दिनाच्या निमित्ताने 'परिच्छेद लेखन' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी मानवाधिकारांची संकल्पना, मानवाधिकाराचे पैलू, मानवाधिकारांची आवश्यकता यावर भाष्य केले.

दि.२०.०१.२०२६ रोजी समाजशास्त्र विभागाच्या वतीने कॉईल नगर येथील झोपडपटटीमध्ये सर्वेक्षण कार्याचे आयोजन करण्यात आलेले होते. 'स्त्रिया आणि आर्थिक सक्षमीकरण' या विषयावर आयोजित या सर्वेक्षणात विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

दि.२१.०२.२०२६ रोजी 'सामाजिक न्याय' या



कॉईल नगर येथील झोपडपट्टीत सर्वेक्षण

विषयावर परिच्छेद लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. दि.२० फेब्रुवारी रोजी या जागतिक सामाजिक न्याय दिवस साजरा केला जातो, त्या निमित्तने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेस विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

राज्यशास्त्र, लोकप्रशासन आणि समाजशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रीय परिषदेचे आयोजन (पीएम-उषा अंतर्गत) दि.१२.०३.२०२६ रोजी करण्यात आला. या परिषदेला संशोधक, शिक्षणतज्ञ, प्राध्यापकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

समाजशास्त्र विभागाच्या वतीने बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. विविध मनोरंजक उपक्रमाच्या माध्यमातून हा निरोप समारंभ संपन्न झाला. समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. सायली समुद्रे, प्रा. डॉ. भगवंत बोकडे यांनी या उपक्रमांच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे सर्व उपक्रमांचे प्रेरणास्थान होते.

***

भूगोल विभाग

महाविद्यालयातील भूगोल विभाग सातत्याने विविध उपक्रम घेवून विद्यार्थ्यामध्ये सतत भौगोलिक ज्ञानाचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्य करीत आहे. भौगोलिक ज्ञानाबरोबरच पर्यावरण प्रदूषण, जैवविविधता, नैसर्गिक साधनसंपतीचे संवर्धन व व्यवस्थापन इ. सारखे विविध उपक्रम घेवून विद्यार्थ्यात पर्यावरण विषयक जाणीव जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न भूगोल विभागाकडून सतत केला जातो. त्याचाच भाग म्हणून शैक्षणिक वर्ष- २०२५-२६ मध्ये भूगोल विभागामार्फत खालील वेगवेगळे उपक्रम आयोजित करण्यात आले होते.



भौगोलिक क्षेत्रभेट - येडशी

दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी भूगोल विभागाच्या वतीने "भौगोलिक क्षेत्रभेट-येडशी" येथे बी.ए. प्रथम वर्ष भूगोल वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. प्रो.डॉ.विजय दळवी यांनी क्षेत्रभेट प्रभारी म्हणून कार्य केले.



भौगोलिक क्षेत्रभेट - कपिलधारा

दि. ०८,नोव्हेंबर २०२५ रोजी भूगोल विभागाच्या वतीने "भौगोलिक क्षेत्रभेट-कपिलधारा" येथे बी.ए. द्वितीय वर्ष भूगोल वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली. डॉ.किशोर शिंदे यांनी क्षेत्रभेट प्रभारी म्हणून कार्य केले.



भूगोलातील विविध संधी

भूगोल विभागामार्फत दि. २३,जानेवारी २०२६ रोजी "भूगोलातील विविध संधी" या विषयावर अतिथीव्याख्यान आयोजित करण्यात आले होते. माजी प्राचार्य डॉ.एस.बी.जाधव यांनी या संदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा उद्देश भूगोलातील विविध संधीबद्दल विद्यार्थ्याच्या मधील जागरूकता वाढावी म्हणून हे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.



राज्य व राष्ट्र संकल्पना

दि. २३,फेब्रुवारी २०२६ रोजी भूगोल विभागामध्ये अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. "राज्य व राष्ट्र संकल्पना" या विषयावर डॉ.बी.बी.पाटील यांनी

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून राजकीय भूगोलातील राज्य व राष्ट्र हि महत्वपूर्ण संकल्पना असून यामधील फरक समजावून सांगितला.



ग्राम सर्वेक्षण-महापूर

दि. ०७ मार्च २०२६ रोजी भूगोल विभागातील एम.ए. भूगोल वर्गातील विद्यार्त्यानी ग्राम सर्वेक्षण-महापूर येथे आयोजित केले होते. या विषयावर विद्यार्थ्यांना डॉ. किशोर शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

दि. १८, मार्च २०२६ रोजी भूगोल विभागाच्या वतीने Tour and Tourism Management या Certificate Course ची "भौगोलिक शैक्षणिक सहल लातूर- कोल्हापूर - मालवण - सिंधुदुर्ग " येथे बी.ए., बी.एस.सी. आणि एम.ए. विद्यार्थ्यांसाठी प्रा. नरसिंग शिंदे व प्रा. अनिता काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली होती.



भौगोलिक शैक्षणिक सहल- मालवण

भूगोल विभागाचे विविध कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी भूगोल विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, प्रा. दत्तात्रय सोनकांबळे, डॉ. विजय दळवी, डॉ. किशोर शिंदे, डॉ. संदीपान हाडुळे तसेच संशोधक विद्यार्थी श्री. नरसिंग शिंदे आणि श्रीमती प्रा.अनिता काळे (कोळपे) व सेवक राहुल सरवदे यांनी मोलाचे सहकार्य केले.



संगीत विभाग

राजर्षी शाहू महाविद्यालयातील संगीत विभागाने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये अनेक सांगीतीक उपक्रम घेऊन ते यशस्वी केले. विद्यार्थ्यांच्या सप्तगुणांचा, कला व कौशल्याचा विकास करण्यासाठी संगीत विभाग नेहमीच प्रयत्नशील असतो.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षामध्ये संगीत विभागामार्फत अनेक उपक्रम राबवले गेले.

* दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी दरवर्षीप्रमाणे थोर संगीतकार पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या निमित्ताने संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्रार्थना, भक्तीगीते इ. गीतांचे सादरीकरण करुन आदरांजली वाहीली. या कार्यक्रमासाठी कनिष्ठ व वरीष्ठ विभागातील विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणात उपस्थिती होती.

* दि. ३ व ४ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान संगीत विभागाच्या वतीने याही वर्षी रियाज प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शास्त्रीय संगीत, सुगम संगीत व तालवाद्य याचा प्राथमिक रियाज तसेच संगीताचे विविध पैलू यांचा सविस्तर अभ्यास होण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन केले जाते. या कार्यशाळेसाठी गायनाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. हरिश कुलकर्णी तसेच तालवाद्यासाठी श्री. निलेश पाठक या कलावंताची उपस्थिती लाभली. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उस्फुर्त सहभाग नोंदवला.

* दि. ०६ ऑक्टोबर २०२५ दरवर्षी प्रमाणे याही वर्षी संगीत विभागाच्या वतीने शाहू संगीत समारोहाचे आयोजन केले. गेल्या २२ वर्षीपासून हा संगीत समारोह अविरत चालू आहे. आजपर्यंत या समारोहामध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कलावंतानी आपल्या गायन व वादनाने रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे. या वर्षी पूणे येथील सुप्रसिध्द सरोद वादक पं. अनुपम जोशी व तबला वादक पं. अनिरुध्द शंकर यांनी हजेरी लावली होती. या दोन्ही कलावंताच्या जुगलबंदीने शाहू संगीत समारोहामध्ये रंगत आणली.

* दि. १२ ते १५ ऑक्टोबर २०२५ या दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व टेक्नीकल ॲण्ड मॅनेजमेंट कॅम्पस विष्णूपूरी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानतीर्थ युवक महोत्सवाचे आयोजन केले होते. या युवक महोत्सवामध्ये संगीत विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले. कु. इश्वरी जोशी या विद्यार्थीनीने वैयक्तीक शास्त्रीय गायन प्रकारामध्ये रौप्य पदक प्राप्त केले. तसेच संगीत विभागाच्या संघाने कव्वाली या सामुहीक गीत प्रकारामध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला. यामध्ये कु. अनुजा कुलकर्णी, ऋतुजा डोने, वैष्णवी महाजन, इश्वरी जोशी, चि. ऋषी कांबळे व गौरव साठे या विद्यार्थ्यांनी कवालीचे अप्रतिम सादरीकरण केले. या युवक महोत्सवात अनुक्रमे कु. गौरवी सांडूर, राजनंदिनी माने, अर्पिता पांचाळ, साक्षी बोडके, अनिकेत गायकवाड, केतकी कुलकर्णी या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

* दि.२५ ते ३० नोव्हेंबर २०२६ दरम्यान महात्मा गांधी मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित मध्यवर्ती विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सवामध्ये संगीत विभागाच्या कु. इश्वरी जोशी या विद्यार्थीनीने शास्त्रीय गायनात उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला.

या शिवाय महाविद्यालयात होणा-या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील अनेक कार्यक्रमामध्ये संगीत विभागाचे योगदान महत्वपूर्ण लाभले आहे. स्वातंत्र्यदीन, मराठवाडा मुक्ती व विद्यापीठ दिन प्रजासत्ताक व महाराष्ट्र दिन इ. प्रसंगी वैविध्यपूर्ण स्वागतगीत, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण संगीत विभागाच्या वतीने सातत्याने होते. या सर्व सांगीतीक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संगीत विभाग प्रमुख प्रा. हरिसर्वोत्तम जोशी व प्रा. वैभव माने यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. .





पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करताना संगीत विभागातील विद्यार्थी.



रियाज प्रशिक्षण कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. हरीश कुलकर्णी.



शाहू संगीत समारोहामध्ये सरोद वादन करतेवेळी पं.अनुपम जोशी व तबल्यावरती साथसंगती करत आहेत पं.अनिरुद्ध शंकर.



सुगम संगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना प्रा. लक्ष्मण श्रीमंगले.



PM-USHA अंतर्गत घेण्यात आलेल्या सुगम संगीत प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी साधन व्यक्ती श्री. लक्ष्मण श्रीमंगले यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे समवेत संगीत विभागप्रमुख प्रा.हरीसर्वोत्तम जोशी व श्रीमती मीनाक्षी भारती.



सुप्रसिद्ध तबला वादक रिंपा शिवा यांचे स्वागत करीत असताना शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. शिवाजीराव सुर्यवंशी व राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे

बी. ए. सी. ई. पी. विभाग

विद्यार्थी-पालक-शिक्षक बैठक:

दि.०५.०७.२०२५ रोजी बी.ए. सी.ई.पी. विभागांतर्गत विद्यार्थी-पालक-शिक्षक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यात समन्वय साधावा या हेतूने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपस्थित होते.



डॉ.महादेव गव्हाणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



पालक प्रतिनिधी आपले मनोगत व्यक्त करताना

राज्यसेवा परीक्षेच्या तयारीसाठी एकदिवसीय कार्यशाळा:

दि.०७-०८-२०२५ रोजी बी.ए. सी.ई.पी. विभागाच्या वतीने राज्यसेवा परीक्षेच्या तयारीसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपस्थित होते. तसेच विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. माधव शेळके



राज्यसेवा परीक्षेविषयी मार्गदर्शन करताना
IAS अॅकॅडमीचे संचालक प्रतीक पितांबरे.

एक दिवसीय शैक्षणिक सहल:

दि.१५-०८-२०२५ रोजी बी.ए. सी.ई.पी. विभागांतर्गत एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन कपिलधार-मुकुंदराज-चाकरवाडी या ठिकाणी करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना तेथील भौगोलिक व ऐतिहासिक स्थानांची माहिती मिळावी हा सहलीचा उद्देश होता. या सहलीचे नियोजन प्रा. नितीन पांचाळ यांनी केले.



शैक्षणिक सहलीमध्ये सहभागी विद्यार्थी - मुकूंदराज

शैक्षणिक सहल (लातूर - बेंगलोर - कोची - आलेप्पी - कन्याकुमारी - लातूर):

दि.२६-१०-२०२५ रोजी बी.ए. सी.ई.पी. विभागांतर्गत शैक्षणिक सहलीचे आयोजन लातूर - बेंगलोर - कोची - आलेप्पी - कन्याकुमारी - लातूर या ठिकाणी करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना तेथील भौगोलिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक स्थळांची माहिती मिळावी, हा सदर शैक्षणिक सहलीचा उद्देश होता. या सहलीचे नियोजन प्रा. ज्ञानेश्वर माळी यांनी केले.





शैक्षणिक सहलीमध्ये सहभागी विद्यार्थी - कन्याकुमारी

PM-USHA प्रायोजित एक दिवसीय SET/NET मार्गदर्शन कार्यशाळा:

दि.२२-१२-२०२५ रोजी बी.ए. सी.ई.पी. विभागाच्या वतीने PM-USHA आयोजीत एक दिवसीय SET/NET मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपस्थित होते. तसेच विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी

PM-USHA **प्रायोजित दोन दिवसीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा:**

सी.ई.पी. विभागाच्या वतीने दिनांक २३-०१-२०२६ ते २४-०१-२०२६ रोजी दोन दिवसीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून पुणे येथील द युनिक ॲकॅडमीच्या तज्ञ प्राध्यापकांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे



श्री. कपील हांडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे तसेच विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमास उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

'संरक्षण दलातील नोकरीच्या संधीबाबत कार्यशाळेचे आयोजन'

दिनांक १८-०३-२०२६ रोजी सी.ई.पी. विभागाच्या वतीने संरक्षण दलातील नोकरीच्या संधीबाबत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून सी.ई.पी विभागातील तसेच NCC (मुले) विभागातील माजी विद्यार्थी लेफ्टनंट विकास बिराजदार व लेफ्टनंट सुयश टेकाळे हे उपस्थित होते. त्यांनी केंद्रीय संरक्षण दलामधील विविध नोकरीच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपस्थित होते. तसेच विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बी.ए. सी.ई.पी विभागातील माजी विद्यार्थी लेफ्टनंट विकास बिराजदार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



NCC मुले विभागातील माजी विद्यार्थी लेफ्टनंट सुयश टेकाळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना

****

Faculty of Commerce

The Faculty of Commerce, established in the year 1970, has consistently been a beacon of academic excellence, dedicated to delivering quality education that aligns with the aspirations of various stakeholders. With an unwavering commitment to nurturing talent and fostering intellectual growth, the faculty has carved a niche in the realm of commerce education.

Recognized as a distinguished Research Centre under S.R.T.M. University, Nanded, the Faculty of Commerce is home to three eminent research supervisors HoD, Dr. P. S. Trimukhe, Dr. P. R. Rodiya, and Dr. V. D. Dhumal who guide and mentor 15 dedicated research scholars in their academic pursuits.

The Faculty comprises four prestigious Boards of Studies: Business Studies, Account and Applied Statistics, Commercial and Mercantile Law, and Commerce and Management. The curriculum, meticulously designed in alignment with the National Education Policy (NEP) 2020, caters to the evolving academic and professional needs of students. This dynamic curriculum ensures comprehensive preparation for competitive examinations such as NET, SET, MBA, CA, CS, and CMA, equipping students with the knowledge and skills required to excel in their respective fields.

To enrich the academic and professional journey of students, the Faculty of Commerce actively organizes an array of workshops, seminars, guest lectures, outreach programs, extension activities, and training programs. Special emphasis is laid on gender sensitization, communication and soft skills development, digital and financial literacy, corporate social responsibility (CSR), intellectual property rights (IPR), human values, and professional ethics. These initiatives are further elevated by the presence of distinguished guest speakers, who inspire and motivate students towards excellence.

The Commerce Association stands as an active and dynamic body, ensuring the seamless execution of all faculty-organized events. The association plays a pivotal role in fostering leadership, teamwork, and event management skills among students.

A flagship event of the faculty, the **'Commerce Idol Competition'** is organized annually to identify and honour the most outstanding student in Commerce. Open to students from Grade 11 to M. Com, this prestigious competition instils a spirit of healthy competition, enhances analytical abilities, and boosts self-confidence among participants, preparing them for future academic and professional challenges.

Through its innovative initiatives and unwavering dedication to academic excellence, the Faculty of Commerce continues to set benchmarks in the field of commerce education, shaping future leaders and professionals of tomorrow.

The Faculty of Commerce takes immense pride in the remarkable achievements of the faculty members whose outstanding accomplishments continue to bring laurels to the institution. Prof. Dr. P. S. Trimukhe has published a Utility Patent for AI Based Fraud Detection System for Secured Digital Transactions. Dr. P. R. Rodiya appointed as a BoS Member at Karmveer Bhaurao Patil Mahavidyalaya (Autonomous), Pandharpur for Commerce and Management Board. Dr. S. N. Bagwan has been awarded with Rashtriya Shikshak Ratna Purskar 2025 by Natural Human Rights Protection Council Forum, Nandurbar and published two Design Patents Namely Secure Digital Banking Device for Students and Gamified Financial Educational Device. Ms. G. K. Kombade qualified Central Teachers Eligibility Test (CTET) and Teacher's Aptitude and Intelligence Test (TAIT). Ms. A. Y. Beg secured second rank at District Level Avishkar Research festival in PPG Category of Commerce and Management. These extraordinary achievements underscore the faculty's relentless dedication to academic distinction and professional advancement.

Equally commendable are the students, who have consistently demonstrated academic brilliance and professional excellence. **Ms. Prachi More** (M. Com. I Year) has been recognized with Shahu Shree Puraskar 2025-26 awarded at College Level for Best Student. **Ms. Shubhangi Kamble** (M. Com. II Year) has qualified NTA NET Examination. **Mr. Samarth Kale** (M. Com. I Year) secured Second Rank in Police Bharti at Yawatmal District and received Chief Ministers Scholarship. **Mr. Shivam Sutar** (M. Com. I Year) has secured First Rank in Folk Dance and Second Rank in Mime performed at Unifest National Youth Festival, Satyabhama University, Chennai and selected for International Cultural Festival to be held at Colombo, Sri Lanka, marking a significant milestone in their academic journey. **Ms. Shambhavi Sude** (B. Com. III Year) secured First Rank in Verve Quiz Competition held at Dayanand College of Commerce, Latur. **Ms. Divya Jadhav** (B. Com. I Year) selected for the post of Accountant in SMRC. Furthermore, **Mr. Amit Joshi** has secured post of Clerk (Finance & Accounts), Maharashtra State Electricity Transmission Company Limited (MAHATRANSCO). **Mr. Aakash Rautrao** has secured esteemed post of Probationary officer in State Bank of India, Latur. **Ms. Sumaiyya Shaikh** has secured esteemed post of Probationary officer in Bank of Maharashtra, Akola Zone. **Ms. Smita Gundre** has been appointed at the post of Junior Accountant at Maharashtra State Electricity Distribution Company Limited (MAHAVITRAN), reflecting the faculty's commitment to shaping career-ready professionals.

The Faculty of Commerce remains steadfast in its mission to provide an enriching academic experience and holistic development

opportunities for its students. Below is a summary of the prestigious programs organized during the academic year 2025-26.

1. A Workshop on NEP 2020 and Emerging Trends in Commerce & Management

The Faculty of Commerce has organized a one-day workshop on "NEP 2020 and Emerging Trends in Commerce & Management" on 08.07.2025 with a view to create awareness and understanding of the National Education Policy 2020 and its relevance to the changing landscape of commerce and management education. The resource person for the workshop was Mr. Sachin Patange (Alumni of Faculty of Commerce). The resource person Mr. Sachin Patange provided thorough knowledge about emphasis on skill-based education multidisciplinary approach of NEP, credit transfer systems and integration of digital tools in commerce and management. Resource person also focuses on curriculum innovation, collaboration with industry, and the development of entrepreneurial mindsets among students.



Dr. M. H. Gavhane, Principal, RSM, Latur presenting presidential address

2. A Seminar on CA, CS & Other Professional Courses on the Occasion Chartered Accountants Day

In India, Chartered Accountants Day is observed every year on 1st July to commemorate the establishment of the Institute of Chartered Accountants of India (ICAI), founded in 1949 through an Act of Parliament. ICAI today stands as the world's second-largest professional body of Chartered Accountants and has played a crucial role in shaping the financial and accounting framework of the nation. This seminar is organized with the objective of acquainting students with the role of ICAI, its various norms, and the opportunities it provides, while also highlighting the importance of the Chartered Accountancy profession in ensuring transparency, accountability, and economic growth. Resource person CS Mahesh Dube provided thorough guidance for CA Profession like eligibility criteria, exam pattern, exam fees and different ways to prepare for these Professions.



Res.Person CS Mahesh Dube, Chairman, Chh.Sambhajinagar, Chapter of WIRC of ICSI addressing the students

3. A Workshop on Corporate Social Responsibilities (Under MoU with Bajaj Finserv Company)

A one-day workshop on Corporate Social Responsibility (under MoU with Bajaj Finserv Company) was organized by the Faculty of

Commerce, RSM, Latur on 18.07.2025. The workshop was chaired by respected Dr. M. H. Gavhane, Principal, RSM, Latur. The workshop commenced with a welcome address by Dr. P. S. Trimukhe, Head, Faculty of Commerce, who spoke about the growing relevance of CSR in the modern business world. The resource person, Dr. Nitin Burla, Lead Trainer at Bajaj Finserv Limited, delivered an informative session covering topics such as working conditions, women empowerment, good business practices and the CPBFI industry.



Resource person Dr.Nitin Burla, Lead Trainer, Bajaj Finserv Limited, Solapur presenting PPT

4. A Seminar on Financial Literacy and Insurance Awareness in Digital Era.

The Faculty of Commerce organized a seminar on "Financial Literacy and Insurance Awareness in the Digital Era" on 02.08.2025 with the objective of enhancing students' understanding of basic financial concepts and the importance of insurance in today's technology-driven environment. Resource person Mr. Umesh Deshpande explained key concepts such as saving, investment, budgeting, risk management, and insurance planning. Special emphasis was given to digital financial tools, online banking, digital payment systems, and e-insurance services. Real-life examples were used to help students understand how insurance protects individuals against financial risks in the digital age.



Resource Person Mr. Umesh Deshpande, Trainer, BFSI Sector Skill Council of India interacting with Students

5. A Seminar on Soft Skills and Interview Techniques for Commerce Students

The Faculty of Commerce organized a seminar on " Soft Skills and Interview Techniques for Commerce Students." on 02.08.2025 at 10:00 a.m. The program was chaired by Dr. P. S. Trimukhe, Head of the Faculty of Commerce. The esteemed resource person, Mr. Rahul Bulani, provided an insightful session on Soft Skill Development and Interview Techniques for



Resource Person Mr. Rahul Bulani, Founder, Catalyst Group, Latur guiding the students

commerce students. He emphasized the importance of Public Speaking, developing stage confidence, and understanding Interview Technique to equip students for future challenges with demonstrations. All the students participated with great enthusiasm. This program helped students to learn important skills like improving communication, teamwork, and public speaking. Overall, the program was engaging and gave students valuable tools for their careers.

6. Elocution Competition for the Selection of Commerce Association Office Bearers-2025-26

The Faculty of Commerce has organized an Elocution Competition on 07.08.2025. The elocution competition was organized on different aspects related to National Education Policy 2020. Total 26 students participated in elocution competition and spoke on different topics like Holistic and Multidisciplinary Learning, Digital Learning, Vocational Training in Colleges etc. The performance of students was judged by Ms. A. K. Balsaraf & Mr. V. D. Late. An elocution competition is considered to be an art of speaking. It gives self-boost and confidence to students to speak in front of large audience. This Competition organized to select office bearers of Commerce Association and also to motivate the students to take part in extracurricular activities. It also helps the students to enhance their various skills like communication, leadership and stage courage etc.

7. A Two Day Student Induction Program

A Two-Day Student Induction Program was organized on 21.08.2025 & 23.08.2025 to warmly welcome newly admitted students and familiarize them with the institution's environment, rules, and academic structure. The program aimed to ease the transition of students into college life and build a sense of belonging. On the first day, sessions included an introduction to the institution, its vision and mission, code of conduct, and academic guidelines. Faculty members and administrative staff addressed students, providing essential information about courses, facilities, and support services.The second day focused on interactive activities such as orientation on co-curricular and extracurricular



Student while giving speech in Elocution Competition



Resource Person Prof. Dr. Anuja Jadhav, Nodel Officer, NEP Cell, RSM, Latur interacting with students

opportunities, career guidance, and student support systems. Ice-breaking sessions and group activities were conducted to encourage participation and interaction among students.

8. Inauguration of Commerce Association 2025-26 and A Seminar on Entrepreneurship Development

The Faculty of Commerce has organized Inauguration Programme of Commerce Association 2025-26 on 13.09.2025. Dr. Sujit Deshmukh, Owner, Ampere Showroom, Nanded was the inaugurator and resource person for this program and Commerce Association 2025-26 was inaugurated. The resource person Dr. Sujit Deshmukh Sir, in his speech has stressed on the significance of Entrepreneur in the growth of Economy, career growth as well as career option as an Entrepreneur. Honorable Principal Dr. M. H. Gavhane has given presidential address to the program.



Respected Dignitaries with Office Bearers of Commerce Association 2025-26

9. Celebration of Freshers' Day organized by Commerce Association 2025-26

The Faculty of Commerce organized Freshers' Day Programme on 20.09.2025. The programme was held in Auditorium. The program began by offering flowers to their teachers by students as a gesture of gratitude for their guidance and support. The students then took turns for delivering speeches. The students of commerce association organized the freshers' day programme for the students of B.Com. and M.Com. students to facilitate interactions between seniors and freshers' helping new students build friendships and networks. In this programme, students presented their various skills like singing, Dancing etc.



Dr.P.S. Trimukhe, Head, Faculty of Commerce RSM, Latur presenting introductory speech

10. A Two Day Workshop on Investment Awareness

The Faculty of Commerce organized Two-Day Online Workshop on Investment Awareness to promote financial literacy among students and female faculty members. The First day, dated 06.10.2025, focused on Women's Financial Empowerment. The resource person Mr. Mandeep Maunder, Investment Consultant, HDFC Bank instructed on practical aspects such as investment planning, mutual funds, SIPs, and portfolio diversification. On the Second day, dated

07.10.2025, the resource person Ms. Smriti Pachoree, Financial Advisor, SEBI introduced the fundamentals of investment, the difference between savings and investment, and the significance of setting financial goals.



Glimpses of Workshop

11. A Workshop on NET, SET Preparation

The Faculty of Commerce organized NET and SET preparatory classes from 22.12.2025 to 30.12.2025. The National Eligibility Test is an examination conducted by National Testing Agency of India. This exam specially meant for the students of Post-Graduation level who want to enter in teaching fraternity. It is aimed at testing the ability of students to apply for the post like Assistant Professor and Junior Research Fellowship in various colleges. MH-SET is an examination conducted by Savitribai Phule Pune University for the Assistant Professor position in universities and colleges in Maharashtra and Goa. The sessions were conducted twice a day in a systematic manner. At the beginning, Mr. V. D. Late delivered an informative session, explaining the examination pattern, qualifying criteria, and other important aspects of NET and SET. After this introductory session, the faculty members of the Commerce department conducted regular classes based on their respective subjects. Each teacher focused on specific topics, ensuring thorough coverage of the syllabus. This well-planned arrangement helped students gain proper guidance and a clear understanding of different subjects required for effective exam preparation.



Dr. P.S. Trimukhe, Head, Faculty of Commerce, RSM, Latur guiding students on Accounting & Auditing

12. PM- USHA Sponsered National Workshop on Innovative Pedagogy: Empowering Educators for the Future

The "National Workshop on Innovative Pedagogy: Empowering Educators for the Future," organized by the Faculty of Commerce, Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur on 24.12.2025 under PM-USHA, was a highly enriching platform for educators, academicians and researchers from across the country. The workshop successfully facilitated meaningful discussions on contemporary teaching-learning practices, innovative pedagogy and the integration of technology in higher education. Through keynote addresses, technical sessions and interactive

discussions, participants gained valuable insights into learner-centric, outcome-based approaches aligned with the vision of the National Education Policy (NEP) 2020. All the sessions highlighted the importance of continuous professional development, reflective teaching and pedagogical innovation to empower educators in addressing the challenges of modern education.



Hon. dignitaries while publishing the Book

13. A Seminar on Insurance Literacy and Customer Protection on the occasion of National Consumer Rights Day

On the occasion of National Consumer Rights Day, the Faculty of Commerce organized a seminar on "Insurance Literacy and Customer Protection" on 25.12.2025 for the benefit of students. The seminar was conducted with the aim of creating awareness about the importance of insurance in personal and professional life and to educate students about their rights and responsibilities as insurance consumers. The seminar was conducted in an informative and interactive manner. The resource person Dr.Nitin Burla, Lead Trainer, Bajaj Finserv Limited explained key concepts such as insurance coverage, premium, risk, claim settlement process, and policy exclusions. Special emphasis was laid on customer protection, highlighting issues such as misselling of policies, lack of transparency, and delays in claim settlement.



Dr. M. H. Gavhane, Prinicpal, RSM. Latur delivering presidential address

14. Outreach Activity at Dnyaneshwar Secondary and Higher Secondary School, Latur on Financial Literacy, Social Inclusion and Human Values (Commerce Association)

